REGISTERED ON. 5, 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० १ माहे आगष्ट सन १८७५ इ० अंक ३१

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ९ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज न सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

विद्यमान डिपुटी कमिशनर साहेब जिल्हा इलिचपूर यांजकडून सर्वांस कळविण्यांत येते कीं डाक्टर सिंक्लेर साहेब विद्याखात्याचें डायरेक्टर यांचें सामान या जिल्ह्यांत आहे त्याचा लिलाव तारीख ७ आगष्ट सन १८७५ इसवी रोजीं परतवाडा जिल्हा इलिचपूर येथें डिपुटी कामिशनर साहेबांचे कचेरींत होईल.

ता. ८ जुलै सन १८७५ इसवी.

परशराम जगन्नाथ
शिरस्तेदार.

J. T. Bushby.
डिपुटी कमिशनर
जिल्हा इलिचपुर.

NOTICE.

The property of the late Dr. Sinclair now within the jurisdiction of the Deputy Commissioner Elichpur District will be sold by public auction at the Deputy Commissioner's Kutcherry on the 7th August 1875.

J. T. Bushby.
Deputy Commissioner
Elichpur District.

## नोटिसा.

नोटिस— राजश्री शामलाल कन्हयालाल दुकान कसबे खामगाव यांस खालीं सही करणार याजकडून नोटिशीचा जबाब देण्यांत येतो कीं तुह्मी आह्मास तारीख १० माहे जुलै सन १८७५ इसवीची नोटिस दिली कीं आमचा हिशेब झाला नाहीं तर मुळींच तुमचा आमचा हिशेब होण्याचा नाहीं. आमचे येथें हरी उत्तमचंद हे येऊन त्याचेशी रुईचा व्यापार होऊन त्याचे मार्फतीचे व्यापाराबद्दल जो कायहिशेब समजाऊन द्यावयाचा होता तो हिशेब देऊन त्याबद्दलची आह्मी त्याजपासून पावती घेतली आहे. तुमचा आमचा या व्यापारासंबंधी कांहींच संबंध नसोन या व्यापाराबाबद आह्मी तुह्मास ओळखत नाहीं. सदर्हू इसम हरीचंद मालकीप्रमाणें येथें येऊन त्याचेशीच व्यापार केला आहे. याजकरितां आमचेकडे कांहीं जबाबदारी नसून या व्यापारांत कांहीं तुमचा संबंध असल्यास तुमची जबाबदारी हरीचंद याजकडे आहे त्याची माहिती आह्मांस नाहीं. कळावे तारीख २४ जून सन१८७५ इसवी.

( सही ) बाबारावजी पिंगळे
रहाणार कारंजे
दस्तुर खुद

नोटिस.

रा. श्रीराम सांगिदास दुकान नांदुरा तालुके मलकापूर यास शिवरतन शंकरलाल दुकानचे मालक रामरख चुनीलाल याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, नांदुरे बाजारांत दुकानें करण्यासाठीं सरकारानें जमिनीचे नंबर करून दोनदोन नंबराचा एक गट असे विकले, फुटकळ नंबर विकला नाहीं त्यामुळें तुह्मी व आह्मी मिळून एक गट घेतला व दोघानीं रुपये दिले त्यास सुमार ७।८ वर्षें झालीं असतील. ते नंबर हल्लीं सरकातून आपले ताब्यांत आले आहेत आणि त्याव तुह्मी एकल्यानीं चबुत्रा बांधला असें आह्मास समजलें त्यावरून आमचा नंबर आमचे स्वाधीन करून द्यावा ह्मणून तुह्मास कळविलें असतां देत नाहीं. याजकरितां तुह्मास या नोटिशीनें कळवितो कीं, ८ दिवसांचे आंत आमचा नंबर आह्मास द्यावा, नाहींपेक्षां तुह्मी त्यावर ओटा घातल्यापासून दरमहा ५ रुपयेप्रमाणें भाडें तुह्मापासून घेतले जाईल. व सरकार मार्फत नंबरही घेतला जाईल. कळावें तारीख २९ माहे जुलै सन १८७५ इसवी.

ताजाकलम— या नोटिशीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल कळावे.

( सही ) रामरख चुनीलाल
दस्तुर खुद,

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० आपली व माझी पहिलीच प्रसंगाची वेळ आहे करितां विनंती करितों कीं येत्या अंकांत माझ्या चार ओळीस जागा देण्याची मेहेरबानी व्हावी.

मी परदेशचा रहिवासी असून मजला आज कांहीं काम असल्यामुळें मलकापुरास जाणें भाग पडलें. माझें काम आटपल्यावर मी गांव पहाण्याकरितां निघालों तर गावांतील रहदारी वगैरे साधारण बरीच होती व रस्तेही गावास शोभण्यासारखे दिसले. पुढें मी बारावर दोन वाजतां नामांकित जो नेमिवंताचा वाडा तो पहाण्याकरितां गेलों तो वाडा बराच मोठा असून रमणीय आहे. तेथें कांहीं मध्यम वयाचे लोकांनीं गंजीफा व कांहीं लोकांनीं पत्ते व कांहीं लोकांनीं गंजिफ्याची मावशी यांचा स्वीकार केला होता. मी ज्या मजल्यावर जावें त्यावर आपला माझी रामाची दुक्कल कोठें माझा अठ्ठ्या हुकूम कोठें? कोठें दहा, पंचवीस याशिवाय कांहींच ऐकण्यांत आलें नाहीं. बरें तेथून राममंदिरांत गेलों तों तेथेंही आठ दहा वर्षांचीं मुलें सोंगट्या घेऊन खेळतातच आहेत. बरें पुढें वाटेंत महादेवाचे रस्त्यावर कच्चेबारा पावबारा असा आवाज हळूच कानीं आला तो खरा किंवा खोटा हें समजण्यासाठीं जरा तेथें उभा राहिलों तों एका मिनिटानें मोठाच आवाज कानीं पडला तो ऐकून तर मी फारच चाकित झालों. नंतर मी महादेवाचे दर्शनास गेलों तेथें मात्र दहा वीस भिक्षुक मंडळी जमून अभिषेक चालविला होता. त्या अभिषेकाचें कारण विचारितां असें कळलें कीं महामारी साहेबांचा उपद्रव फार आहे सबब हा अभिषेक चालविला असें ऐकून मात्र मनास आल्हाद झाला परंतु पुराण किंवा वेदघोष हें कोठेंच ऐकिलें नाहीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. पत्रविस्तार फार झाला सबब पुरें करितों यांतील कांहीं राहिलेला मजकूर पुढील अंकांत लिहून कळवीन हीं विनंती. तारीख २६ माहे जुलै सन १८७५ इसवी.

आपला
फिरस्ता

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. खालील चार ओळीस आपले येत्या अंकीं जागा द्याल अशी आशा आहे.

'जो येतो तो मागल्यास बरा ह्मणवितो' अशी एक पूर्वापार वडिलांची ह्मण आहे. हीस जरी अपवाद आहेत तरी ते आढळास थोडेच येतात. आपले दयाळू इंग्रज सरकारचे राज्यांत जीं अनेक खातीं आहेत. त्यांत बहुतकरून मुलकी, दिवाणी वगैरे इतर खात्यांत जरी आढळले तरी मुख्यत्वें करून पोलिस खात्यांत ( जें खातें मुद्दाम रयतेचे संरक्षणार्थ काढलें आहे ) तर असे अपवाद सांपडणें ह्मणजे पाक्षीकच; कारण ह्या खात्यांतील कांहीं कामदार लोकांच्या वाईट वर्तणुकीबद्दल वारंवार अशा गोष्टी ऐकण्यांत येतात कीं त्यापासून सरकारानें अशा महत्वाच्या खात्यांत चांगल्या लोकांची भरती न करितां अशिक्षित आणि गर्विष्ठ लोकांचा संग्रह कां व कोणत्या हेतूनें केला आहे असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. असें केल्यानें सरकारचे चांगले उद्देश सफळ न होतां उलटा गैरफायदा होऊन सरकारास विनाकारण दोष लागतो. असो:—

कसबे पातूर शेखबाबू तालुके बाळापूर येथें आज सुमार पांच वर्षांत दोन चीफ का० प्रथम मि० मनवरअल्ली आणि मागाहून मि० यासिनखान होऊन गेले. त्या उभयतांची वर्तणूक, सहनशीलता आणि आपले सरकारी कामांत दक्षता ह्याजबद्दलची कीर्ति आहे. परंतु हल्लीं जे नवीन, विद्वान, हुशार, आणि चतुर ह्मणविणारे मि० हफीसोदीन चि० का० शेगावाहून नुकतेच बदलून येथें आले आहेत त्यांनीं सुमारें २९ असामींस ( येथें ३४ वें कलम लागू नसतां ) चार दोन टोपल्या त्यांचे घरांत केर निघाल्यावरून व त्यांस सफाई ठेवण्याबद्दल अगाऊ योग्य सूचना न देतां, त्यांचे अब्रूकडे अलक्ष करून विनाकारण १० कोस बाळापुरास रवाना केलें. पण मि० गोविंदराव तहशिलदार यांनीं ( असें ऐकतों कीं ) सदरहु २९ मनुष्यांपैकीं दोन मनुष्यांस थोडासा दंड करून बाकीच्यास तोंडी समज देऊन परत गावीं जावयास परवानगी दिली.

एडिटर महाराज आतां पत्रविस्ताराच्या भयास्तव हें पत्र पुरें करून आमचे चीफ कानस्टेबल यांस इतकेंच सुचवितों कीं ज्या हेतूनें सरकारानें त्यांची नेमणूक ह्या जाग्यावर केली आहे तेवढेंच काम त्यानीं उत्तम रीतीनें बजाऊन गावांतील लोकांशी स्नेहभावानें वागून आपली कीर्ति व पदवी वाढऊन घ्यावी.

पाऊसपाणी वगैरे आजपावेतों बराच आहे व शेतकरी लोक पेरण्याचें काम फार झपाटून करीत आहेत. हवेचा उपद्रव येथें सुरू आहे. गावांत ह्या बाईच्या शांत्यर्थ सप्ताहाची व जेवणावळीची जाती जातीमध्यें बरीच गर्दी उडाली परंतु अजून शांतता झाली नाहीं. कळावें लोभ असावा ही विनंती.

एक
( क्ष )

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. महाराज मी कांहीं कामानिमित्त फिरत फिरत मेहेकर तालुक्यांत मौजे लोणी येथें आलों व मजल फार झाली होती ह्मणून तेथेंच राहिलों. तेथें लटपटे जमादार कामावर पागोटें घालून येऊन एका कुणब्यास बोलावून विच्यारूं लागले कीं, तुझें गवत कोणी चोरलें? तो ह्मणाला कीं, माझें गवत मुळींच चोरीस गेलें नाहीं. नंतर त्याला हरप्रकारें विच्यारलें; पण त्याचें गवत मुळींच चोरीस गेलें नाहीं तर तो सांगेल तरी काय! बरें, आह्मा अडाणी लोकांची समजूत

अशी आहे कीं, नवीन कायद्याप्रमाणें फिर्यादीनें लेखी अर्ज दिल्याशिवाय घेऊं नये, कारण खोटा ठरल्यास त्याजवर मुकद्दमा करण्यास बरें पडतें. तेव्हां ज्यानें ही खबर पोलिसास दिली असेल त्याजवर मुकद्दमा करणें रास्त आहे.

हे जमादार ७० रुपयांचे चीफ कान्स्टेबल असून वाढत वाढत १२ रुपयांचे हेड झाले आहेत. पाहिलें असतां यांत यांची कसूरही नाहीं. कारण ज्याप्रमाणें वरिष्ठांनीं हुकूम दिला त्याप्रमाणें वर्तलेंच पाहिजे.

मग तेथून निघून तालुके मेहेकर या गावीं गेलों तों बाईसाहेबांचे डेरेदांडे तेथें ही दाखलच; पण तहशिलदार यांचें सफाईकडे चांगलें लक्ष्य असल्यामुळें गाव फार स्वच्छ असून व्यवस्था फार चांगली आहे, व त्यांचा स्वभाव चांगला आहे. लहान मोठ्यांस एकसारखे चहातात व काम मागें बिलकूल शिल्लक ठेवीत नाहींत. यांचा कित्ता दुसरेही तहशिलदार वळवितील तर त्यांस हितावह झाल्या वाचून राहणार नाहीं.

येथील शाळेची वगैरे स्थिति पहातां बरी आहे. व हिंदुस्थानी मुलीचे शाळेवरील मास्तर यांस बरोबर लिहितां वगैरे येत नसल्या कारणानें डिपुटी कमिशनर साहेबांनीं त्याला बडतर्फ करून त्याचे जागेवर राजणीकडील एक मुसलमान काजीचे जावई यांस नेमिलें.

मेडिकल खात्याकडील लोकांचीं एक दोन पत्रें आपले सुंदर पत्रीं छापलींच आहेत. ते पैशाचे किती लालची असतात तें लिहावयास नको.

पोलिसाची रड आहे ती आहेच.

येथील पोस्टमास्तर कांहीं थोड्याच कारणावरून बडतर्फ झाले होते; पण तें सर्व निवारण होऊन आतां ते आपल्या कामावर रुजू झाले. यांचा स्वभाव गरीब असून मनमिळाऊ असल्यामुळें हे सस्पिंड झाले तेव्हां सर्वांस चिंता लागली होती हल्लीं सर्वांस आनंद झाला आहे.

मागें आपले पत्रांत 'हांजी हांजी करणाराचें खंडन करणारा व त्याचें खंडन करणारा' अशीं दोन्ही पत्रें पाहून फार आश्चर्य वाटलें कारण 'ज्याचें खावें त्याचें गावें' ही जी ह्मण आहे ती बरोबर आहे. यांत नबाब यांजकडे कांहीं दोष नाहीं. त्यांनीं भाषण केलें तें सर्व रास्त व बरोबर आहे असें मलाच काय पण साऱ्या जगास वाटेल यांत संशय नाहीं.

बाईसाहेबांचें बळी घेणें अद्याप कमी होत नाहीं. परंतु हल्लीं पाणी वगैरे चांगलें झालें आहे. परमेश्वर करो व ती या तालुक्यांतून जावो. कळावे.

एक
आपलामित्र भगत.

## वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य ३० शके १७९७

## पारशांच्या धर्मगुरूवर लग्नसंबंधीं खटला.

सुरतेचे फर्स्ट क्लास माजिस्त्रेट रा. बा. शंकर पांडुरंग यांजपुढें पारशी जातीच्या दोन धर्माध्यक्षांवर एक फौजदारी मुकद्दमा नुकताच झाला होता त्याचा त्यांनीं निकाल केला त्याचें तात्पर्य आम्ही आपले वाचकांचे माहितीकरितां पुढें लिहितों:—

दोन धर्माध्यक्ष मि. मेरवानजी फ्रामजी व मि० जिवनजी डोसाभाई यांजवर असा आरोप होता कीं, पार्शी लोकांचे लग्नाविषयीं सन १८६५ चा १० वा आक्ट आहे त्याप्रमाणें त्यांनीं कोणा वधुवराचें लग्न लावून दिलें तर एक सर्टिफिकिट तयार करून त्याजवर वधुवराचे बापाच्या अथवा पाळकाच्या सह्या घेऊन तें रजिस्टराकडे पाठवीत जावें. त्याप्रमाणें त्यांनीं पिरोजबाई इचें मि० होर्मसजी याबरोबर लग्न लाविलें व सर्टिफिकिट तयार करून पाठविलें त्यावर तिच्या बापाची सही घेतली नाहीं.

या मुकद्दम्याची हकीकत अशी आहे कीं, पिरोज बाई ही १८ वर्षांचे वयाची एका पारशाची बायको होती व ती जारकर्म करूं लागली ह्मणून तिच्या नवऱ्यानें तिचा घटस्फोट ह्मणजे लग्नसंबंधी हक्क रद्द करण्याविषयीं फिर्याद केली होती तिचें काम चालत असतां पिरोजबाईचा बाप जमशेटजी हा माध्यस्थरीतीनें कोर्टापुढें येऊन उभयतांची समजूत पाडितों ह्मणाला व त्यानें मुलीला आणि जावयाला बहुतप्रकारें समजून सांगितलें पण मुलीनें त्याची गोष्ट ऐकिली नाहीं मग तो त्रासून मुंबईस निघून गेला व कोर्टानें पिरोज बाईचें लग्न रद्द ठराविलें. पुढें तिनें आपली ज्यावर आसक्ती होती त्या पुरुषाबरोबर ह्मणजे होर्मसजी बरोबर लग्न केलें तें लग्न सदरील मेरवानजी आणि जिवनजी यांनीं लाऊन दिलें आणि वधुवरांच्या सह्या आणि साक्षी घालून सर्टिफिकिट रजिष्टराकडे पाठऊन दिलें. रजिष्टरानें त्यावर बापाची सही नाहीं ह्मणून परत पाठविलें. नंतर त्यांनीं बापाची सही मिळविण्याची खटपट केली पण त्यानें सही दिली नाहीं. मग पिरोज बाईच्या आईची सही घेऊन सर्टिफिकिट परत पाठविलें. तेंही रजिष्टरांनीं मंजूर धरलें नाहीं व गैरशिस्त रितीनें लग्नविधी केला याजबद्दल त्यांवर मुकद्दमा करण्याविषयीं तें प्रकरण माजिस्त्रेटाकडे पाठविलें.

रा. बा. शंकर पांडुरंग यांनीं या बाबदींतील कायदा पाहून व मुकद्दम्याचा विच्यार करून ठरविलें कीं या कायद्याअन्वयें धर्माधिकाऱ्याचें कर्तव्य एवढेंच आहे कीं जीं वधूवरें लग्न लावण्यास उत्सुक असतील त्यांचीं पूर्वीं लग्नें झालेली असून ज्यांच्याशी लग्नें झालीं, ते जिवंत आहेत कीं काय हें पहावें. व लग्नें लाबून सही साक्षी घालून सर्टिफिकिटें रजिस्टराकडे पाठवावीं. तें काम त्यांनीं बरोबर रीतीनें केलें आहे. आतां दुसऱ्या मनुष्यानें सही केली नाहीं तर त्याचा दोष धर्माध्यक्षावर येऊं शकत नाहीं. दुसरें या कायद्याचें गुजराथी भाषांतर पारशी पंचायत यांनीं करविलें आहे. व तेंच बहुतेक पारशी लोकांत प्रसिद्ध आहे त्यांत "मा बाप अथवा वाली,, असे शब्द आहेत ते चुकीचे आहेत त्या ठिकाणीं बाप अथवा वाली असें पाहिजे आणि सरकारी भाषांतरांत तसें आहे. असो. २१ वर्षांचे वयाचे आंतील वधुवराचे लग्नाचे सर्टिफिकिटावर बापाची किंवा पाळकाची सही कायद्यानें अवश्य आहे हें खरें तथापि ती त्यांनीं केली नाहीं ह्मणून धर्माध्यक्षास अपराधी समजणें सर्वथैव अशुद्ध आहे. व हा लग्नसंबंधाचा पारशी लोकांचा कायदा अशा बाबदींत फार लंगडा आहे याजबद्दल आश्चर्य वाटतें असें सांगून माजिस्त्रेट साहेबानीं दोघाही आरोपितांस सोडून दिलें.

### हवापाणी.

सर्व हिंदुस्थानांतील पावसापाण्याचा आहवाल या महिन्यांतील तिसरे आठवड्यांचा, सरकारी ग्याझेटावरून समजतो तो येणेंप्रमाणें:—

मद्रास इलाख्याच्या उत्तर भागांत व मलबारांत पाऊस चांगला पडला. दक्षिण भागांत पाउसाची फार जरूर आहे. सिंध प्रांतांत कराची आणि हैदराबाद इकडे सपाट्याचा पाऊस पडला. नदीला पूर येऊन पुष्कळ पाणी चढलें आहे. गुजराथ, खानदेश, कोंकण व दक्षिण महाराष्ट्रदेश यांत खूप पाऊस पडला. दक्षिण देश, पुणें, आणि सातारीं इकडेही पाऊस पुष्कळ झाला. नगराकडे पाऊस कमी आहे. नागपूरप्रांत, वऱ्हाड, मध्यहिंदुस्थान, व रजपूतस्थान यांत पाऊस सर्वत्र असून पुष्कळ आहे. असाम प्रांतांत पाऊस थोडा पडला, तिकडे आणखी पाहिजे आहे. बंगालकडे पाऊस पडतो आहे परंतु गेल्या आठवड्यापेक्षां कमी आहे. राजशाई, भागलपुर, आणि पाटणा या जिल्ह्यांत फार लवकर चांगला पाऊस पाहिजे आहे. वायव्य प्रांतांत बनारस, अलाहाबाद, आणि बुंदेलखंड या जिल्ह्यांत भीज पाऊस पडत आहे. कानपूर, आग्रा, मिरत आणि रोहिलखंड या जिल्ह्यांत अधिक पावसाची जरूरी आहे. अयोध्याप्रांतांत, सितापूर जिल्ह्यांत पाऊस चांगला आहे. लखनौ जिल्ह्यांत थोडा आहे. आणि फैजाबाद जिल्ह्यांत अगदीं नाहीं- पंजाबप्रांतांत दिल्ली आणि हिसार जिल्ह्यांत पाऊस अगदी कमी आहे बाकी सर्वत्र चांगला पाऊस आहे.

## वऱ्हाड

अकोल्याचा आठवेड बाजार दोन तीन आठवड्यापासून पुन्हा भरू लागला आहे. पहिले दोन आठवेडे उपद्रवामुळें लोक त्रस्त होते, बाजार सुरू झाल्याची त्यांना समज मिळाली नव्हती, व पाऊस होता यामुळें बाजारबैठकीचें उत्पन्न ९ रुपये व १४ रुपये असे झालें. आतां बाजार बराच जमूं लागला आहे.

तळेगावचे ७५ रुपयाचे स्कुलमास्तर मि. दामोदर बाबुलजी यांनीं ६० रुपयाची एथील क्युरेटर आफिसांतील जागा पतकरल्यावरून त्या जागेवरील रा. गणेश अनंत वैद्य यास ७५ रुपयांवर तळेगावास मास्तर नेमिलें व त्याप्रमाणें २८ वे तारखेस ते तिकडे गेले. त्यांनी च्यार्ज्य घेतल्यावर मि० दामोदर येथें येतील.

बुलढाण्याचे गेंडल साहेबास सेशन कमिट करून मुंबईस पाठविलें परंतु त्यास कौंटी जेलमध्यें ठेवण्यास ज्या योग्य अधिकाऱ्याचें सर्टिफिकिट लागत असतें त्याचें नसल्यामुळें त्यास उमरखाडी चौकीवर नजर कैदेंत ठेविलें आहे असें समजतें.

गेल्या आठवड्यांत उमरावतीस एका मुकद्दम्यांत मूर्तिजापुरकर देशमुख तर्फे मुंबईचे बारिस्टर मि. बळवंतराव मंगेश वागळे हे आले होते असें समजतें.

विलायतेस साल मजकुरीं गव्हाची फार चणचण झाली आहे व मुंबईहून तिकडे गहू जात आहेत. त्यामुळें मुंबईचे व्यापाऱ्यानीं चहूकडे गहू खरेदीकरितां अडते पाठविले आहेत. वऱ्हाड व नागपूर मिळून लाख पोत्यांची खरेदी झाली. यावरून या सालीं गरीब गुरीबास गव्हाचे दुर्भिक्ष्य होणार असें दिसतें.

येथील तहशिलदार रा. रा. गोविंदराज अय्या यांनीं २० वे तारखेपर्यंत आपणास अकोल्यास असूं द्यावे असें विच्यारिल्यावरून त्यांस तितके दिवसांची परवानगी मिळाली.

अडगावचे कोर्टास गोविंदराज मदती गेले होते तिकडे त्या मुदतींत कामाचा निकाल झाला तो असा:—

मुकद्दमे
४११ मागील शिलक
५३९ तारीख ११ जून पासून १५ जुलै पर्यंत नवे फैल.

९५२
७९९ पैकीं फैसल तारीख १५ जुलैपावेतों.
२५७ रा. रा. पुरुषोत्तम राव यांचे
५४२ रा. रा. गोविंदराज अय्या यांचे.

७९९

१५३ बाकी शिल्लक.

या आठवड्यांत पाऊस ह्मणण्यासारखा पडला नाहीं. रविवारीं रात्रीं व सोमवारीं सकाळीं भिजपाऊस लागला होता व बुधवारीं सायंकाळीं शिंपणें झालें आणि काल सायंकाळीं बराच पाऊस पडला.

येथील डिपुटी कमिशनर आफिसांतील क्लार्क आफ दि कोर्टचे जागेवर बाहेरून कोणी कायमचे इसम येणार आहेत व

ते येईतपर्यंत रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर यांस त्या जागेवर अक्टिंग नेमिलें आहे. तशीच डिपुटी क्लार्क आफ थि कोर्ट रा. येकनाथ मोरेश्वरची जागा तूर्त रिकामी आहे तिजवर रा. परशराम गणेश स्मालकाज कोर्टातील कारकून यांस अक्टिंग नेमिलें व वासुदेवरावयांचे जागेवर रा. आपाजी बळवंत असिस्टंट. कमिशनरचे शिरस्तेदार यांस नेमून त्यांचे जागेवर रा. मोरो जनार्दन यास नेमिलें. स्माल काज कोर्टाकडे परशरामपंताचे जागेवर रा. शामराव रामचंद्र जुडिशीयल कमिशनर आफिसपैकीं यांस नेमणार

महामारीच्या उपद्रवाची गर्दी होती तेव्हां वकील मंडळींत संकेत झालाहोता कीं च्यार दिवसांत उपद्रव कमी होईल तर रा. रा. यशवंतराव महादेव ऊर्फ देव मामलेदार यांचे नावानें एक ग्रामसंतर्पण करावें व त्याप्रमाणें उपद्रव कमी झाला असें दिसून आल्यावरून मागील रविवारीं एक ब्राह्मण भोजन झालें. तसेंच रा. धोंडू नारायण स्टांपवेंडर यानें महामारीचा उपद्रव कमी होऊन गावांत शांति झाली या आनंदोत्साहाकरितां आपले एकस्याचे खर्चानें राजेश्वरीं अभिषेक व सप्ताह करविला आणि कालरोजीं गावसमाराधना केली. या गृहस्थाच्या औदार्याबद्दल, व धर्मवासनेबद्दल आह्मी याची वाखाणणी करितों. राजेश्वर सभेच्या इमारत बांधण्याच्या कामींही त्यांनीं पुष्कळ श्रम केले.

मलकापुरचे आनररी माजिस्त्रेट मि० काजी महमद हे हगवणीचे योगानें दोन तीन महिने आजारी होते ते गेले मंगळवारीं मरण पावले त्यांचे चिरंजीव मि० बद्रोदीन यांस आनररी माजिस्त्रेट नेमिलें असें कळतें.

आमच्या येथील उडदू अकबार पत्राचे उडदु भागाचे एडिटर मि० महमद मुर्तुजा लखनौहून आलेले येथें आजारी पडल्यावरून दोन महिन्यांची रजा घेऊन परत लखनौस गेले. ते दुरुस्त होऊन पुन्हा आपले कामावर लवकर येवोत असें आह्मी इच्छितों.

खामगावास महामारीचा उपद्रव आतां बिलकूल नाहीं असें पत्र आल्यावरून समजतें.

हैदराबाद कंटिंजेंटमध्यें आतां नवीन भरती करावयाचे प्रसंगीं दक्षिणी किंवा मुसलमान लोक ठेवावयाचे नाहींत, पंजाबी सिकलोक ठेवावे असा विच्यार झाला आहे असें कळतें व या आठवड्यांत त्या पलटणीचे भरतीकारितां ७० सिकलोक पंजाबांतून येथें येऊन इंग्लीस जाणार आहेत.

येथून मुंबईस खजिना जाणार होता तो बुधवारीं प्यासेंजर गाडीबरोबर गेला. रुपये पेपर करेन्सी खात्याकडील २९ लक्ष होते. त्याबरोबर मि० नौलिस साहेब असिस्टंट कमिशनर, मि० जेमिसन साहेब पोलिस सुपरइंटेंडेंट, व त्यांचे १४ लोक गेले आहेत तसेच पेपरकरेन्सीकडील एक क्लार्क व खजिन्याकडील दोन शिपाई गेले आहेत. हा खजिना पोचविण्याचे कामीं रेलवे च्यार्ज्य सुमारें २०००रुपये व ही मंडळी जाऊन येण्याकरितां खर्च १००० मिळून ३०००रुपये लागले असें समजतें. खजिन्याचे वजन११४२मणहोतें.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं मे. शाबासखान ज्यानीं बाळापुरास नुकतेंच तहशिलदारीचें काम केलें आहे त्यांस वाशीम जिल्ह्यांत मंगरूळ पीर येथें नवा तालुका झाला त्यावर कायम तहशिलदार नेमिलें, असें खासगी बातमीवरून कळतें. दुसरी जागा यवतमाळ जिल्ह्यांत झाली तिजवर कोणी हैदराबादेहून अय्या येणार अहित असें ऐकतों. सप्तंबरचे पाहिले तारखेपासून या तहशिलीचीं कामें चालू होतील

अकोल्यास महामारीचा उपद्रव सुरू झाल्याचे प्रसंगीं म्युनिसिप्यालिटीनें स्वच्छतेकरितां अधिक लोक व गाड्या वगैरे ठेविल्या त्या कामीं ४०० रुपये खर्च आला असें समजतें.

मि० स्टिविनसन पोलिस इन्स्पेक्टर तीन महिन्यांचे रजेवर हैदराबादेस जाणार त्यांचें काम पाहण्यास मि० स्यावियल हेड क्वार्टर पोलिस इ० यांस नेमून त्यांचे कामावर मि० रामजी शाळिग्राम यांस अक० नेमिलें आहे. व रामजी शाळिग्राम यांस ती जागा कायमची मिळावी अशी आमच्या उडदु अकबारकर्त्या बंधूनीं काल च्या पत्रांत शिफारस केली आहे.

अकोटाकडे महामारीचा उपद्रव अधिक आहे तहशिदारानीं लोकांकडून वर्गणी जमवून त्यांस ईश्वराची आराधना करण्यास सांगितलें आहे. उ. अ.

उमरावती —— जुडिशियल कमिशनर साहेबांपुढें १२ वे तारखेस सेशन आहे त्याकरितां ते व रा. रा. भास्कर सखाराम त्यांचे क्लार्क ११ वे तारखेस उमरावतीस जातील. तिकडून परत आल्यावर २० वे तारखेस पुन्हा येथें सेशन आहे.

**बुलढाणें**— तारीख ३० जुलै रामण्णा पोलिस कान्स्टेबल यानें भांडणामध्यें रागाचे आवेशांत हणवंतु बेडर यास काठी मारली ती वर्मी लागून तो ठार मेला याजबद्दल ३०४ क० प्रमाणें रामण्णावर माजिस्त्रेटापुढें चौकशी चालू आहे.

हिराशिंग, गंगाराम व भूपशिंग हे सीक जातीचे फिरस्ते चिखली तालुक्यांत फिरत असतां त्यांची स्थिति बरोबर न दिसल्यावरून तेथील पोलिस इन्स्पेक्टर मि. बलदेवसिंव्ह यांणीं जून महिन्यांत त्यांस पकडून बुलढाण्यास नेलें होतें पण त्यावेळीं त्यांचे नशीब चांगलें ह्मणून माजिस्त्रेट साहेबांनीं त्यांस सोडून दिलें होतें. आतां गेले सोमवारीं रात्रीं सदर्हू लोक बुलढाण्यास नरभेराम मारवाडी याचे घरांत गेले व त्याचा मुलगा चतुर्भूज याजवळ रुपये होते ते मागूं लागले व तो देईना ह्मणून त्याचे पोटांत चाकू खुपसून त्याचीं अतडीं बांनीं बाहेर काढिलीं व रुपये घेऊन त्याचे घरास आग लाविली. पुढें तें घर जळत आहे असें पाहून विजाविण्याकरितां पोलिसचे लोक धावले व त्यांस घरांत चतुर्भुज जखमी झालेला आढळला पुढें माजिस्त्रेटानें चतुर्भुजाची जबानी घेतली त्यांत त्यानें झालेला सर्व मजकूर सांगितला. शीक लोकांस कैद केलें आहे व चौकशी चालू आहे.

**मलकापुर**— येथें चोऱ्या फार झाल्या, व होत आहेत ह्मणून बंदोबस्ताकरितां बुलढाण्याहून मि. बलदेवसिंव्ह पोलिस इन्स्पे० २९ वे तारखेस येथें आले आहेत.

**मेहकर**— तारिख २८ जु० येथें हल्लीं रोगराई बिलकूल नाहीं. पर्जन्य ही उघडला आहे. पिकें उत्तम प्रकारची आहेत. वाख्याचा उपद्रव लोणार, खेलडा, सुलतानपूर इकडे अजून चालू आहे.

मेहकरास दिवाणी कामें चालत नसल्यामुळें रयतेस फार त्रास होतो याचा वरिष्ठ अधिकारी विच्यार करून तहशिलदारास अधिकार देतील तर लोकांची मोठी सोय होईल.

**उमारावती**—ता. ३० जुलै १८७५इ. या आठवड्यांत ह्मणजे तारीख २३ पासून २९ पावेतों महामारीच्या आजारानें २६ आजारी झाले व १० मेले तारीख २९ रोजीं या रोगानें कोणी आजारी झाले नाहीं यावरून रोग नाहींसा होण्याची आशा दिसत आहे. पुढील आठवड्यांत खुलासा होईल. तालुक्यांत अजून चालू आहे. रेलवे स्टेशनमास्तर रा. विष्णु सखाराम याजला परवा महामारीचा उपद्रव झाला होता परंतु ईश्वर कृपेनें ते बरे आहेत.

पो० चे इन्स्पेक्टर जनरल मे० लेन साहेब व सुपरइंटेंडेंट मि. राइट साहेब हे उभयता तारीख २७ मिनहूस इलिचपुरास गेले आहेत. मि. काटग्रेव सुपरइंटेंडेंट यांचे येथें मेजवानीचा समारंभ आहे असें समजतें. उद्या परत येतील.

**कारंजा**— तारिख २९ जुलै १८७५ ह्या आठवड्यांत येथें एकंदर मनुष्यें ५० लागलीं त्यांतून ११ मरण पावलीं. ता. २४।२६ पर्यंत एकसारखा रात्रंदिवस पाऊस पडत होता. हवा हल्लीं बिघडली आहे. व गावांत तुरळक तुरळक हागवणीचाही उपद्रव सुरू आहे. लोक हवालदील झाले आहेत. आतां ही बाई आपला पाय लवकर काढील तर बरें आहे. तारिख २८ रोजीं अनुष्ठानें उठलीं परंतु बाईचा पाय अजून उठला नाहीं.

मे. अबदुल हक सा० यांणीं एका दिवाणी मुकद्दम्यांत भाउशिंग याणें सावकारास रु० दिल्याबद्दल बनाऊ पावत्या केल्या आहेत. त्या पाहिल्यावरून पांच इसम कैद करून सेशन कमिट केले. आरोपी गुन्ह्यास कबूल आहेत. पुढें सेशनांत काय होतें तें पहावें

मु. काजळेश्वर येथें या आठवड्यांत ३५ मनुष्यें लागलीं पैकीं १० मरण पावलीं व तेथें एक दोन दिवसापासून मनुष्यें लागण्याचें मान कमी आहे.

**वणी**—तारिख २८ जुलै १८७५— सांप्रत इकडे पर्जन्य असा पाहिजे तसा पडत आहे. पिकें उत्तम प्रकारचीं आहेत. हवेचा वगैरे कोणत्याही प्रकारचा उपद्रव नाहीं. व यंदाचे सालीं कधींच या सर्व जिल्ह्यांत झाला नाहीं.

वणी येथें पुष्कळ रुपये खर्च करून तलावांतील गाळ वगैरे काढून तो दुरुस्त केला आहे; परंतु गावांतील पाणी त्यांत न जावें याकरितां सभोंवतालीं त्यास बांध घातला आहे त्यामुळें कोणीकडूनही पाणी त्यांत जाण्यास वाट राहिली नाहीं. फक्त वरून पाणी पडेल तितकें त्यांत जमावें अशी स्थिति केली आहे यामुळें अद्याप पर्यंत त्यास पाणी आलें नाहीं. व जें बरून पडतें तें जिरून जातें याकरितां एक्झिक्युटिव इंजिनियर त्यांत बाहेरून पाणी घेण्याची कांहीं तजवीज करतील तर बरें होईल.

येथें सर्व सरकारी कामदार एकमेकाशीं सलुख्यानें आहेत. ही मोठी आनंदाची गोष्ट होय. हल्लीं तहशिलदार गावगन्ना फिरावयास गेले आहेत. व शहरामध्यें स्वच्छता वगैरे फार उत्तम प्रकारची आहे.

**मूर्तिजापुर**—तारीख १० जु० येथें ही अकोल्याप्रमाणेंच उपद्रवाचा कहर झाला. येकेदिवशीं ९।१० मनुष्यें मेलीं. रोज दोन तीन हा क्रम तर चालूच आहे. परमेश्वर कृपा करील तो दिवस सुदीन.

अडमाव कोर्टांतील मिसला हरवल्या होत्या त्या कोर्टाच्या भिंतीआड सापडल्या.

रा. गोविंद हरि मलकापुरचे माजी वकील ह्यांची नाझरसंबधानें मलकापुरास चवकशी होऊन त्यांस २०० रुपये दंड झाला. उ. अ.

## वर्तमानसार

लार्ड नार्थब्रूक हिंदुस्थानेच गवरनर जनरल पुढील सालच्या मार्च्य अगर एप्रिल महिन्यांत खचीत विलायतेस जाणार व त्यांच्या जागेवर डयूक आफ बकिंगहाम मद्रासकरितां येणारे गवरनर यांची नेमणूक होईल असें खासगी पत्राधारें टा. पत्रांत पुन्हा लिहिलें आहे.

मुंबई इलाख्यांतील पोलिसाचे पगारा विषयीं.

| | प्रत्येकी पगार |
|---|---|
| ३ फर्स्ट ग्रेट सुपरइंटेंडेंट | १००० |
| ५ सेकंड ,, ,, | ८०० |
| ६ थर्ड ,, ,, | ७०० |
| ४ फोर्थ ,, ,, | ६०० |
| ४ फिफ्थ ,, ,, | ५०० |
| २ फर्स्ट ग्रेड असिस्टंट सुपरइंटेंडेंट | ५०० |
| ३ सेकंड ,, ,, | ४०० |

एम एची परीक्षा मुंबईस तारीख १५ नोवेंबर रोजीं सुरू होईल.

ग्वालेरचे अलिजा बहादुर शिंदे प्रांतांत फिरावयास निघणार आहेत. व रजपुत

संस्थानचा कांहीं भाग पाहून नोवेंबरांत प्रिन्स आफ वेल्सचे समारंभाकरितां मुंबईस येणार असें वर्तमान आहे.

पंढरपुरास साल मजकुरीं आशाढीची यात्रा थोडी भरली होती. व उपद्रवही थोडाच होता.

डा. नारायण दाजी यांचे जाग्यावर मि. नाना मोरोजी मुंबईस शेरीफ झाले.

बडोद्याचे काजी शाबुद्दीन साहेब यांस नवानगरकडे जागा मिळणार.

मि. दिनशा अर्देसर तालियार खान यास बडोद्यास ९०० रुपयांवर म्युनिसिपल कमिशनर नेमिलें.

पुण्यास सदाशिव पेठेंत नारायणभट केळकर यांचे बायकोस तीन मुली जुळ्या झाल्या.

मि. हिल यास बडोद्यास चीफ इंजिनियर नेमिलें.

श्री० मल्हारराव गायकवाड यांजबरोबर डा० सिवार्ड आहेत त्यांस सहा महिने पावेतों दरमहा १००० रुपये द्यावे व पुढें राहिल्यास ९०० रुपये द्यावे असें ठरलें आहे. पैसा बडोद्याचे खजिन्यांतला !

कलकत्यास सर रिचर्ड ग्यार्थ यांस हायकोर्टाचे चीफ जस्टिस नेमिलें.

सिमला येथें १९ दिवसांत ७३ मनुष्यें महामारीनें आजारी झालीं व त्यांपैकीं ९९ मरण पावलीं असें समजतें. उत्तम हवेच्या व स्वच्छतेच्या ठिकाणीं देखील या बाईची धाड आहेच.

डा० नारायण दाजी यांच्या मृत्यूचें वर्तमान दुसरीकडे लिहिलें आहेच आतां असें कळतें कीं त्यांची एकुलती एक मुलगीही महामारीनें गेल्या बुधवारच्या मागील बुधवारीं मरण पावली.

बडोद्याचे भाऊ पुणेंकर यांवर खोटी शपथ केल्याबद्दल फौजदारींत सुरतेच्या सेशन जडजाकडे बाकरअली यांच्या संबंधांत अर्ज झाला होता पण तो नाकारला गेला.

रा. सा. विश्वनाथ गोविंद चोळकर यांस कोल्हापुरास न्यायाधीश नेमिलें.

मि० अंबालाल साकरलाल देसाई यांस बडोद्याच्या गायकवाडाचे शिक्षक नेमिलें.

जस्टिस मेलविल मुंबईच्या हाय कोर्टाचे जडज विलायतेस रजेवर आहेत त्यांनीं आणखी ४ महिने रजा वाढविली आहे व तोंपर्यंत जस्टिस नानाभाई हरीदास हे जडज रहातील.

शिंदे सरकार जयपुरास जाणार आहेत त्यासाठीं तेथें मोठी तयारी चालू आहे.

प्रिन्स आफ वेल्स जानेवारीचे ११वे तारखेस दिल्लीस जातील व १० दिवस तेथें रहातील असें समजलें आहे.

मुंबई इलाख्यांत पुणें व अमदाबाद येथें मात्र स्माल काज कोर्टें कायम ठेवून बाकीं सर्व बंद करणार असें समजलें आहे.

बडोद्याचे प्रसिद्ध नाटकपात्र दामोदर पंत नेने यांस तेथील छावणींत रहाण्याचा हुकूम झाला असें ह्मणतात.

गुजराथेंत डाकुर आणि पाली यांचे दरम्यान रेलवे करण्यास नोवेंबरपासून सुरुवात होईल.

पुण्यास महामारीचा आजार पुन्हा उद्भवला. कालच्या शुक्रवारच्या मागील शुक्रवारीं ६ मनुष्यें मेलीं.

पुण्यास महापूर येऊन नदीचें पाणी ओंकारेश्वराचे देवळांत खेळत होतें.

कोलापुरास सोळावे तारखेपासून ९।१० दिवस पुष्कळ पाऊस पडला.

बडोद्यास १९ सावे तारखेपासून चांगला पाऊस पडूं लागला आहे.

पोलिसाची नवी व्यवस्था बडोद्यास होत आहे त्यांत तीन इन्स्पेक्टर युरोपियन नेमणार असें वर्तमान आहे.

काठेवाडचे पोलिटिकल एजंटानीं ठराव केला कीं आमचेकडे अर्पिलें आणणारांनीं तीं इंग्लिश भाषेत लिहून आणलीं पाहिजेत.

जोधपुरचे राजाला इंग्लिश सरकारानें दरसाल दरशेकडा ५ रुपये व्याजानें २४ लक्ष रुपये कर्जाऊ दिले.

झांजिबारचा सुलतान विलायतेस गेला आहे तेथून फ्रान्स देश पाहण्याकरितां तो तिकडेही गेला आहे.

ईस्त इंडिया रेलवे कंपनीनें युरोपियन गार्ड काढून नेटिव गार्ड नेमण्याचा झपाटा लाविला तशी इंग्रजी वर्तमानपत्रकर्त्यांनीं बरीच ओरड केली कीं असे युरोपियन लोक इतक्या दूर आलेले बायका मुलांसुद्धां रिकामे करणें अन्याय होय; त्यावरून असो किंवा दुसरे कांहीं कारणावरून असो हिंदुस्थान सरकारानें त्या रेलवे कंपनीस हुकूम दिला कीं अशा प्रकारें मनुष्यें कमी करून रिडक्शन करूं नये, त्यापेक्षां खात्याचा मुख्य एकादा कमी करून खर्च वाचवावा.

---

## सुभाषित श्लोक.

भिक्षो कंथा श्लथा ते नहि शफरि बधे जाल मश्नासि मत्स्यां,

स्तेवै मद्योपदंशाः पिबसि मधु समंवेश्यया यासि वेश्यां ?

दत्वांध्रिं मूर्ध्न्यरीणां तव किमु रिपवो भित्ति भेत्तास्मि येषां,

चोरोसि द्यूतेहतो स्त्वयि सकल मिदं नास्ति नष्टे विचारः ॥ १ ॥

एक गृहस्थ एका स्वामीस ह्मणतो. स्वामिराज आपली गोधडी फाटकी आहे?

स्वामी ह्मणतात—ही गोधडी नव्हे तर हें मासे मारण्याचें जाळें आहे.

गृहस्थ— आपण मासे खाता कीं काय?

स्वामी— दारूशीं तोंडीं लावितों.

गृ०— तर महाराज दारू पिता काय ?

स्वा०— कलावंतिणीसहित पितों.

गृ०— वेश्येकडे जाता काय ?

स्वा०— शत्रूच्या डोकीवर पाय देऊन जातों.

गृ०— तुमचे कोण शत्रू ?

स्वा०— अरे ज्याची भिंत फोडतो ते.

गृ०— तर काय चोरी सुद्धां करिता ?

स्वा०— फक्त जुगारा करितों मात्र करितों.

गृ०— भले ! महाराज ! ! एकूण आपण सर्व कर्मांत निष्णात आहा ?

स्वा०— नष्टाच्या ठिकाणीं विचार रहात नाहीं. सुज्ञानामृत.

## परमेश्वराची कृपा आणि मनुष्याचा प्रयत्न.

मनुष्य परमेश्वराच्या कृपेनें उद्धार पावतो. आणि त्याचीं कर्में कितीही जरी चांगलीं तरी त्यांच्याच योगानें त्याचा उद्धार व्हावा अशी योग्यता किंवा पुण्याई त्यांमध्यें कांहीं नाहीं. हें मत सर्व विनम्र व धर्मशील जनांस मान्य असून सत्य आहे. परंतु व्यवहारांत याचा भलताच अर्थ होण्याचें भय आहे. आपल्या उद्धारार्थ ईश्वराच्या अनुग्रहावरच भरंवसा ठेविला पाहिजे हा मूळ सिद्धांत मान्य करण्यास कांहीं अडचण नाहीं. तसेंच या सिद्धांतावरून निष्पन्न होणाऱ्या पूर्ण लीनता, शरणागत भाव, पराधीनता आदिकरून ज्या वृत्ति त्यांची अवश्यकता कबूल केली पाहिजे. आमचें ज्ञान कितीही असलें व आमचीं कर्में श्रेयस्कर झालीं तरी आमचीं कर्में शुध्ध व पवित्र करण्यास त्यांचा कांहीं उपयोग पडत नाहीं. दुर्बल, दुराचारी पतित असा जो पापी जन त्याच्यानेंच आपला उद्धार कदापि करवणार नाहीं. एक सर्वशक्तिमान परमेश्वरावाचून कोणाच्यानें त्यास त्याच्या पापाच्या क्लेशांतून सोडवणार नाहीं यास्तव स्वाभिमान अहंकार आणि ताठा सोडून अति लीनतेनें त्या परमात्म्यास शरण जाऊन त्याची करुणा भाकिली पाहिजे. हें सर्व ठीक आहे; परंतु येथें अशी शंका उत्पन्न होते कीं परमेश्वरावर सर्वपरी भार टाकून केवळ त्याच्या कृपेनें आपल्या उद्धाराची सर्व सिद्धि होईल अशा भरवशावर आपण स्वस्थ बसावें काय ? वर जें भय दाखविलें तें ह्या शंकेंतच आहे. उद्धाराचें कार्य सर्व परमेश्वरच करणार तर मग मनुष्यानें कांहींच करावयाचें नाहीं काय ? परमेश्वराच्या कृपेनेंच उद्धार होणार ह्मणजे ती कृपा निद्रित मनुष्यास आपल्या पाठीवर घेऊन स्वर्गीं उड्डाण करणार असा अर्थ काय ? असें असलें तर यांत पुष्कळांची खूब मजा होईल; कारण येणेंकरून पुष्कळांस आपल्या उद्धाराची तिळमात्र काळजी न करितां स्वस्थ बसून रहाण्यास आणि विषयासक्ति व दुराचरणें यांत समाधान मानण्यासही उत्तेजन येणार आहे. असें उत्तेजन मिळेल ही केवळ कल्पनाच आहे आहे असें नाहीं; अशाप्रकारचीं उदाहरणें खरीखुरींच पुष्कळ सापडतील. "असेल हरि तर देईल खाटल्यावरी" ह्या ह्मणीचा अर्थ परमार्थाकडे लावून चालणारे जन पुष्कळ आहेत. असे लोक साफ सांगतात कीं, आह्मास बहुत दिवस जडलेलीं व्यसनें सोडून देणें होत नाहीं, व काम क्रोधादि मनोविकारांचें आकलन करण्याची शक्ति आह्मास नाहीं, ह्मणून आम्ही ती सर्व खटाटोप सोडून देऊन आतां परमेश्वर आपल्या कृपेनेंच आमचा उद्धार करील या भरवशावर स्वस्थ आहों; परंतु ही त्यांची आशा कधीं पूर्ण होत नाहीं. कारण ती अशक्य आहे. जे कोणी स्वतः उद्योग व श्रम करणार नाहींत त्यांस परमेश्वर कधीं मदत करणार नाहीं. सु. प.


## जाहिरात.

पशु. पक्षी, कृमि व कीटक यांच्या नांवांसहित चित्रांचे कागद व पशु पक्ष्यांच्या वर्णनांचीं चित्रांसह पुस्तकें.

हा प्रयत्न, बालकांस मनोवेधक व आनंददायक असून शिक्षणास अत्यंत साह्यकारी होईल असा केला आहे.

१. चित्रांचे कागद— चित्रांचे वगैरे नमुने दृष्टीस पडावे ह्मणूनच काढला आहे. ह्मणून यांत पशु, पक्षी, कृमि व कीटक इत्यादिकांचें मिश्रण दाखविलें आहे. पण हे कागद लोकांच्या उपयोगी पडतात असें दिसून आल्यास पुढें जे कागद छापण्यांत येतील त्यांत अशीं मिश्र चित्रें येणार नाहींत. यांत अनुक्रमानें पशु, पक्षी, कृमि व कीटक याप्रमाणें निरनिराळे एकांगी कागद छापले जातील. ह्या प्रत्येक कागदाची किंमत आगाऊ ०॥६ पडेल.

२. चित्रांची पुस्तकें— ह्या पुस्तकाची आकृती, चित्रांचा नमुना आणि त्यांचें थोडक्यांत वर्णन असें काढणार आहों. त्याचे दोन भाग करून पहिल्यांत पशु, दुसऱ्यांत पक्षी येतील. ह्या दोनी भागां मिळून पृष्ठें सुमारें १९० होतील. त्यांची आगाऊ किंमत ०८ पडेल. व टपाल खर्च खेरीज पडेल.

ज्यांस हे कागद व पुस्तकें घेणें असतील त्यांणीं मुंबईस इंदुप्रकाशाकडे व पुण्यास ज्ञानप्रकाशाकडे पत्रें व किंमत पाठवावी दोनशें वर्गणीदार मिळतांच पुस्तकें छापण्याचें काम सुरू होईल. ता. १० जुलै १८७५

विष्णु मोरेश्वर थत्ते.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE

नोटिस.

RESTORATION OF THOROUGH COMMUNICATION.

थेट माल व उतारू नेण्याआणण्याची पुनः सुरुवात

या नोटिशी अन्वयें कळविण्यांत येतें कीं नरसिंगपुरचे जवळची लाईन जागोजाग पावसानें वाहून गेली होती ती दुरुस्त झाल्यावरून सर्व जातीचा माल व उतारू नेण्या आणण्याची पुनः सुरुवात करण्यांत येईल.

व प्रसिद्ध झालेल्या टाइम बिलाप्रमाणें पुनः ट्रेनी जातील व येतील.

हेनरी कांडर

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई तारीख १४ जुलै १८७५ इ.


---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

REGISTERED NO. 5, 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० ८ माहे आगष्ट सन १८७५ इ० अंक ३२

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## वसूल

| | रु. |
|---|---|
| रा. रा. श्रीराम भिकाजी जटार | ११०१३ |
| ,, ,, बजाबा रामचंद्र प्रधान | ६०८ |
| ,, ,, बळवंत बापूजी नायब तह. | १२ |
| ,, ,, रामचंद्र धोंडदेव स्टे. मास्तर | ५ |
| ,, ,, राजाराम बळवंत विद्यार्थी | ५ |
| ,, ,, भिकाजी भगवंत मास्तर | ५ |
| ,, ,, सेक्रेटरी नेटिव लायब्ररी परतवाडा | ४ |
| ,, ,, अमृतराव विनायक देशमुख | ६०८ |
| मि० शेख इमाम महमद फाजल | १०१५ |
| रा. रा. रामचंद्र पांडुरंग नायब तहशिलदार | १४०१४ |
| ,, ,, कृष्णाजी अनंत शिरस्तेदार | २ |
| ,, ,, धोंडबानाईक देडे | ६०९ |
| ,, ,, सखाराम मोरेश्वर खजिनदार | १२ |
| ,, ,, नारो रघुनाथ मोहोळकर | ६ |
| रा. बापूराव रजिस्टर कारकून | २ |
| ,, रूपराम श्रीराम मारवाडी | ०१४ |
| ,, गंगाधर गोविंद गोखले | २०८ |
| ,, चंद्रभान वलद बाबाजी देशमुख | ५ |
| ,, लिंगोजी पोताना | १०१००६ |
| मि० हिथ साहेब | ४०२ |
| रा. नारायण विठ्ठल स्कूल मास्तर | ७०९ |
| ,, हरी अनंत दांडेकर स्कूल मास्तर | ९ |
| ,, अमृतराव देशमुख अंदुरेकर | २७ |
| ,, रामकृष्ण गंगाधर मुळे | ११०१२ |

## पत्राच्या शिलकी बाक्यांवर व्याज द्यावें लागेल.

आमच्या कित्येक वर्गणीदारांकडे दोन दोन व तीन तीन वर्षांच्या बाक्या येणें राहिल्या आहेत त्या त्यांनीं आतां खानगी रीतीनें लवकर पाठविल्यास आह्मांवर त्यांची मोठी मेहेरबानी होईल व त्यांची आणि अमची दगदग चुकेल. आणि अशी त्यांनीं कृपा न केल्यास निरुपायामुळें त्या बाक्या कायदेशीर रीतीनें वसूल करणें आह्मांस भाग होईल; आणि तसेंच करावें लागेल तेव्हां प्रत्येक सालची बाकी घेण्यास योग्य झाल्या दिवसापासून तिचें व्याज दरमहा दर शेकडा दोन रुपये प्रमाणें जें आकारेल तें तिजवर चढवून वसूल करण्याची तजवीज केली जाईल हें सर्वांस अगाऊ कळविण्यांत येत आहे.

तसेंच साल दरसाल बाक्या मागण्या करितां इकडून वेळोवेळां पत्रें लिहिलीं आहेत व पुढें लिहिलीं जातील त्यांचा टपालखर्च व मुद्दाम मनुष्य पाठवावे लागल्यास त्यांचा खर्चही त्या त्या कुळांवर आकारला जाईल हेंही सर्वांस कळवें. तारीख ७ माहे नोवेंबर सन १८७४ इ०

खंडेराव बाळाजी फडके
वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## जाहिरात.

पशु, पक्षी, कृमि व कीटक त्यांच्या नांवांसहित चित्रांचे कागद व पशु पक्ष्यांच्या वर्णनांचीं चित्रांसह पुस्तकें.

हा प्रयत्न, बालकांस मनोवेधक व आनंददायक असून शिक्षणास अत्यंत साह्यकारी होईल असा केला आहे.

१. चित्रांचे कागद— चित्रांचे वगैरे नमुने दृष्टीस पडावे ह्मणूनच काढला आहे. ह्मणून यांत पशु, पक्षी, कृमि व कीटक इत्यादिकांचें मिश्रण दाखविलें आहे. पण हे कागद लोकांच्या उपयोगी पडतात असें दिसून आल्यास पुढें जे कागद छापण्यांत येतील त्यांत अशीं मिश्र चित्रें येणार नाहींत. त्यांत अनुक्रमानें पशु, पक्षी, कृमि व कीटक याप्रमाणें निरनिराळे एकांगी कागद छापले जातील. ह्या प्रत्येक कागदाची किंमत आगाऊ ०८६ पडेल.

२ चित्रांचीं पुस्तकें— ह्या पुस्तकाची आकृती, चित्रांचा नमुना आणि त्यांचें थोडक्यांत वर्णन असें काढणार आहों. त्याचे दोन भाग करून पहिल्यांत पशु, दुसऱ्यांत पक्षी येतील ह्या दोनी भागां मिळून पृष्ठें सुमारें १५० होतील. त्यांची आगाऊ किंमत ०८ पडेल. व टपाल खर्च खेरीज पडेल.

ज्यांस हे कागद व पुस्तकें घेणें असतील त्यांणीं मुंबईस इंदुप्रकाशाकडे व पुण्यास ज्ञानप्रकाशाकडे पत्रें व किंमत पाठवावी. दोनशें वर्गणीदार मिळतांच पुस्तकें छापण्याचें काम सुरू होईल. ता. १० जुलै १८७५

विष्णु मोरेश्वर थत्ते.

## नोटिस.

झांगी वलद सखाराम नाथ वस्ती वाडे गाव तालुके बाळापूर जिल्हे आकोले यासी वादी माधो बापूजी ठाकरे याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं आमचे रुपये ३९।=॥ वही खात्यावरून तुह्माकडे असून दोन वर्षांपूर्वीचे आहेत ते आह्मी तुह्मास एक दोन वेळा मागितले परंतु दिले नाहीं. ह्मणून तुह्मास नोटिस दिली. ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत रकम आदा करून देणें नाहीं तर रीतीप्रमाणें फिर्याद करून रुपये वसूल करण्यांत येतील कळावे तारिख ३ माहे आगष्ट सन १८७५ इसवी.

[ सही ] माधो बापूजी ठाकरे
वस्ती कजबे मजकूर.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. आपले ता. १८ माहे मजकूरचे पत्रांत ( ढ ) या सहीचें पत्र आहे त्यांत त्यानें "अपसव्यसाची" या शब्दाचा अर्थ विचारला आहे. त्यास अमरकोश कांड ( २ ) यांत ह्मटलें आहे कीं "सव्यं दक्षण वामयोः" यांत सव्य याचा अर्थ उजवा आणि डावा असा होतो. त्याप्रमाणें कदाचित् "अपसव्य" याचा अर्थ उजवा किंवा डावा होत असेल कळावे तारीख २९ जुलै सन १८७५

एक
मंगरूळचा विद्यार्थी.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. उचकी व आंव रक्त बंद होण्याविषयीं शारीर कृति— उचकी लागल्यास श्वासोश्वास एक दोन वेळां पोटांत ओढावा उचकी तात्काळ बंद होते. लागल्यास अनुभव घ्यावा- आंव रक्त पडत असल्यास उभें राहून पोट फुगवून जोरानें लघवी करावी एक दिवसांत बंद होते. सदरहू कृति प्रत्येक लघवीचे वेळेस करावी कळावें तारीख ३० जुलै सन १८७५ इसवी.

अनुभव घेतलेला
एक रोगी.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. मुक्काम मंगरूळ पिर तारीख २६ माहे मजकूर रोजापासून सालाबाद प्रमाणें उरूस भरण्यास शुरवात होणार होती. परंतु या गावचे आसपास महामारीचा रोग असल्यामुळें उरूस भरूं नये व लोक जमा होऊंनये ह्मणून बया. फिटझरल्ड साहेब डेपुटी कमिशनर जिल्हा वाशिम यांनीं हुकूम केला आहे. सदरहू साहेब चांगले असून यांची काम करण्याची ही शैली वर्णनीय आहे. ते गरीब लोकांचें हित पाहण्याविषयीं फार दक्ष असतात. त्यांचें शाळाखात्य कडेही फार लक्ष्य आहे. एथील गणेशमंदीर बांधण्याकरितां साहेबानीं १०० रुपयांची मदत दिली. आणि गावांतील लोकांनीं कांहीं वर्गणी करून सदरहू काम सेवटास नेलें. व येथें मुशाफर लोक उतरण्यास सुरवात झाली. व उतारू लोकांस फार सुख होऊं लागलें याकामाचे पुढारी वे० शा० सं० रा. रा. दाजी भटजी रामदासी यांनीं हें काम बांधण्याविषयीं फारच मेहनत घेतली. हे दररोज मधुकरी मागून ५०।६० ब्राह्मण जेऊं घालतात. व एथील चीफ कानस्टेबल रा. सूर्जेदीन हे हुशार असून आपल्या कामांत दक्ष आहेत. जरी ते सरकारी कामाच्या संबंधानें आपल्या हाताखालील लोकांस अप्रिय आहेत तरी लोकप्रिय असून आपल्या कामांत निष्णात आहेत. कळावे तारीख २५ जुलै १८७५ इसवी.

एक
मंगरूळचा रहिवासी

### मद्रास रेलवेकडील प्रवास.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. महाराज मद्रास रेलवेवरून मी कार्तिक स्वामीकडे गेलों होतों त्याची हकीकत पेशज तुह्मास कळविली आहे. त्यापुढील हकीकत अशी:—

कार्तिकस्वामी, हंपी व बल्लारी पाहून माघारे गुत्कुलाचे स्टेशनावर आलों. तेथें चार आण्याचें टिकिट घेऊन रात्रीं नऊ वाजतां गाडांत बसलों तों अक्रा वाजतां गुतीस पोचलों. तेथें मुक्काम करून दुसरे दिवशीं भोजनोत्तर अक्रा वाजतां सवा रुपयाचें टिकिट घेऊन गाडींत बसलों तों संध्याकाळीं सहा वाजतां कडप शहराला येऊन पोचलों. तेथून पूर्वेस मलकार्जुन तीन कोस पायवाटेवर आहे. तेथें जाऊन दर्शन घेऊन माघारा कडपास आलों. व पहाटे पांच वाजतां अक्रा आणे हाशिलाचें टिकिट घेऊन गाडींत बसलों तों नऊ वाजतां तिर्पतीस जाऊन पोचलों. तेथून तीन कोसांवर पायवाटेनें गोविंदपट्टण नावाचें मोठें गाव आहे व तेथून एक कोस श्रीव्यंकटेशाचा गिरी पर्वत आहे. त्या पर्वताचा चढाव तीन कोसांचा असून जागोजाग झाडी व पाणी पुष्कळ आहे. तेथें पाण्याचे पाट काढलेले आहेत व त्यावर धान्य पिकवितात अस्तु. लक्ष्मी व्यंकटेशाचें दर्शन घेऊन पुन्हा तिर्पतीस आलो. व पहाटे चार वाजतां पंध्रा आण्याचें टिकिट घेऊन आगगाडींत बसलों तों आठ वाजतां अर्काटच्या स्टेशनावर आलों. तो गाव फार मोठा आहे. व तेथून आगगाडीचे मार्ग तीन फुटतात. येक पूर्वेस चिन्नापटणचा, दुसरा आग्नेय दिशेस शिवकांचीचा, व तिसरा दक्षिणेस श्रीरंगपटचा, त्या पुढें रामेश्वर आहे. मी अर्काटाहून

साडे आठ आण्याचें टिकिट घेऊन अकरा वाजतां शिवकांचीस गेलों. हीगाडी सावकारी असून लहान आहे. शिवकांची व विष्णुकांची हे गाव मोठे आहेत या दोहोंच्यां मध्यें एक बाजार मात्र आहे. विष्णुकांचीहून सोळा कोसांवर दक्षतीर्थ आहे तेथें बैल गाडीनें गेलों, व तेथून चिनापट्टणास गेलों. रस्ता सडकेचा असून दोहों बाजूला केळी व नारळी पुष्कळ आहेत. व जागो जाग मोठ मोठाले तलाव आहेत. पहिल्यानें इंग्रजी लष्कराची छावणी लागते. पुढें त्रिवक कोणी गाव मोठा आहे तो लागतो व पलीकडे चिनापट्टण लागतें त्यांत बाग बगीचे पुष्कळ आहेत. शहराला तीन बाजूनीं खाडीचा वेढा आहे व पूर्वेस समुद्र आहे. चोहोंकडे पूल केले आहेत. व समुद्रामध्येंही तीनशे हात लोखंडी पूल केला आहे. व एक बुरूज दिवा ठेवण्याचा केला आहे तो समुद्रांत १०० कोसांवरून दिसतो असें लोक ह्मणतात. या शहरांत मोठ मोठे सावकार लोक आहेत त्यांच्या हवेल्यावर उंच उंच निशाणें आहेत. एक अपराधी साहेब होता त्याची प्रतिमा घोड्यासुद्धां हुबेहूब करून एका बुरुजावर ठेविली आहे. शहरांत चहूकडे दोरीसूत सडका आहेत. किल्ल्याला तीन परीघ व दोन खंदक आहेत. खंदकांत समुद्राचें पाणी घेतलें आहे. शहरांत गोडें पाणी नाहीं, बाहेरून लोक आणितात, हा मोठा ताप आहे. साहेब लोकांचे मनांतून तुंगभद्रा नदीचा नळ आणावा असें आहे. या शहरांत लहान मोठे लोखंडी नळ हजारो पडले आहेत. एका बागेत एक मोठी इमारत बांधली आहे. तींत काचांचीं दुमजलीं मेजें शेकडों ठेविलीं आहेत. व त्यांतून मोठ्या आश्चर्यकारक रकमा आहेत. मनुष्यांचीं कलेवरें, सर्व प्रकारच्या पशूंचीं, पक्ष्यांचीं, जलचरांचीं कलेवरें, तसेच बहुत प्रकारचे जिवंत प्राणी, सर्व प्रकारचीं धान्यें, वनस्पती, वस्त्रें, शस्त्रें, धातु, काष्ठें, देवाच्या प्रतिमा हुबेहुब ठेविल्या आहेत. याला सर्व बाजार असें ह्मणतात. येथें आगगाडीच्या स्टेशनाचें काम मोठें चाललें आहे. येथें शिकारी जनावरें सर्व आहेत. तीं व इतर चमत्कार सर्व पाहून आगगाडी मार्गानें आलों तो कलबुर्ग्याचे अलीकडे गुडुर स्टेशनावर उतरून तेथून पायवाटेनें ६ कोस गाणगापूर आहे तें पाहून मावारें स्टेशनावर आलों व तेथून तीन कोस पायवाटेवर अक्कलकोट आहे तेथें जाऊन स्वामीचें दर्शन घेतलें व सोलापुरास आलों आणि तेथून इंदापुरास घरीं आलों. कळावें हे विनंती.

आपला मित्र
ग्रामजोशी.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध ७ शके १७९७

## वऱ्हाड प्रांताबद्दल लोकांचे उद्गार.

आलीकडे बरेच दिवसांत निजाम सरकारचा वऱ्हाड प्रांत परत मिळावा किंवा नाहीं या विषयींची चर्चा वर्तमानपत्रांतून आली नाहीं. सुमार बडोदा प्रकरणाचे आरंभापासून हें प्रकरण मागें पडलें. पार्लमेंट सभेमध्यें लवकरच हा प्रश्न निघणार आहे इतकें त्यावेळीं कळलें होतें पण त्यापुढें एक शब्द नाहीं. इंग्लिश सरकारच्या स्वतांच्या नुकसानीची गोष्ट असती तर इतका विलंब न होता. व पत्रव्यवहार तारायंत्रानीं चालता परंतु हा पडला मांडलिक राजाचा कारभार व कदाचित इनसाफ होऊन मुलुख परत देण्याचें ठरलें तर नुकसानाशीं गाठ येणार ह्मणून सरकारानें याचा टप्पा मुंगीच्या पायानीं चालविला आहे असें दिसतें. अस्तु आमचे सरकार सार्वभौम आहे ह्मणून त्यांनीं कोणतीही गोष्ट केली तरी ते मुकत्यार आहेत. त्यांनां कोणी हुकमी विच्यारता नाहीं. व जे विच्यारते आहेत ते केवळ अर्जदार आहेत ह्मणून त्यांच्या प्रकरणाचा निकाल कोणत्याही परीनें करण्यास त्यांस कोणाचा कांहीं धाक नाहीं हें सर्व समजून आहेत.

आतां पार्लमेंट सभेतील मेंबर मि० ईस्टविक साहेब हैदराबादेस गेले आहेत व ते वऱ्हाड प्रकरणाचा बारकाव्यानें विच्यार करीत आहेत असें समजतें पण त्यापासून काय निष्पन्न होणार आहे? ईस्टविक साहेब हिंदुस्थानच्या लोकांचे अभिमानी आहेत खरे पण त्यांच्या एकट्याच्या विच्यारानें होणार काय? पार्लमेंट सभेंत हिंदुस्थानचे मेंबर असावेत ह्मणून १२००० सह्यांचा पुण्याहून अर्ज गेला त्यावर ते ह्मणाले कीं लाख लाख सह्यांचे असे शेकडों अर्ज झाले पाहिजेत ह्मणजे दाद लागण्याचा संभव आहे. यावरून वऱ्हाड प्रकरणाचे नुसते कागदपत्र या गृहस्थांनीं पाहिल्यापासून तात्कालिक फायदा काय होणार याचें अनुमान आमचे वाचक करितील. ईस्टविक साहेब आस्थापूर्वक कागदपत्र पाहतील तर त्याविषयीं आपलें मत कळवितील व त्यांच्या त्या आस्थेवाईकपणाकरितां निजाम सरकार त्यांस कांहीं देईल व साहेब बहादुर विलायतेस परत गेले ह्मणजे त्या आपल्या माहितीचें एक पुस्तक करितील व त्याच्या विक्रीवर हजारों रुपये मिळवितील असें लोकांस वाटतें याशिवाय वऱ्हाडप्रांताबद्दल अधिक कांहीं तजवीज आजचे दिवसास त्यांकडून होईल असें वाटत नाहीं.

थोडेच दिवस झाले मुंबईहून आनरबल गिब्स साहेब हैदराबादेस गेले होते ते परत आले तेव्हां वऱ्हाड प्रकरणाकरितांच ते गेले असतील असा लोकांचा तर्क होता पण त्याविषयींही आतां बूट बाहेर पडला आहे त्यावरून समजतें कीं ते तिकडील स्टेटरेलवेच्या संबंधांत दिवाण साहेबाच्या भेटीकरितां गेले होते त्यांत वऱ्हाडचा संबंध कांहींएक नव्हता. अस्तु. इंग्रज सरकारच्या राज्यसंबंधाच्या या नीतीबद्दल आमचे लोकांस वाईट वाटलेच यांत कांहीं आश्चर्य नाहीं प०, त्यांच्या जातीचे मोठमोठाले राजकारस्थानी पुरुषही त्यांस याबद्दल टपका देतात. ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे.

हैदराबादचे माजी रेसिडेंट सर जार्ज्य यूल यांणीं स्पेक्टेटर नावाच्या तिकडील वर्तमानपत्रांत कांहीं मजकूर लिहिला आहे त्यांत इंग्रज सरकारच्या न्यायनीतीविषयीं दोन ओळी आहेत त्या अशा:—

नेटिव राज्यामध्यें जुलूम, निर्दयपणा, अव्यवस्था, झोटिंगपाच्छाई, वगैरे आहेत ह्मणून हसावें तर आपण (इंग्लिशसरकार) तरी त्यापासून केवळ अलिप्त आहो काय? आपला न्यायइनसाफ नेटिवांच्या संबंधांत लक्ष्यांत आणला असतां त्यांत सुधारणा होणें अवश्य आहे. आणि आपला न्याय इनसाफ एकंदरींत चांगला असला तरी तेवढ्यावरच आपण उत्तम लोकप्रीती संपादन करू काय? सर्वशक्तिमान परमेश्वर तरी आपल्या एकट्या न्यायाच्या गुणावरून सर्व जगास आवडता झाला असता काय? नाहीं. त्याच्या सांगडीला दुसरे सद्गुण पाहिजेत. बरें तें असो. हिंदुस्थानांत आपल्या न्याय इन्साफाचा प्रकाश कसा पडत आहे? मनुष्या मनुष्यामधला ह्मणजे दिवाणी फौजदारी मुकदम्यांतला न्याय इनसाफ एकीकडेस असूं द्या, त्यांत कदाचित आपला न्याय इनसाफ निर्दोष असेल पण आपल्या राष्ट्राची मर्यादा वाढविणें व आपलें वैभव गाजविणें या गोष्टींत जे आपणास आड येतात त्यांचा न्याय इनसाफ आपण कसा काय करितो? तरवार चालवून मिळविलेल्या राष्ट्राविषयीं हें माझें प्रस्तुत बोलणें नाहीं, केवळ शांततेच्या प्रसंगीं मांडलिक राजाचे टापू बळकावून घशाखाली उतरण्याचे आमचे प्रयत्न कसे आहेत ते दाखविण्याचा माझा इरादा आहे.

निजाम सरकारचें परचक्रापासून रक्षण करावें व राज्यांतील अव्यवस्था नाहींशी करावी यासाठीं फौज ठेवावयाचा आह्मी करार करून त्या फौजेचे खर्चाकरितां ह्मणून त्याचे मुलखाचा एक बराच मोठा भाग घेतला. पण ह्या दोन्ही गोष्टी आह्मी केल्या नाहींत आणि ती फौज ठेवून फक्त निजाम सरकारास मात्र व्यवस्थित ठेविलें. त्याच्या राज्यांत त्याची सत्ता संस्थापित करण्यास मदत करण्याविषयीं आह्मी तहनाम्यानें बांधले गेलेलों होतों परंतु तहनाम्यावर सह्या होण्याबरोबर आह्मी ती गोष्ट नाकबूल केली. व त्यामुळें निजाम सरकार निरुपाय होऊन त्याला आपले स्वतांकरितां दुसरी इरेग्युलर फौज ठेवावी लागली. पुढें जबरदस्तीनें तें काम आह्मी आपले हातीं घेतलें ह्मणजे ती फौज निजाम सरकारच्या खर्चानें आह्मी ठेविली व तो खर्च आह्मी आपले तशा प्रकारचे खर्चापेक्षां मोठ्या भंभाळपणानें चालविला व निजाम सरकाराला आह्मी आपले कर्जदार केलें आणि त्याचे राजधानीवर हल्ला करण्याचा वगैरे दरारा दाखवून त्याच्या इच्छेत येईल तोंपर्यंत त्या फौजेच्या खर्चाकरितां वऱ्हाड प्रांत स्वाधीन करून देणें त्याला भाग पाडलें व त्याप्रमाणें तो प्रांत आपले हस्तगत करून घेतला.

हल्लीं निजाम सरकारचे दिवाणानीं राज्याची चांगली व्यवस्था केली तेणेंकरून त्या फौजेचा खर्च देण्यास ते शक्तिमान झाले व त्यांनीं खर्चाचा पैसा घ्यावा आणि मुलूख सोडून द्यावा अशी मागणी केली व तुमच्या सैन्याची आतां गरज नाहीं असेंही कळविलें परंतु ती गोष्ट आह्मी ऐकत नाहीं व त्यांचा मुलुख सोडून देत नाहीं, तेव्हां लोकांनीं आमच्या न्याय इनसाफाचा आतां कसा काय भरवसा मानावा.

नेटिव राज्यास लोक नाखुश आहेत असें आह्मी वारंवार ह्मणतों पण सदरील उदाहरणावरून ते लोक नाखुश आहेत काय? बरें निजाम सरकारच जुलमी आहे असें त्यांस या गोष्टीवरून वाटत असेल काय? तसेंच लोभाविष्टपणानें कांहीं ढोंग धत्तुरा करून आह्मी या कामीं अयोग्य प्रकारची वर्तणूक करीत आहों असें ठरत नाहीं काय? निजाम सरकारचा व आपला प्रथम संबंध झाल्या दिवसापासून तों आज पर्यंत आपण त्यासी फार वाईट रीतीची वर्तणूक करीत आहो तिचा परिणाम असा झाला आहे कीं त्याच्या रयतेस त्याची दया विशेष येत आहे व तिची त्यावर दिवसानुदिवस अधिक, प्रीति बसत चालली आहे. व राजावर रयतेची अशी एकनिष्ठ प्रीति पृथ्वीवर दुसरे कोणतेही राष्ट्रांत नसेल असें माझे मतीनें मला वाटतें. आतां त्याची रयत त्याला फसवो, आणि बहुत गोष्टींत त्याच्या विरुद्ध जावो पण ती लवकरच आमच्या राज्यसत्तेखालीं वागण्यापेक्षां त्याच्याच राज्यसत्तेखालीं वागली जाईल असें धोरण दिसतें.

## वऱ्हाड

या आठवड्यांत पावसाचें मान ह्मणण्यासारखें कांहीं नाहीं. एकादे वेळ सडका शिंपण्यासारखा पडतो, बाकीं उघाडी आहे. वाख्याचा उपद्रव आतां अगदी नाहीं ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं.

उत्तम लोकवासी डा० सिंक्लेर साहेब यांकरितां कांहीं स्मारक कृत्य करावयाचें त्याचा विच्यार करण्याकरितां सभा भरावयाची ती हवेच्या उपद्रवामुळें तकूब राहिली होती ती आतां या महिन्याचे २२ वे तारखेस रविवारीं अकोला येथें भरणार आहे.

नारायण महिपत माजराच्या गडबडीचे कारणानें जुडिशियल खात्यांत हिशेबी कागदपत्र ठेवण्याचे वगैरे नमूने नवीन प्रकारचे मोठ्या कसोशीचे तयार होत आहेत असें समजतें.

रा. रा. माधवराव हरी सहस्रबुध्धे उमरावतीचे डिपुटी कमिशनरचे क्लार्क हैदराबादेस गेले होते ते तिकडून सोलापुरास आपले घरीं परत आले. रेसिडेंट साहेबाचे भेटींत त्याविषयीं काय खुलासा झाला तें समजलें नाहीं, परंतु तीन महिन्यांची

रजा भरेपर्यंत ते वऱ्हाडांत येत नाहींत असें ह्मणतात.

अकोल्याच्या म्युनिसिप्यालिटीच्या सेक्रेटरीचें काम मि० पांडुरंग दामोदर येथील मिडलक्लास स्कुलावरीलें मास्तर यांनीं सुमार अडीच वर्षें फार मेहेनत करून उत्तम रीतीचें केलें व हल्ली त्यांस फुरसंद नसल्यामुळें त्यांनीं त्या कामाचा राजिनामा दिला. पुढें ४० पासून ६० रुपयेपर्यंत एक पगारी सेक्रेटरी ठेवावा असा कमिटीचा ठराव झाला होता पण रा. रा. येकनाथ मोरेश्वर स्मालकाज कोर्टाचे आफिशियेटिंग क्लार्क यांनां विच्यारिल्यावरून त्यांनीं पगाराशिवाय आनररी सेक्रेटरीचें काम करण्यास आपण खुशी आहों असें कळविलें त्यावरून त्यांची नेमणूक करण्याचा विच्यार चालू आहे. या गृहस्थांनीं खामगावास हें काम केलें आहे व येथें ही करतील अशी त्यांस शक्ती व बुध्दीमत्ता आहे त्याचप्रमाणें लोक प्रीतीचीही काळजी त्यांनीं विशेष बाळगली तर सर्व उत्तम होईल. व त्याप्रमाणें ते करतील अशी आह्मांस उमेद आहे.

येथें नरसोबाच्या वाडीचें नाटक आलें आहे. त्याचे कालपर्यंत तीन खेळ झाले. व आणखी कांहीं होतील असें दिसतें. याजमध्यें कांहीं विशेष गुण आहे किंवा लोकही नाटकास फार जातात असें नाहीं पण त्यांची मंडळीही ७।८ च आहे व त्यांच्या खेळाला दहा बारा रुपयेही वेळेस मिळाले तरी ते संतुष्ट आहेत. हाच त्यांचा गरिबीचा गुण अकोल्यास उपद्रवाच्या काळजींतून नुकतेच मुक्त झालेल्या लोकांस अल्पस्वल्प करमणुकीस कारण झाला आहे. यांच्या बरोबर एक स्त्री आहे. ती पडद्या आडून गाणीं ह्मणते व एकादे खेळांत स्टेजवरही येते. तेणेंकरूनही लोकांस कांहीं अधिक मौज वाटते.

एथील पोलिस सुपरइंटेंडेंट मे. जेमिसन साहेब एक महिन्याचे रजेवर मुंबईकडे गेले. व मि. गनत्राप साहेब त्यांचें काम पाहूं लागले.

क्या० वुलक साहेब डिपुटी कामिशनर व मि. दस्तुर बहिमनजी साहेब आसिस्टंट कमिशनर काल रोजीं सरकारी कामानिमित्त शिगावास गेले आहेत.

आह्मांस असें समजलें आहे कीं रा. रा. रामसेवक दीनदयाळ ज्यांजवर वऱ्हाडांत मोठा गहजब झाला त्यांस हैदराबादेस १०० रुपये पगाराची जागा मिळाली किंवा इतक्यांत मिळेल हें ऐकून आह्मांस संतोष वाटतो.

तहशिलदारकचेऱ्यांतून कोठें २५ रु.चे व कोठें २० रु.चे कारकुनाची जागा कमी करण्याचा ठराव झाला आहे.

तालुक्यानिहाय महालकरी होणार होते ते शेवटीं थोडे थोडे पगाराचे कारकुनच झाले. दर तालुक्यास ३० रुपये, २५रुपये व २० रुपये असे पगाराचे तीन कारकून ठेवणार. त्यांचे नाव मुनसरीम. दाक्षिण प्रांतीं शेकदार होते तसे हे मुनसरीम होणार. व या जागा देशपांडे लोकांस मिळणार असें समजतें.

कारंजा– तारीख ४ आ० १८७५ इसवी. ह्या आठवड्यांत ३३ मनुष्यें लागलीं पैकीं १० मरण पावलीं. बाईचा पाय अजून मागें नाहीं पुढेंच आहे. येथें रा. नानाजी पावडे यांणीं बाईचे शांतवन होण्याकरितां ब्राह्मणभोजन घातलें. तसेंच रा. अंबादासपंत किन्हीकर पांडे यांणीं तारीख १८ रोजीं येथें एक सहस्त्रभोजन घातलें. सदरहु पांडे फार गरीब असून यांनीं अशा कामीं पैशाचा व्यय केला हें फार चांगलें केलें. आतां तरी बाईची स्वारी जावो. येथील शिरस्तेदार रा. गणपत पांडुरंग आणि रा. भिमराव बापूजी वकील हे उमरावतीस फौ० मु.त साक्ष देण्याकरितां गेले आहेत. जनुने येथें ७ घरें असून १९ मनुष्यें लागलीं होतीं व त्या पैकीं ९ मरण पावलीं. मु० काजळेश्वर येथें असलेला उपद्रव आतां बंद झाला.

यवतमाळ– ता० ३ आगष्ट १८७५ इ. या जिल्ह्यांत नेर येथें ७।८ मनुष्यांस हागओक झाली व त्यांतून एक मनुष्य मरण पावला. हा बाईचा प्रादुर्भाव नाहीं. मोडशीचा रोग आहे. लोणी येथेंही कांहीं लोकांस अशीच भावना होऊं लागली आहे. व यवतमाळासही एक दोन ठिकाणीं असा प्रकार चालू आहे परंतु त्याचा अद्याप परिणाम कळला नाहीं.

येथें निरंतर पाऊस पडत असतो. हवा फार थंडी झाली आहे व घरोघर पडसें खोकल्याचा उपद्रव सुरू आहे.

उमरावतीस एथून दोन खुनी मुकद्दमे सेशन चौकशीकरितां १९ वे तारखेस जाणार आहेत.

इलिचपूर–तारिख ५ आगस्ट १८७५ पाऊस बहुतकरून दररोज पडत असून हवेंत गारवा आला आहे व शेतीचें काम उत्तम प्रकारें लोक करीत आहेत. हल्लीं येथें हवेचा उपद्रव बिलकूल नसून हवा चांगली आहे. मात्र कोठें जिल्ह्यांत थोडा थोडा उपद्रव आहे. येथील ल्हान बाजारांतील धर्मशाळेंत नवचंडीचा पाठ सुरू केला होता. त्याचे समाप्तीच्या दिवशीं होम वगैरे उत्तमप्रकारें झाला त्या दिवशीं डि० कमिशनर साहेबांनीं सर्व कोर्टास सुट्टी दिली होती. व ते दिवशीं ब्राह्मण भोजनाचा थाट चांगला झाला. याचप्रमाणें गावांतील मारवाडी लोकांनीं करून समाप्तीच्या दिवशीं ते सर्व लोक कांडलीस भोजनास गेले होते.

नायब तहशिलदारीचें सांगशन येणार ह्मणून फार दिवसापासून ऐकत होतो त्याप्रमाणें एके दिवशीं एकाएकी डि० क० साहेबांनीं कांहीं लोकांस सांगितलें कीं, सांगशन आलें त्यावरून मग काय विच्यारता, कांहीं कारकून लागले फुरफुर करण्यास. कोणी ह्मणे मी साहेबापाशीं भांडून जागा मिळवीन, कोणी ह्मणे माझा तर हक्कच आहे. याप्रमाणें चालतां चालतां शेवटीं एके दिवशीं कमिशनर साहेबांकडून सांगशन आलें तें असें कीं, रुपये ३०, २५ व २० याप्रमाणें प्रत्येक तालुक्यांत तीन तीन जागा कराव्या व त्या वतनदार लोकांस द्याव्या. इतरांस देऊं नये याप्रमाणें ठराव होऊन त्यांस मुनसरीम असें नाव द्यावें. मग काय विच्यारता, कोणाच्या तोंडांतून एक शब्द देखील निघेनासा झाला व तोंडें उतरून गेलीं.

एथील रिविन्यु शिरस्तेदार रा. रा. परशराम जगन्नाथ याची अकोले एथील रिकामे झालेले क्लार्क आफ धि कोर्टच्या जागेबद्दल डिपुटी कमिशनर साहेब यांणीं शिफारस केली आहे.

इलिचपुर तालुक्यांतील एक पंचवीस रुपयांचा कारकून व दर्यापूर तालुक्यांतील २० रुपयांचा कारकून याप्रमाणें दोन कारकून कमी करण्याविषयीं कमिशनर साहेबांकडून लिहून आलें आहे आतां कोणावर गदा बसते तें पहावें.

## जाहिरात.

सर्वत्रांस अकोले म्युनिसिपालकमिटीकडून प्रसिध्द करण्यांत येते कीं अकोले येथील तारीख १९ आगष्ट सन १८७५ इसवी रोज रविवारपासून बारा बाजाराचा, आठवडा बाजारच्या कराच्या उत्पन्नाचा मक्ता दिला जाणार असून मक्तयाचा हरास तारीख १२ माहे आगष्ट सन १८७५ इसवी रोज गुरुवार प्रातःकाळचे आठ वाजेपासून नऊ वाजण्याचे आंत केला जाणार आहे. ज्याची खुशी असेल त्याणीं मुक्रर केले तारखेस नियमित वेळीं म्युनिसिपाल कमिटीचे कचेरींत ह्मणजे टाउनहाल येथें हजर रहावें.

बाजार कराचे जे नेम ठरले आहेत ते सदरील टाउनहालचे कचेरींत पहाण्याकरितां खुले ठेविले आहेत ते समजून घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्याणीं लिलावाचे मुदतीचे आंत सदरील कचेरींत येऊन विच्यारल्यास कळविण्यांत येतील.

हरासाच्या शर्ती हरास करतेसमईं प्रसिध्द केल्या जातील. कळावें तारीख ६ माहे आगष्ट सन १८७५ इसवी.

बहिमनजी जामासजी
व्हाइस प्रेसिडेंट.

### विनोदपर चुटके.

एक भिकारी एका कृपण मनुष्याकडे गेला व भिक्षा मागूं लागला. त्यास तो कृपण कांहीं देईना. यानेंही भिक्षा घेतल्याखेरीज तेथून हालायाचें नाहीं असा विचार करून फारच टकळा मांडला. शेवटीं त्यास कृपण मोठ्या रागानें ह्मणाला कीं, अरे जर तूं येथून गेला नाहींस तर तुला मी आतां सोन्याचे दोन टोले देईन. तें ऐकून भिकारी ह्मणाला तुझें बोलणें मला मुळींच खरें वाटत नाहीं कारण कोणास कांहीं द्यावे अशी तुला इच्छा व्हावयाचीच नाहीं!

एक मुलगी आकाशांतील एका लहान ताऱ्याकडे बोट करून आपल्या लहान भावास सांगूं लागली हे भाऊ ती उंच लहान चांदणी चमकत आहे, ती बाबा ह्मणतात कीं या आपल्या पृथ्वीपेक्षां लाखोपट मोठी आहे. तेव्हां तिचा भाऊ ह्मणाला. भलतेंच कांहीं तरी, असे होईल तरी कसें, ताई तूच पहा बरें कीं जर ही चांदणी इतकी मोठी असती तर आपल्या पृथ्वीवर पाऊस येताच ना!

एक गृहस्थ मोठ्या डौलानें आपला नवीन बांधलेला सुंदर वाडा आपल्या मित्रास दाखवूं लागला. त्याचा अभिमान पाहून तो मित्र त्यास ह्मणाला गड्या, ह्या वाड्यांत सर्व प्रकारच्या उत्तम सोयी आहेत खऱ्या; परंतु एक मोठ्या महत्वाची गोष्ट नजरचुकीनें राहिली आहे. तो गृहस्थ मोठ्या उत्कंठेनें आपल्या मित्रास विचारूं लागला, ती कोणतीरे? तो ह्मणाला अरे या घरांतील माड्यांचे जिने फार अरुंद झाले कारण यांतून तुझें प्रेत नेतां यावयाचें नाहीं.

इराण देशामध्यें एका न्यायाधिशापुढें एक चोर न्याय करण्याकरितां आणिला. पुढें त्यावर गुन्हा शाबिद होऊन त्याचा एक कान कापावा असें ठरलें. चोर मोठ्या भिटाईनें न्यायाधिशास विचारूं लागला कीं, कोणचा कान कापावयाचा. तेव्हां न्यायाधिशानें सहज आपल्या उजव्या कानास हात लावून ह्मटलें कीं, हा. तें ऐकून चोर ह्मणाला तो ना, ठीक आहे. माझी याविषयीं बिलकुल तकार नाहीं व पाहिजे असल्यास मीच आपल्या हातानें तो कापतो!

एका टवाळ पोरानें एका गृहस्थाच्या वाड्याच्या खिडकींतून दगड मारून एक मोठें काचेचें झुंबर फोडिलें व आपल्यास कोणी पाहिलें तर धरतील असा विचार करून तेथून पळूं लागला. त्या वाड्याच्या मालकानें हें त्याचें कृत्य जाणून त्यास पकडलें. व त्यास ह्मणाला अरे लुच्चा, झुंबर फोडून पळून जात होतास काय? तेव्हां तो पोर ह्मणाला कीं, अहो तें झुंबर मजजवळून फुटलें ह्मणून त्याची किंमत तुह्मांस आणून देण्याकरितां पळत पळत जात होतों हें तुह्मी पाहिलें नाहीं काय:

एक परोपकारी स्त्री एका कैदखान्यांत गेली. तेथें एका कैद्यास पाहून विचारूं लागली कीं अरे तूं कशानें कैदेंत पडलास? तेव्हां तो ह्मणाला कीं मी एक घोडा चोरिला होता ह्मणून. तेव्हां ती स्त्री त्यास ह्मणाली-बरें तर आतां या पुढें तूं आपलें वर्तन सुधारशीलना? तो ह्मणाला होय. या पुढें मी दोन घोडे चोरीत जाईन.

## वर्तमानसार

पुण्यास प्रभातपात्रिका नावाचें नित्याचें वर्तमानपत्र निघूं लागलें होतें तें बंद झालें याविषयीं याच्या आरंभींच आह्मी लिहिलें होतें तें वाचकांस आठवत असेल.

कोचीनच्या राजानें आपले मुलखाची खानेसुमारी केली.

बाबु सत्येंद्रनाथ तागोर यांस शिकारपुरास जडज नेमिलें पण त्यांनीं हैदराबादेस अक० ज०चे तूर्त काम करावें.

सुरत येथें जरीमरीचा आजार मोठ्या झपाट्यानें सुरू आहे.

दामोदर नेना हा हल्लीं बडोद्याच्या कार्यांत राहात असून त्यांणें शहरांत जाऊं नये असा त्यांजला हुकूम झाल्याचें समजतें. याची मुळें माणसें शहरांतच असतात दामोदर आपलें ठिकाण सोडून बाहेर तोंड दाखवावयास जात नाहीं.

अयोध्या प्रांतांत गेल्यासालीं धर्मशाळा व तळीं वगैरे धर्मार्थ कृत्यें करण्याकरतां उदार मनाच्या ऐशी नेटिव लोकांनीं एकंदर १२६३७ रु० खर्च केले.

सिकंदराबाद येथें एका मुसलमान गृहस्थानें एक मुंगूस पाळलें होतें. त्याशीं तो खेळत असतां मुंगसानें त्यास दंश केला. त्यावर उपाय वगैरे पोंचण्यापूर्वींच तो मनुष्य मरण पावला. विष बाधावयास एक तासही पुरता लागला नाहीं. आमच्या लोकांनीं हें उदाहरण लक्षांत ठेवण्यासारखें आहे

मिरजापूर, झांशी, आग्रा, मिरत, बारिली, मुरादाबाद आणि अलमोरा या ठिकाणीं अद्यापि पाऊस न पडल्यामुळें लोक फार फिकिरींत आहे.

बडोदें सरकारच्या पदरचे जवाहिरखान्याचें कामदार नानाजी विठ्ठल यांजवर सुमारें ३४ हजार रु० चा ऐवज अफरातफर केल्याचा आरोप आहे. याची चवकशी चीफ माजि. मि. कुवरजी यांजपुढें व्हावयाची. सरकारतर्फे कामचा लविण्याकरतां मि. परमानंददास पारख वकील यांची नेमणूक सर टी. माधवराव यांणी केली आहे. अ. द.

तुरुंगामध्यें कैदी लोकांस कोणत्या रीतीनें वागवितात व त्यांची तरतूद कोणत्या प्रकारची राखतात हें चांगल्या रीतीनें समजून घेण्याकरतां अमेरिकेंतील न्यूयार्क हेरल्ड नामक प्रख्यात वर्तमानपत्राचा एक बातमीदार आपण स्वतः तुरुंगांत गेला. काय विलक्षण परोपकार बुद्धी ही !!!

विलायतेंतील ज्या व्यापाऱ्यांचीं नुक्तींच दिवाळीं निघालीं त्यांचें एकंदर पहातांना २२ कोटि रुपयांचें कर्ज आहे; व ह्या व्यापाऱ्यांपैकीं बहुतेकांचे हिंदुस्थानांत घेणें देणें होतें. काय विलक्षण चमत्कार हा !!! सर्वतोपरी अलिकडे ह्या देशाचें नुकसानच होत चाललें आहे. ज्ञा. प्र.

नवीन गिरणी चालू झाल्याचा समारंभ— गेल्या शुक्रवारीं मुंबईस कुलाबा स्पिनिंग व वीविंग कंपनीची गिरणी सुरू करण्याचा समारंभ झाला. ही कंपनी शेट केशवजी नाईक, कर्सेटजी नसरवानजी कामा, नरसी केशवजी, घेलाभाई पदमजी वगैरे मंडळीनें सन १८७३ त काढली. याचें भांडवल नऊ लक्ष रु० चें आहे. या गिरणींत ३६,००० चाती व ३०० माग आहेत. मुख्य कामगार युरोपियन लोक आहेत. समारंभाकरितां आमचे व युरोपियन व्यापारी लोक आले होते कारखाना ह्मणजे यंत्र चालू झाल्यावर मंडळी एके ठिकाणीं जमली त्यांच्या समोर शेट केशवजी नाईक यांनीं कितीएक युरोपियन व दुसऱ्या कामगारांस अंगठ्या, शाली वगैरे बक्षिस दिल्या. जमलेल्या मंडळीस दारू व हार तुरे दिले.

बडोदें प्रकरणाची समाप्ति— बडोद्याचें प्रकरण पार्लमेंटपुढें येण्याची आशा संपली. मि. सलीव यांची या बाबद सूचना होती, परंतु ते आतां ती पुढें तूर्त [ ह्मणजे सरासरी कधींच ) आणीत नाहींत अशी पयनियर पत्रास खासगी तार आली असें समजतें.

लेडी होवर्ट यांनीं विलायतेस जाण्यापूर्वीं 'होवर्ट महमेडन गर्ल्सस्कूल' या मुसलमान लोकांच्या मुलींच्या शाळेस दहा हजार रुपये बक्षिस दिले.

सर दिनकरराव इंदुरास गेले आहेत व तेथें त्यांच्या योग्यतेनुरूप आगतस्वागत झालें.

स्टेट सेक्रेटरी यांनीं हिंदुस्थानाहून यंदाच्या वर्षांत पैसा नेला त्याच्या बट्ट्याच्या योगानें सरकारास जुलै अखेर पर्यंत ९८,९९,९०० रु. नुकसान झालें असें स. ग्या. वरून समजतें.

श्री. मल्हारराव यांची कन्या सौ. कमाबाई साहेब यांचें जडजवाहीर व दागदागिने परत करावे असें राणी जमनाबाई साहेब यांनीं सर माधवराव यांस सांगितलें. इं. प्र.

स्टुअर्ट हहनेमन नांवाचें तारूं विलायतेहून मुंबईस येत असतां वाटेंत तारीख १४ एप्रिल रोजीं बुडालें. या तारवावर एकंदर ४६ खलाशी लोक होते त्यांपैकीं ३७ बुडून मेले व ९ असामी वांचले.

गेले आठवड्यांत कोपरगांव येथें गंगेस मोठा पूर येऊन नावेचा दोर तुटून ती वाहत गेली. तींत ३६ मनुष्यें असून शिवाय कांहीं जनावरें होतीं, परंतु 'देव तारी त्यास कोण मारी' यप्रमाणें ती नावबाहात वाहात आपोआप कांहीं अंतरावर कडेस लागली.

मुंबई ग्याझेटच्या बडोद्याचे बातमीदाराचे पत्रावरून समजतें कीं, बडोद्याचे रेसिडेंट व असिस्टंट रेसिडेंट यांस पुण्याहून कांहीं पत्रें आलीं आहेत त्यांत 'तुह्मास ठार मारण्याबद्दल आम्ही शपथा घेतल्या आहेत संभाळा" अशा प्रकारचा मजकूर आहे.

ट्रिचनापल्लीपासून मदुरापर्यंत रेलवेचा रस्ता तयार करण्याचे कामास सन १८७२ सालांत सुरुवात झाली होती. तो रस्ता हल्लीं पुरा झाला आहे. या रस्त्यावरून गाड्या जाण्यायेण्याची सुरुवात तारीख १ मिनहूपासून होणार होती. ने. ओ.

दिव्याच्या प्रकाशाच्या योगें पंचवीस तीस कोसांवरून संभाषण करण्याचें यंत्र— हें मि० हेन्री० सी० म्यान्स इराणच्या आखातांतील तारायंत्राकडील साहेबानें तयार केलें आहे. या यंत्राचा उपयोग युद्धप्रसंगीं शत्रूनीं तारा तोडल्या असतां फार होईल व खर्च एका कंदिलास सुमार ५० रुपये येतो. मोठाले कंदील उंचावरून उपयोगांत आणल्यास अथवा दुर्भिणीची मदत घेतल्यास अधिक दूरप्रदेशची बातमी घेतां येईल.

असें कळतें कीं आर्थर क्राफर्ड माजी जगजाहीर म्यु. क. यांस प्रिन्स आफ वेल्सच्या सन्मानार्थ मुंबई शहरांत तयारी कर्तव्य आहे तिजवर सुपरइंटेंडेंट नेमणार.

गायकवाडाच्या जवाहिराची चोरी— टाइम्सचा बडोद्याचा बातमीदार लिहितो कीं सात लक्ष रुपयांचे दागिने जे मल्हारराव गाइकवाडानें लक्ष्मी बाईच्या बापास भेट दिले होते ते एका पेटींत बंद करून वर मोहर केली होती. त्या पेटीच्या तळाची फळी काढून सर्व दागिने चोरीस गेले व दुसरे राजाच्या जव्हेरखान्यांतून ३० लक्षांचें जवाहीर गडप झालें आहे. ह्या अंदाधुंदीमुळें लोकांत गवगवा झाला आहे. कारण ह्या सर्व जवाहिराचा चार्ज जगजाहीर गजानन विठ्ठलाच्या एका असामीकडे होता.

असें समजतें कीं अलिबाग येथील स० ज० कोर्टांत दोन म्याट्रिक्युलेटेड असामी बारा रुपयांवर राहिले. हा नोकरी शिवाय दुसरा एखादा धंदा न करण्याचा परिणाम. पुढें शिकलेल्या लोकांची यावरून काय दशा होणार याजवर नीट लक्ष्य देऊन सावध व्हावें हा उत्तम मार्ग.

मेहुणीशीं लग्न करणाऱ्यास शिक्षा— मेकडरमाट साहेबानें मयत बायकोच्या बहिणीशीं लग्न लाविल्याच्या गुन्ह्याबद्दल सिकंदराबादेच्या क्यां० माजिस्त्रेटानें त्यास एक महिना कैद व १५० रुपये दंड केला. सु. प.

## ईश्वराची कृपा आणि मनुष्याचा प्रयत्न.

मागील अंकीं सांगितलें कीं, जे लोक ईश्वरावर आपल्या उद्धाराचा सर्व भार घालून आपण स्वस्थ बसतात ते फसतात; कारण प्रयत्न केल्याचून ईश्वर कधीं आपणास मदत करीत नाहीं. याच कारणामुळें पुष्कळ लोकांचें असें होतें कीं, ते ईश्वराची भक्तिभावानें उपासना करितात आणि तो केवळ आपल्या दयेनेंच आपला उद्धार करील अशा भरवशावर स्वस्थ बसतात ह्मणून त्यांस एकदा जडलेले जे दुर्गुण असतात ते जन्मभर सुटत नाहींत या दोषास आपण सर्व थोडेबहुत पात्र आहों; कारण जी गोष्ट आम्ही आपणच केली पाहिजे ती परमेश्वरावर सोंपविल्यामुळें आपला स्वभाव व आचरण सुधारणें आह्माकडून होत नाहीं. ही चूक दूर करण्याचा उपाय हाच दिसतो कीं, आमचे उद्धाराचीं दोन साधनें आहेत; ह्मणजे ईश्वरी आणि मानवी. ही गोष्ट लक्ष्यांत बागवावी. या दोहोंतून कोणतेंही एक साधन लक्ष्यांतून गेलें असतां मोठा भयंकर परिणाम होण्याचा संभव आहे. ईश्वरी साधन अगदी अमान्य केलें असतां मनुष्य आपणच आपला उद्धारकर्त्ता होतो. त्यास ईश्वराची प्रार्थना करण्याची, परमेश्वरास शरण जाण्याची, आपलें अंतःकरण व आचरण शुध्द ठेवण्याची गरज नाहीं असें होतें; बरें मनुष्याच्या कृतीची गरज नाहीं ह्मणावें तर धर्म ह्मणजे केवळ मनुष्यानें सुधारण्याविषयीं, आपल्या अंगीं जडलेले दुर्गुण टाकून देण्याविषयीं आणि सद्गुण धरण्याविषयीं तिळमात्र प्रयत्न करण्याची गरज नाहीं; तोंडानें हरि हरि ह्मणत किंवा ध्यान जप करीत आळशाप्रमाणें स्वस्थ बसावें ह्मणजे झालें. असें होतें या दोहोंपैकीं एकही प्रकार वास्तवीक धर्म नव्हे हें उघड आहे. मनुष्यांचा उद्धार होण्यास या दोनही साधनांचा एकत्र योग झाला पाहिजे. या दोहोंचा योग होऊन एकत्र व्यापार चालतो. तीच मनुष्याची योग्य अध्यात्मिक स्थिति होय. ह्या दोन शक्तींचा व्यापार आमच्या ठायीं सारखा चालतो, तेव्हां आमची उन्नति होऊं लागते. यास्तव कोणीही असें समजूं नये कीं, उद्धार हें परमात्म्याच्या कृपेचें फळ आहे ह्मणून मनुष्याच्या प्रयत्नाची कांहीं गरज नाहीं. मनुष्यानें आपणाकडून होईल तेवढा श्रम व उद्योग केला पाहिजे. त्याणें आपली सुधारणा करण्याविषयीं सर्व साधण्याजोगे उपाय केल्याविना रहातां कामा नये. तो मोहपाशांत सांपडला असला किंवा व्यसनांनीं पीडित असला तर त्याणें निरंतर त्यांशीं झुंजत राहून त्यास जिंकण्याविषयीं आपली पराकाष्ठा केली पाहिजे. आणि हें सर्व आपण आपल्या स्वताच्या बळानें नव्हे, तर सर्वसमर्थ परमेश्वराच्या बळानें करितों अशा विनम्र भावानें केलें पाहिजे. मनुष्यानें ईश्वरास आत्मसमर्पण केलें पाहिजे ह्मणजे मग त्याचा अनुग्रह त्याजवर होऊन त्याच्या हातून आपल्या उद्धाराचें कार्य करितो. हीच सर्व आत्मोन्नतीची किल्ली आहे. यांत केवळ ईश्वरी कृति आणि मानवी कृति ह्या परस्पराशीं मिळून व परस्परांच्या साह्यानें कार्य करितात. सत्य आणि उन्नति यांजकडे मनुष्यें जें एक एक पाऊल पुढें टाकतो तें ईश्वराच्या कृपेनेंच खरें परंतु ती कृपा त्याच्याच द्वारें प्राप्त होते व कार्य करिते. मी उद्योग करणार नाहीं असें मनुष्याच्यानें ह्मणवत नाहीं. तो खरोखर विनम्र व शरणागत असला तर परमेश्वराची कृपा त्याजकडून आत्मोन्नतीसाठीं उद्योग करविते आणि त्याच्या दुर्गुणांस जिंकण्यास त्यास समर्थ करिते. खरा शिपाई युद्धसमयीं लढतो तो केवळ आपल्याच सामर्थ्यावर लढत नाहीं, तर आपल्या सेनापतीच्या सामर्थ्यावर व हिमतीवर लढतो, त्याप्रमाणें अशा मनुष्यास ज्ञान, प्रेम, भक्तिभाव, व सदाचरण हीं जीं प्राप्त होतात तीं केवळ त्याच्या ठायीं आपोआप उत्पन्न होतात असें नव्हे, तर परमेश्वराची कृपा त्यांची प्रेरणा करिते. ईश्वराच्या कृपेनें प्राप्त न झालें असें त्याजमध्यें कांहीं नाहीं मनुष्य परमार्थासाठीं ग्रंथ वाचतो, मनन करितो आणि नाना प्रकारें श्रम करितो, परंतु हें सर्व तो परमेश्वराच्या प्रेरणेनें करितो आणि परमेश्वर त्याच्या द्वारें आपलें कार्य करून घेतो. अशा प्रकारें मनुष्यास स्वशक्तीचा अहंकार बाळगण्यास आणि तशीच परमेश्वरावर सर्व भार टाकून आळसानें स्वस्थ बसून रहाण्यासहीं कांहीं जागा रहात नाहीं, प्रेमळ भक्ति करणें आणि पापवृत्तीं बरोबर झुंजणें हीं दोन चांगलीं जुळून येतात. मनुष्य प्रार्थना करितांना ह्मणतो, हे प्रभो, मी ह्मणजे कः पदार्थ आहे. माझें सर्व कांहीं तूं आहेस, आणि प्रपंचरूप समरांगणी ईश्वरी सामर्थ्याचें खड्ग हातीं घेऊनच षड्रिपूंबरोबर जोरानें लढवून त्यांस मी जिंकून टाकितों. सु. प.

---

हे पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प.

REGISTERED NO. 5, 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १ अकोला, रविवार ता० १५ माहे आगष्ट सन १८७५ इ० अंक ३३

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकइशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

मेहेरबान वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

पातुराहून सलाम दिगर — आपले तारीख १ माहे आगष्टचे पत्रांत येथील चीफ कानस्टेबल यांचे विरुद्ध मजकूर आलेला पाहिला तो खोटा आहे सबब त्याविषयीं आपणास खरी हकीकत कळवितों ती छापण्याची मेहेरबानी व्हावी.

शेगाव येथील कुकाजी पाटील यानें राली आणि ब्रदर्स यांचे इंजिनेरासीं तंटा केल्यामुळें त्याबद्दल रिपोर्ट चीफ कानस्टेबलकडून होऊन तो बरतर्फ जाल्यानें पुढें आदावत करील ह्मणून त्यांनीं बदलीविषयीं अर्ज देऊन तारीख २४ मे रोजीं स्टेशन पातुर येथील हुजूरहुकमानें चार्ज घेतला. चार्जांत पातुर येथील उकिरडे व कचरे ठेवणारे लोकांवर नोटिशीअन्वयें मोकदमे करावे ह्मणून असिस्टंट साहेब व तहशिलदार साहेबाचा हुकूम दप्तरीं मिळाला. नोटिस तीन दिवसाच्या मुदतीची होती. पुन्हा तहशिलदारास सदर्हूबद्दल विच्यारून त्यांनीं आणखी कलम २९१प्रमाणें मुकदमे करावे ह्मणून लिहिलें त्याप्रमाणें मुकदमे करावे पण ते नवीन व लोकांस त्रास होईल करितां मुनादीवगैरे देऊन व पाटलाबरोबर चौकीदार लोकांस पाठवून ताकीद देवविली. नोटिशीस तीन दिवसाशिवाय पंचवीस दिवस गुजरून मगदूरवाले लोकांनीं नोटिशीप्रमाणें अमल न केल्यामुळें व पुन्हा तहशिलदाराकडून महामारीचा उपद्रव जास्त असून डिपुटी कमिशनर साहेबाचे हुकुमाअन्वयें मोरी, कचरा व उकर्डा ठेवणारे लोकांवर मुकद्दमे करावे ह्मणून लिहून आलें व याजबद्दलच हवेच्या उपद्रवाकरितां डिपुटी कमिशनर साहेबांचे लिहिले अन्वयें पोलिस सुपरिंटेंडेंट साहेब बहादुर यांजकडून सर्क्युलर हुकूम सादर झाला. हा हुकूम आल्यानें दप्तरीं असलेले हुकुमाची व्यवस्था करावी ह्मणून पाटील व हेड कानस्टेबल वगैरे लोकांकडून ज्या लोकांचे येथें उकिरडे वगैरे जास्त होते त्यांजला आणून कांहीं लोकांस त्याच दिवशीं उठविण्याची काळजी असून सरकारी हुकूम मानणारा आहे असें पाहून त्याजला साफ करण्याची समज देऊन सुपरिंटेन्डेन्ट साहेबांस डायरीनें जाहीर केलें व ज्या लोकांस मगदूर असून साफ केलें नाहीं व हुकुमाचीही मान्यता केली नाहीं त्यांजवर मुकदमे करून एकंदर २१ इसम बाळापूर तहशिलदाराकडे करून पाठविले त्यांत गोविंदसा वगैरे सारखे मोठमोठाले लोक होते. आमचे मे० गोविंदराव तहशिलदार मुकदमे झाल्याचे दिवशीं बाळापुरास जाण्यास पातुर मुक्कामीं आले होते व डकविलेली नोटिस त्यांनीं खुद्द पाहून त्या लोकांवर मुकदमे झाल्याचें ऐकून येथील दोस्ती असलेले लोकांची भेट घेऊन नेमणूक असलेले जागेवर जाऊन वरील मुकदमे फैसल केले. पैकीं एक गरीब बिचारा माळी नामें लक्ष्मण याजला ३ रुपये दंडाची शिक्षा दिली. व बाकी सर्व लोकांस सोडून दिलें. दरएक मुकद्म्यांत नवीन आलेले चीफ कानस्टेबल ह्मणजे खाजे हफिजुदीन विषयीं नुकसान व्हावें ह्मणून रिपोर्ट करून अठरावा रिपोर्ट चाललेल्या प्रकरणांत चांगलाच केला होता व १९वा रिपोर्ट सु० साहेबांचे जो मुलाहिज्यास येतो त्यालगतही चांगलेंच लिहिलें होतें. त्यांत दोन तीन तक्रारी अशा होत्या कीं, चीफ कानस्टेबलनीं लोकांस त्रास देण्याचे हेतूनें असिस्टंट साहेबांकडे आपले मताप्रमाणें रिपोर्ट करून हुकूम आणविला. नोटिस लोकांस न दाखवितां दप्तरीं ठेविली. गुन्हेगार लोकांच्या नोटिशीवर सह्या घेतल्या नाहींत. लोकांवर आपले हुकुमतीचा रवाब बसावा ह्मणून लोकांस त्रास दिला. तोहोमती लोकांनीं रस्त्यावर उकिर्डे टाकले नसून त्यांचे घराचे आंत आहेत तेव्हां ते गुन्हेगार नाहींत असें असतां यांनीं मुकदमे केले. अशींच कित्येक कारणें रिपोर्टांत लिहून पाठविलीं होतीं व त्यांचे अधिकाऱ्यांनीं पोलिस अधिकाऱ्याकडे तो रिपोर्ट पाठवून जबाब मागितला व त्यावर जबाब चीफ कानस्टेबल यांनीं दिला तो असा—

नवीन आलेले चीफ कनस्टेबल यांनीं रिपोर्ट केला नसून माजी असलेले चीफ कानस्टेबलनीं रिपोर्ट असिस्टंट साहेबाकडे करून हुकूम आणविला होता. नोटिस डकविलेली पाटलांचे चावडीचे खांबावर खुद्द तहशिलदारांनीं पाहिली. नोटिस एक असून सही घेण्याविषयीं हुकूम नव्हता ह्मणून ती नोटिस तमाम लोकांकरितां होती. नोटिशींत तीन दिवसांची मुदत असून २९ दिवसपावेतों सदर्हू चीफ कानस्टेबल यांनीं वाट पाहिली, पण तोहोमती लोकांचे घरीं आजपर्यंत उकिर्डा व कचरा २०।२०। २५।२५ गाडी आसून त्यांनीं आजपावेतों उचलला नाहीं— पातुर येथील लोकांची व चीफ कानस्टेबलची अदावत नसून त्यांनीं शिल्कींत असलेले हुकुमाचा निकाल केला असें कारण इनस्पेक्टर पोलिस यांजकडून लिहिले जाऊन सुप्रिटेंडंट साहेबांनीं आणखी सर्व मिसला वगैरे पाहून चीफ कानस्टेबलची व तहशिलदाराची पूर्वीपासून काहीं रेंज असून हल्लीं त्यांनीं अदावतीमुळें मोकदमे सोडून दिले ह्मणोन लिहून प्रोसिडिंगांतही साक्षीदार वगैरे लोकांच्या जबान्या कशा प्रकारें घेतल्या गेल्या होत्या त्याही पाहून डिपुटी कमिशनर साहेबांकडेस लिहिल्यानें तहशिलदार यांबजद्दल असें लिहून गेल्याचें ऐकतों कीं जो; तुह्मी खाजेहाफिजूदीन चीफ कानस्टेबलविषयीं रिपोर्ट केला तो अगदी बरोबर नसून खोटा आहे. तुमचे सर्व रिपोर्ट पाहिल्यावरून खोटेपणा नजरेस आल्यानें तुह्मास लिहिण्यांत येते कीं पुन्हा असे झाल्यास वरिष्ठाकडे लिहून नुकसान वगैरे विषयीं तजवीज होईल ह्मणून वगैरे

मुशाफरांस पातुर येथें येऊन उतरण्याची फार तकलीफ होती ह्याबद्दल सुताराचे वेटाळांत मढीस काम सुरू असून कासार लोकाचे मढीकरितांही काहीं तजवीज चालू आहे व काळे महजतीचे जवळ उतारू लोकांचे आरामाकरितां एक छप्पर येथील चिफानीं जातीनें बांधून दिलें आहे. कळावें तारीख ९ माहे आगष्ट सन १८७५ इसवी.

एक माहितगार

### पत्र पाठविणारास

कसबे हिवरखेड एथील कुळकर्णी लक्ष्मण गोपाळ यांनीं एक लांब लचक पत्र आह्मांस पाठवून त्यांत लिहिलें आहे कीं उमरावतीचे लायब्ररियन एकनाथ रामचंद्र यांनीं वेदोक्त धर्मप्रकाश नावांचे पुस्तक मुंबईहून त्यांस विकत आणवून देण्याकरितां तारीख १० अक्टोबर सन १८७४ इसवी रोजीं च्यार रुपये घेतले व आजपर्यंत बूक पाठविलें नाहीं. सार्वजनिक कामावर ग्रामस्थानीं नेमलेला मनुष्य भरवशाचा समजून मी पैसे त्याजपाशीं दिले पुढें बूक नाहीं तें नाहीं पण पुष्कळ पत्रांचें उत्तरही नाहीं.

याप्रमाणें मजकूर खरा असल्यास लायब्ररियन यांनीं पैसे किंवा बूक कुळकर्णी यांस देऊन मोकळे व्हावें असें आह्मी इच्छितों. उमरावती लायब्ररीचे व्यवस्थापकही या कामांत कुळकर्णी व लायब्ररियन यांत कोण खराखोटा आहे तें पहातील तर बरें होईल.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध १४ शके १७९७

## अब्रूचा खुलासा.

रा. रा. पांडुरंग गोविंद वकील यांची मागें जून महिन्यांत नाजर प्रकरणांत मि. डेविस साहेबापुढें जबानी झाली होती हें आमचे वाचकांस माहित असेल. तिच्या संबधानें त्यांनीं आपल्या निर्दोषीपणाकरितां व खोटी खबर देणारावर तजवीज करण्याकरितां एथील वरिष्ठ अधिकाऱ्यास विचारलें त्यावरून त्यांनां कळविलें कीं, "या मुळें तुमच्या अब्रूस कांहीं धोका आह्मी मानित नाहीं, तुह्मावर काडीमात्र संशय नाहीं, व खबर देणाराचें नाव समजून घेऊन त्यावर कांहीं वाढविणेंजरूर नाहीं"

ही हकीकत पांडुरंगपंत यांनीं ता. ७ चे उर्दू अखबारामध्यें आपले सहीचें पत्र छापवून प्रसिद्ध केली आहे. हें त्यांनीं फार चांगलें केलें. आमचे मित्र रा. रा. देवराव विनायक वकील यांच्या घरचे कागदपत्र पहाण्यासाठीं या प्रकरणाचेंच संबधांत पांडुरंगपंताहूनही अधिक सक्त व फाजील तजवीज झाली होती तीही आमचे वाचक विसरले नसतील सबब त्यांनींही अधिकाऱ्यांस त्याबद्दल विच्यारून या गोष्टीचा खुलासा अवश्य करून घ्यावा.

आह्मांस वाटत होतें कीं डिपुटी कमिशनर साहेब आपण होऊनच खोटी खबर देणाऱ्या लबाड लोकांवर कायद्याच्या शस्त्राचा प्रयोग करतील परंतु त्यांनीं तसें केलें नाहीं एवढेंच नाहीं पण त्या लबाडांच्या चुगलीनें ज्याच्या अब्रुस क्षणमात्र धक्का बसला त्या लोकांचे हातींही न्यायाचा रस्ता दाखविण्याकरितां त्यांस दिलें नाहीं याबद्दल आह्मांस वाईट वाटतें. चुगलखोरास अशी फूस मिळाल्यानें ते पाहिजे त्याचे घरावर पाहिजे तेव्हां आग पाखडतील. अस्तु. अधिकाऱ्यांनीं असें कां केलें तें आह्मास ठाऊक नाहीं परंतु त्यांचीं नावें किंवा त्यांचे शद्ब इतके नाजुक होते कीं ते पडद्याबाहेर आणण्यास शक्य नाहींत तर तशांवर इतका भरवसा ठेवून सदरहू दोघा प्रतिष्ठित व नामांकित वकिलांवर त्या वेळीं जी एवढी बडोदेशाई केली ती सर्वथैव अयोग्य होती असें आह्मांस खचित वाटतें.

अधिकाऱ्यांस अनेकवार असे प्रसंग येण्याचा संभव आहे सबब तशा प्रसंगीं खबर देणाराची योग्यता, ज्यावर तजवीज करावयाची त्याची योग्यता, मुकदम्याचा संबंध, न्यायाचा सरळपणा, दूरवर विचा-

र, आणि शांतता इतक्या गोष्टींचें पूर्ण अवधान त्यांनीं अवश्य ठेविलें पाहिजे अशी आमची त्यांस शिफारस आहे.

## मुलींच्या शाळा.

इंग्लिश सरकारच्या कृपेनें आपले देशांत स्त्रियांस विद्यादान मिळण्याचा एक मोठा लाभ झालेला आहे, तो पूर्वी नव्हता. हल्लीं जगाचा जो सुधारता व्यवहार चालला आहे त्यावरून खास अनुभवास आलें आहे कीं, आपल्या स्त्रिया अक्षरशून्य असणें चागलें नाहीं. ह्मणून मुलींच्या शाळा सरकारानें स्थापन केल्या त्यांतून आपणांपैकीं बरेच लोक आपल्या मुली लिहावयास पाठवितात. तरी फार मोठी संख्या अजून मुलींना पाठविणारांची आहे याबद्दल आह्मास वाईट वाटतें.

दक्षिण प्रांतीं आरंभीं मुलींच्या शाळांस सरकारचा आश्रय मुळींच नव्हता तेव्हां इंग्लिश सरकारच्या इतर सुधारणा पाहून आमच्या पैकीं सुधारल्या लोकांनीं आपल्यांत खासगी वर्गणी करून त्याच्या खर्चावर मुलींच्या शाळा चालविल्या. नंतर सरकारानें त्या कामांत मन घातलें. तरी मुलींच्या शाळांनां मोठी हरकत ही पडूं लागली कीं त्या वयस्कर झाल्यावर शाळांत जाईनात, कां तर त्यांस विद्यादान देणारे पुरुषच असतात व अजून बहुत ठिकाणीं आहेतही. पण सरकारानें ही उणीव काढून टाकण्याकारितां, मुलींनां शिकविण्याकरितां स्त्रिया मास्तरचे कामीं तयार कराव्या ह्मणून नार्मलस्कुलें मुंबईस, पुण्यास व नागपुरास स्थापन केलीं त्यांतून कांहीं स्त्रिया तयार होऊन त्या हल्लीं बाहेर प्रांतीं मास्तराचे कामावर नेमिल्या गेल्या आहेत हें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

आतां आमचे वऱ्हाड प्रांताकडे दृष्टी दिली असतां मुलींच्या शाळांचें काम इकडे अजून केवळ बाल्यावस्थेंत आहे असें दिसतें. इकडे लोकांच्या वर्गणीनें शाळा चालवयाच्या तें तर राहो, पण परम दयाळू उत्तम लोकनासी डा० सिंक्लेर साहेब यांच्या उदार सूचनेवरून सरकारानें येथें आरंभापासूनच मुलींच्या शाळा आपले खर्चानें स्थापन केल्या त्यांस ७।८ वर्षें होत आलीं पण त्यांचें पाऊल अजून मागें आहे. वऱ्हाडांत एकंदर मुलींच्या शाळा २९ आहेत परंतु त्यांत खामगाव, देऊळगाव राजा, अशा दोन तीन ठिकाणच्या खेरीज करून बाकी बहुतेक शाळांची स्थिति निकृष्ट आहे. कांहीं बंद झाल्या आहेत, कांहीं बंद होण्याच्या स्थितींत आहेत, व कांहीं केवळ भूभार अशा आहेत याजबद्दल आह्मांस फार वाईट वाटतें. बाळापुरची व अकोटची शाळा बंद झाली. वाशिमची मुलींची शाळा बंद होणार होती. अकोल्याचीही बहुत दिवस अवावस्थ आहे. याप्रमाणें मोठ मोठाल्या शहरांची ही अवस्था मग इतर सामान्य ठिकाणांची स्थिति कशाला पुसावी? व अशी वाईट स्थिति असणें ही आमच्या लोकांपैकीं मोठाले सरकारी कामदार, विद्वान, पुढारी, प्रतिष्ठित, व सुधारणाप्रिय लोकांस मोठा दोष लावणारी गोष्ट आहे. याचा त्यांनीं अवश्य विचार करावा.

आमच्या लोकांत ज्ञान वाढत चाललें आहे याची निशाणी स्त्रीशिक्षण ही आहे व सरकारचे औदार्यानें त्याच्या शाळा आपले प्रांतांत स्थापन झालेल्या असतां आपण जी मदत करावयास अवश्य ती करीत नाहीं, त्या चालू रहाण्याविषयीं कांहीं काळजी बाळगीत नाहीं, आपल्या व आपल्या शेजाऱ्यांच्या व इष्ट मित्रांच्या मुली शाळेंत जाण्यास ज्या हरकती असतील त्यांचा विचार करून प्रयत्नानें त्याचें निवारण करून शाळेंत मुलींची संख्या वाढवित नाहीं तर हें आमचें करणें परम निंद्य ठरेल व स्त्रियांच्या विद्याप्राप्तीच्या कामीं असें औदासिन्य राखिलें व तेणेंकरून मुलींच्या शाळा बंद झाल्या तर आह्मीं मोठे अन्यायी ठरूं असें आह्मांस खास वाटतें. या गोष्टीचा वऱ्हाड प्रांतांतील सदय व सुविचारी लोकांनीं विचार करावा अशी आमची त्यांस आग्रहपूर्वक शिफारस आहे.

सरकारच्या खर्चें होणाऱ्या पैशाचें कांहीं चीज होत नाहीं असें सरकारास दिसून आलें तर इंग्रज सरकार आपल्या हिंदु लोकांच्या अशा शाळा चालवील काय? याचाही सुज्ञांनीं विचार करावा. मि. ली वार्नर साहेब अक० डायरेक्टर आले होते तेव्हां अकोल्याच्या मुलींच्या शाळेची स्थिति कशी होती व त्यांनीं त्याबद्दल काय अभिप्राय दिला हें आमचे वाचकांस आह्मी त्यावेळीं कळविलेंच होतें. खरेंच पहा, वरें दर साल सुमारें ३०० रुपये प्रमाणें आज सात वर्षें दोन हजाराहूनही अधिक रुपये एकट्या अकोल्याच्या हिंदु जातीचे मुलींचे शाळेस खर्ची पडले आहेत असें असेल, आणि तेवढ्या प्रचंड खर्चानें एक देखील मुलगी नाव घेण्यासारखी शिकून तयार झाली नाहीं असें असेल, तर या गोष्टीचा आह्मांस फार लौकर विचार करावयास नको आहे काय? हा प्रश्न एथील पुढारी मंडळीवर आज आह्मी ठेवितों.

मुंबईस नुकतीच पार्शी लोकांच्या मुलींच्या शाळांची वार्षिक परीक्षा झालेली आम्ही ऐकिली व तिची स्थिति समजून आह्मास फार संतोष झाला. पार्शी लोकांनीं खासगी वर्गणीनें रकम जमविली आहे व तिच्या व्याजावर चाललेल्या त्यांच्या तीन शाळा आहेत व त्यांत ३६८ मुली विद्याभ्यास करित आहेत. त्यांस शिकविण्याचे कामावरही स्त्रियाच आहेत व त्या शाळांचे अभ्यास केवळ आपले इकडील मुलांचे शाळांचे अभ्यासाप्रमाणें झटून चालतात. व मुली मोठमोठाले विषयावर निबंध लिहून बक्षिसें मिळवितात असें आमचे वाचण्यांत आलें. तेव्हां क्षणभर आह्मी इकडील मुलींच्या शाळांच्या दैन्यद स्थितिसंबंधीं दुःख विसरून गेलों व परम अल्हाद पावलों. पण तो क्षण नाहींसा झाल्यावरोबर आमच्या इकडील स्त्रीशिक्षणाची मोठी दुस्थिति आमच्या डोळ्यापुढें येऊन उभी राहिली व तिच्या परिहारोपायासाठीं आह्मी सदरील विचार आपले देशबांधवांस सादर केले आहेत त्यावर त्यांनीं अवश्य लक्ष्य द्यावें.

## वऱ्हाड

अकोल्यास आठवडे बाजारावर नवीन कर बसलेला आहे त्याचा म्युनिसिप्यालिटीमार्फत आजपासून १२ आठवड्यांचा लिलाव झाला व तो मि. मिसरीलाल व चिमणसा कलाल यांनीं ४८० रुपयास घेतला असें समजतें.

पातुर शेखबाबू एयून पत्र आलेलें आज पहिले पृष्ठावर छापिलें आहे त्यांत तेथील चीफ कानस्टेबल व बाळापुरचे तहशिलदार यांच्या संबंधांत लिहिलेली गोष्ट खरी असेल तर आह्मांस तिजबद्दल फार वाईट वाटतें. पण ती खोटी असो असें आह्मी इच्छितों. तहशिलदारासारख्या मोठ्या अधिकाऱ्यानीं रयतेच्या न्याय इनसाफांत अशी चलबिचल करणें त्यांस अगदीं योग्य नाहीं. सबब तसें घडलें नसेल तर त्यांनीं आपला खरा इनसाफाचा प्रकार लोक दृष्टीपुढें आणावा त्यास स्थल देण्यास आह्मी तयार आहों.

मि० ख्वाजे अफिजुद्दीन चीफ कानस्टेबल यांचा या कामांत कांहीं अधिक प्रसंग नव्हता असें आजचे पत्रावरून दिसून येतें आणि तें खरें असेल तर त्यांस किंचीत टोंचून जे कोणी मागले पत्र लिहिलें तें लिहावयास योग्य नव्हतें व त्याचें मन चि० का० विषयीं दूषित होणें असें दिसतें.

लोकांनीं किंवा कामदारांनीं आपले खासगी द्वेष वर्तमानपत्रांत किंवा न्याय इनसाफांत आणावे हें फार वाईट आहे. तशानें त्यांच्या वाईट गोष्टीची छापावणी न होतां पाण्यावर तैलबिंदु पडल्याप्रमाणें त्यांची प्रसृती होते ही गोष्ट सर्वांनीं ध्यानांत आणावी.

बुलढाण्यास अलिकडे भरसस्त्यावर चोऱ्या होऊं लागल्या आहेत असें कळतें. याचें कारण सिक लोकांस फूस मिळाल्या सारखें होऊन त्यांनीं एका मारवाड्याचा जीव घेण्याचाही प्रयत्न केला होता ही गोष्ट गेले अंकांत प्रसिद्ध झालीच आहे. अस्तु. मि० बलदेवसिंव्ह पोलिस इन्स्पेक्टर यांस चिखलीहून हल्लीं तेथें नेलें आहे तर ते चांगला बंदोबस्त करून लोकांची स्वस्थता बिघडूं देणार नाहींत अशी आम्हा उमेद वाळगतों.

गेल्या सालांतील रुईचे बेजाचे रवानगीपत्रकावरून वेळोवेळ आमचे वाचकांचे असें लक्ष्यांत आलें असेल कीं, शिगावचा रुईचा व्यापार वाढत चालला आहे. व तो खामगावासही मागें पाडील असें कित्येक लोक ह्मणतात त्याविषयीं व त्याच्या कार्यकारणाविषयीं आह्मांस कांहीं बरोबर ठाऊक नाहीं; पण शिगावास खटपट चालली आहे. व हंगामाचे दिवसांत अकोला शहरांतूनही बाहेर गावचा व येथला बहुत कापूस शिगावास जात असतांनां रात्रंदिवस आढळतों यावरून शिगावचा व्यापार वाढणार आहे असें दिसतें खरें. शिगावास बाजारची सुधारणा चालली आहे व नळाचें पाणी अणावें असा विचार आहे. गावकरी लोक १९००० रुपये देत आहेत व तितकेच सरकारापाशीं त्यांचें मागणें आहे. गेल्या आठवड्यांत क्या० बुलक साहेब डिपुटी कमिशनर व मि० दस्तुर बहिमनजी साहेब आसिस्टंट कमिशनर शिगावास गेले होते त्यावेळीं या बाबदींत काय विचार झाला तो आह्मास समजला ह्मणजे आम्ही आपले वाचकांस कळवू. खामगावचे व्यापारी लोकांनीं व सरकारी अधिकाऱ्यांनीं या गोष्टीकडे लक्ष्य द्यावें व ३०० वर्षें जमत आलेली तेथील व्यापाराची घडी विसकटू देऊं नये. अशी आमची त्यांस शिफारस आहे.

उमरावतीस नळाचें पाण्याची तजवीज चालू आहे, व शिगावास देखील ती खटपट सुरू आहे आणि आमच्या अकोल्यास तसें कांहीं नसावें हें येथील राहाणारांचें दुर्भाग्य तर खचितच पण येथील अधिकाऱ्यांचें औदासिन्य हेंही एक कारण त्यास जोडलें असतां जुळण्यासारखें आहे. अकोल्यास सर्व प्रकारच्या सुधारणा चालू आहेत, युरोपियन लोकांचीही वस्ती मोठी आहे असें असतां लोकांस पाण्याचें दुर्लक्ष्य रहावें हें मोठें लाजिरवाणें आहे. मनुष्यास जसें अन्न तसेंच उदक अवश्य आहे असें सर्व जाणतात व तें पुरविण्याचें ज्यांचें हातीं आहे ते त्या कामीं बराबर लक्ष्य न देतां कानाडोळा करतात तेव्हां त्यांस काय ह्मणावें? उन्हाळे दिवसांत अकोल्यास पिण्याच्या पाण्याचे किती हाल होतात हें बाहेरच्या ज्या ज्या लोकांनीं पाहिलें आहे ते ते असें ह्मणतात कीं या दिवसांत या शहरांत रहाण्यापेक्षां कुग्राम वास किंवा अरण्यवास बरा. नदीचें रोगकारक व दुर्गंधियुक्त उदक पिण्यापेक्षां विहिरीचें उदक जें समुद्रोदकाची ( आगस्तिमूत्राची ) क्षारत्वाविषयीं स्पर्धा करितें एवढेंच नव्हे पण कडुत्वाचाही एक विशेष गुण आपणामध्यें बाळगतें त्याचें प्राशन करणें आरोग्य हेतूनें श्रेयस्कर असें समजून लोक विहिरीचेंच पाणी पितात अशी मोठी दुरवस्था उन्हाळे दिवसांत या अकोल्यास प्राप्त होते ती काढून टाकण्याकरितां आमच्या म्युनिसिप्यालिटीचे व्हाइस प्रेसिडेंट मि० दस्तुर बहिमनजी साहेब हे वरिष्ठ अधिकाऱ्यास प्रेरणा करितील व ती त्यांच्या ठायीं उपस्थित व तेणें करून येथील पाण्याचें दैन्य नष्ट होईल तर ती एक महत्तम गोष्ट होईल यांत संशय नाहीं.

पब्लिकवर्कस ह्मणजे इंजिनियर खात्याकडे पुढील वर्षीं काय काय कामें करावीं याचा विचार करण्याकरितां दरसाल कानफरन्स ह्मणजे एक सभा भरत असते, तींत साही जिल्ह्याचे डिपुटी कमिशनर, इंजिनियर, तसेच कमिशनर, डायरेक्टर हे येकत्र जमून विचार करीत असतात ती सभा गेले गुरुवारीं उमरावतीस भरली होती व तीकरितां बुलढाण्याहून क्या० हडलस्टन साहेब, वाशिमाहून क्या०

फिटझरल्ड साहेब, व अकोल्याहून क्या० बुलक साहेब, मि. इलियट साहेब, मि. आबटसा. व मि० पोप साहेब गेले होते त्याप्रमाणें गुरुवारीं सभेचें काम झालें व शुक्रवारीं क्या. इडलष्टन साहेब, व क्या० फिटझरल्ड साहेब आपआपले कामावर जाण्याकरितां माघारीं आले. मि० इलियट साहेब व आबट साहेब काल आले आणि मेजरबेल साहेब व क्या. बुलक साहेब उदईक येतील.

बुलढाण्याहून पत्र आल्यावरून समजतें कीं तिकडे पर्जन्य फार चांगला पडत आहे. व हवेचा उपद्रव तेथील व खालगत्याचा कमी झाला. मेहकर तालुक्यांत व देऊळगावाकडे अजून उपद्रव जारी आहे. या जिल्ह्यावर बाईची इतकी प्रीति कां जडली तें कळत नाहीं. मे महिन्यांत उपद्रवास आरंभ होऊन आगष्ट महिना अर्धा झाला तरी बाई जिल्हा सोडित नाहीं हा चिकटपणा कोण? तरी तिनें जो दीर्घ आ पसरला आहे त्यांत जाणारे कित्येक मनुष्यांचे बदला डाक्टर लोकांनीं तिचे तोंडांत ब्रांडीच्या व इतर दव्याच्या बाटल्या ओतून मनुष्यें माघारी घेतलीं आहेत. तरी बहुत प्रसंगीं असेंही घडलें आहे कीं बाईनें मनुष्य गिळावें व ह्याच्या पचनार्थ डा०ची बाटलीही पिऊन जावी. तरी बिच्यारीला तृप्तीचा ढेकर नाहींच व बुभुक्षितपणानें आ पसरलेला कायमच!

डा० सिंक्लेर साहेब यांकरितां कांहीं स्मारक कृत्य करावें ह्मणून पुढील रविवारीं सभा भरणार आहे. व तीकरितां जे मास्तर लोक येऊं इच्छितील त्यांस एक दिवसाची रजा देण्याचें आफि० डायरेक्टर मि. इलियट साहेब यांनीं कृपा करून कबूल केलें आहे. व गोकुळअष्टमी आणि रविवार अशा दोन सुट्या आहेतच. तेव्हां या प्रसंगास बहुत मास्तर लोक येऊन सिंक्लेर साहेबांविषयींची आपली प्रीति आणि शक्त्यनुसार औदार्य प्रगट करितील असें आह्मी इच्छितों.

श्री राजेश्वर कमिटीची मंगळवारीं जनरल सभा भरणार आहे.

खामगाव स्माल काज कोर्टाचे क्लार्क रा. रा. शंकर रामचंद्र एका दिवाणी मुकदम्यांत साक्षीकरितां गुरुवारीं येथें आले होते ते शुक्रवारीं परत गेले.

येथील शेट गोविंदराम गुलाबराय साहू यांचे दुकानचे मुनीम शेट मिरजामलजी हे जलोदराचे आजारानें मरण पावले.

उमरावतीस सूत व कापड विणण्याची गिरणी होणार होती ती होत नाहीं. व या कंपनीनें आपलें काम सोडून दिलें असें कळतें. वऱ्हाडचें पडलें नष्टभाग्य, तेव्हां असले कारखाने या प्रांतांत होतील कसे?

मि. हार्डिन साहेब उमरावतीचे डि.क. रजेवरून परत आले व मि. लाटण साहेब गुरुवारीं खामगावास जाऊन क्या. निकोलेट साहेब शनिवारीं येथें आले.

अकोल्याचे नाजर कचेरींत रा. लक्ष्मण शास्त्री नाशिककर कारकून होते त्यांस नाजर प्रकरणांत बरोबर खबर दिली नाहीं अशा सबबेनें डिपुटी कमिशनर साहेबांनीं काढून टाकलें. त्यांनीं जुडिशियल कमिशनर साहेबाकडे अपिल केलें आहे.

नारायण महिपतचीं शेतें त्याचे मेहुण्याचे स्वाधीन करावीं असा रेसिडेंट साहेबांनीं ठराव केला.

**उमरावती**—ता. ६ आगष्ट १८७९ तारीख ३० गुदस्तपासून तारीख ५ पावेतों या आठवड्यांत शहरांत महामारीनें ६३ मनुष्यें आजारी होऊन ११ मरण पावलीं याप्रमाणें तपशील आहे. मागील आठवड्यांत बाई साहेबाची स्वारी जाणार अशीं जी आशा होती ती या आठवड्यांत मेघराजाचे अवकृपेमुळें भंग झाली,

खोलापुरांतही महामारीचा उपद्रव फार झाला होता पण आतां कमी झाला आहे. खोलापुरांत व त्या स्टेशनचे हद्दींतलीं गावें मिळून महामारीचा तपशील:—

तारीख २० जूनपासून सुरू होऊन तारीख ३१ जुलै पावेतों २३५ आजारी झालीं व १०८ मरण पावलीं याप्रमाणें तपशील आहे.

पाऊस १५ दिवसांपासून नसल्यामुळें लोक हवालदील झाले आहेत.

**उमरावती**—(मित्राकडून) तारिख १३ आगस्ट. मागील आठवड्याचें माझें पत्र वर्तमानपत्रांत छापलें गेलें नाहीं तेणेंकरून तें लवकर पोंचलें नाहीं असें वाटतें पण मी तर तें शुक्रवारीं प्रातःकाळींच टपालच्या पेटींत टाकिलें होतें. असो. मेहेरबानी पोस्ट खात्याची!

तारिख ६ आगष्टपासून तारिख १२ मिनहूपर्यंत महामारीनें या शहरांत २० मनुष्यें आजारी होऊन ७ मनुष्यें मरण पावलीं.

यवतमाळ जिल्ह्याचे पोलिस सुपरिंटेंडेंट मि० केवरलिंग सा० रजेवरून परत आल्यावरून मि० हीथ साहेब तारिख ११ रोजीं उमरावतीस येऊन आपलें पूर्ववत काम पाहू लागले. त्याच दिवशीं आणखीही कांहीं साहेब लोक उमरावतीस आले आहेत.

**कारंजा** तारीख ११ आगष्ट सन १८७९ येथें महामारी बाईचा पाय मागें नाहीं दिवसानुदिवस पुढेंच आहे. एथील अधिकारी यांणीं कडेकोट बंदोबस्त ठेविला आहे. तरी उपद्रवाचें मान कमी नाहीं. व येथील बाजार एक महिन्यापासून बंद असून भाजीपाला तर मुळींच मिळत नाहीं. तेणेंकरून भाज्या विकणारे लोकांचें नुकसान होत आहे. याजकरितां ज्या भाजापासून अपाय निघणार नाहीं अशा प्रकारच्या भाजा विकण्यास हरकत आहे असें वाटत नाहीं. व ज्या भाज्या हल्लीं विकण्याची मोकळीक आहे. त्या कांदे, लसूण, मिरच्या, व कोथिंबीर, व या चातुर्मास्यांत कांदे लसूण खाणारे लोक फार थोडे सांपडतील आणि हल्लीं सणावाराचे दिवस आले आहेत याकरितां थोड्या बहुत भाज्या विकण्याची मोकळीक झाल्यास लोकांची मोठी सोय होईल.

येथून फौ. मु. गेला होता त्यापैकीं ए. धी स सहा महिने व दुसऱ्यास एक वर्ष ो केल भाड्याचे घरांत पोचवून येथील शि- टूं लाग. आणि वकील आपले कामावर पोस्ट मु हजर झाले. कारंज्याच्या आस रोग पास बाईचा उपद्रव सुरू आहे. ह्या आठवड्यांत पाऊस एक रात्रभर मात्र पडत होता. येथील व्यापारी लोकांचे परगावी बाजारास जाण्याचे पाऊण महिन्यापासून बंद झाल्या कारणानें लोक मुकाट्यानें चुरमुरे खात बसले आहेत.

## जाहिरात.

गणित विषयांचे नवीन पुस्तक.
अंकगणित पुरवणी भाग १ला.

अंकगणित पुरवणी पहिला भाग या नावांचे नवीन पुस्तक तयार केलें आहे. त्यांत चालू अंकगणितांतील विमा, कमिशन, ठेव, क्षेत्रफळ घनफळ आणि प्रश्न समुदाय यांतील प्रश्नांचें पृथःकरण करून नवीन विषय, गणिताच्या उपयोगी सर्व व्याख्या, प्रसिद्ध शब्दांच्या भूमितीच्या व्याख्या, गणितश्रेढी आणि भूमितिश्रेढी यांचीं सर्व कृत्यें, क्षेत्रफळ घनफळ यांचीं आणखी विशेष कृत्यें, दोन संख्या शोधण्याचीं कृत्यें अंकगणितांतील टिपणें (विशेष सूचना,) अंकगणित आणि भूमिति यांच्या सहायानें होणारीं चमत्कारिक उदाहरणें, आणि शेवटीं निवडक १०० प्रश्न असें पुस्तक तयार झालें आहे. याचीं पृष्ठें सुमारें १२५ होतील. आगाऊ किंमत देणारांस आठ आणे आणि मागाहून देणारांस दहा आणे पडतील. शिवाय टपालखर्च पडेल. किंमत तारीख ३० माहे सप्तंबर सन १८७९ इसवीचे आंत पाठविल्यास आगाऊ समजली जाईल. हें पुस्तक आक्टोबर सन १८७९ इसवी पर्यंत तयार होऊन वर्गणीदारांस मिळेल. प्रति किती काढाव्या, याचा विचार, वर्गणीदारांकडून जसा आश्रय मिळेल, त्या बेतानें होईल, याकरितां आश्रयदात्यांनीं होईल. तितक्या त्वरेनें कळविण्याची कृपा तारीख ३१ माहे आगष्टच्या आंत करावी. पत्र नाटपेड पाठवूं नये, पैसा पाठविणें तो पुढील पत्त्यावर पाठवावा.

नारो रघुनाथ मोहोळकर
हेडमास्तर ट्रेनिंग कालेज मराठी भाग
अकोला. वऱ्हाड.

## वर्तमानसार

पंजाब देशांतील अमृतसर येथील हिंदुप्रकाश पत्रांत लिहिलें आहे कीं कोणास विंचू चावला असतां लोखंडी भांड्यांत तेल टाकून कडकड झाल्यावर त्यांत रुईचे ( सरकी काढलेल्या कापसाचे ) लहान लहान तुकडे टाकावे. व जेव्हां ते गरम होऊन जळूं लागतील तेव्हां त्या तुकड्याने दंश झालेलें ठिकाण शेकावें. त्यार पांच वेळा याप्रमाणें शेकल्यानें विष नाहींसें होईल.

हें औषध लोकोपयोगी समजून आमच्या मित्रानीं आह्मांस लिहून पाठविलें आहे. व त्यांत ते लिहितात कीं पुर्वोक्त वर्तमानपत्र अमृतसरची हिंदुधर्म सभा इजकडून चालत होतें व वर्गणीदारही त्यास मोठमोठाले राजे वगैरे लोक होते असें असतां खर्चाचे तंगचाईमुळें तें पत्र गेल्या जुलाई अखेरपासून बंद केलें अशी जाहिरात छापली आहे. त्याजवरून हिंदु लोकांचें औदासिन्य दिसून येईल.

पंजाबांत जलंधर, लाहोर व अमृतसर जिल्ह्यांत अतिशय पाऊस पडला. ह्मणजे ६० तासांत १२ इंच झाला. तेणेंकरून पुष्कळ ठिकाणीं नुकसान झालें व रेलवेचीं कामें एक दोन दिवस बंद झालीं.

मद्रास इलाख्यांत तिनवेली जिल्ह्यांत एका नदीच्या वाळवंटावर २०० यात्रा उतरली होती इतक्यांत पूर येऊन ती सर्व वाहून गेली तिचा पत्ता नाहीं.

सिमल्याकडील महामारीचा उपद्रव कमी आहे.

साऱ्या हिंदुस्थानांत गुदस्त सालीं ५०२९ मनुष्यें खिस्ती झालीं.

फ्रेंच लोक कोचीन चायनामध्यें आपला अधिकाधिक पगडा चालवीत आहेत.

बंगलोरास कापसाच्या कारखान्याची गिरणी लवकरच सुरू होणार आहे असें कळतें. ६ लक्ष रुपये भांडवल काढून चार लक्षांचे शेर भरले ह्मणजे कारखाना सुरू होईल. पहिल्यानें सूत काढणार मग जम जमेल तसा विणण्याचा कारखाना जोडणार.

तुर्कस्थानच्या सुलतानानें बगदाद पर्यंत फार जलदीनें रेलवे करण्याचा व त्याचा खर्च सिविलखात्यांत दाखल करण्याचा हुकूम केला आहे.

या सालच्या पहिले तिमाहींत हिंदुस्थानांतील मिठाच्या खात्याचें उत्पन्न रुपये १,९२,३२,३९० झालें. मागल्या सालच्या या तिमाहींत याहून ७ लक्ष रुपये कमी झाले होते.

करशेटजी रुस्तुमजी सुरतेचे सबार्डिनेट जडज यांस बडोद्याच्या हाय कोर्टाचे चीफ जस्टिस नेमण्याविषयीं दिवाणानीं शिफारस केली आहे.

बडोद्यास नवीन पदारूढ केलेले श्रीमंत सयाजीराव महाराज हे खरे गायकवाड आहेत किंवा कसें या गोष्टीची पार्लमेंट सभेंत वाटाघाट होणार आहे.

९वे तारखेपर्यंतच्या आठवड्याची पावसापाण्याची हकीकतः— उत्तर हिंदुस्थानांत पाऊस फार पडला व पूर आले. मद्रास इलाख्यांत कृष्णा जिल्ह्यांत पाऊस पुष्कळ, करनूळ जिल्ह्यांत मध्यम व दक्षिण प्रांतांत कमी. सिंधप्रांतांत पूर व पाऊस चांगला आहे. कोंकण, सातारा, व नाशिक जिल्ह्यांत पाऊस चांगला व बाकी मुंबई इलाख्यांत थोडा आहे. मध्य हिंदुस्थान, रजपुतस्थान व मध्यप्रांत इकडे पाऊस पुष्कळ व बंगाल इलाख्यांत व वायव्य प्रांतांत पाऊस पुष्कळ.

पुणें नगराकडे शेतकरी लोकांनीं मारवाडी वगैरे लोकांशी जो दंगा केला त्याच्या कारणाचा बारकाव्यानें तपास करण्याकरितां मुं. सरकारानें मि. रिची साहेब यांस कमिशनर नेमिलें आहे. व त्यांचे हाताखालीं पुणें हवेलीचे मामलेदार रा. सा. बाळाजी गंगाधर साठे यांस दिलें आहे. रिची साहेबानीं पुणें जिल्ह्यांत चौकशीस आरंभ केला. तेथून नगराकडून साताऱ्यास जातील.

रा. सा. गजानन विठ्ठल पोलिस इन्स्पेक्टर पुढील वर्षीं नोकरी सोडणार असें समजतें.

अमदाबादेस कालेज स्थापन व्हावें ह्मणून लोकांनीं वर्गणी भरण्याची सुरुवात केली आहे.

आन० जस्टिस मेलविल साहेब पुढल्या वर्षाचे आरंभीं पेनशन घेणार असें कळतें.

आन० सर चार्लस सारजंट साहेब पुढील माहिन्यांत रजेवरून परत येतील.

कर्नल हचीनसन साहेब रजेवरून लवकरच ग्वालेरीस परत येतील व कर्नल आस्बर्न साहेब भुपाळास जातील,

अलाहाबादेस गंगेचा एक बांध फुटल्याच्या योगानें यमुनेचें पाणी शहरांत शिरलें व पुष्कळ नाश झाला, पण इश्वरी कृपेनें कोणी मनुष्य दगावलें नाहीं असें समजतें.

श्री० जयाजीराव शिंदे अलिजा बहादूर तारीख २९ जुलै रोजीं ग्वालेरीहून जयपुराकडे जावयास निघाले. जयपुर आणि अजमीर यांमधील रेलवे तयार झाली आहे तिच्या सुरवातीचा समारंभ शिंदे तेथें असतांनांच होईल असें दिसतें.

प्रयागास गंगेला व यमुनेला मोठाले पूर आले. व पाणी तुरुंगाचे भिंतीला येऊन थडकलें तेव्हां कैद्यापैकी कोणी उड्या घालून पळून जातील ह्मणून सरकारानें ५० शिपाई, १२ स्वार, व चीफ कानस्टेबल वगैरे बंदोबस्ताकरितां नेमिले होते.

इंदुरचे होळकर सरकारानीं मुंबई जवळ कुरलें नांवाचें गाव मि० आर्देसर होर्मसजी वादिया यांच्या मालकीचें आहे तें ६ लक्ष रुपयांला विकत घेतलें असें समजतें. हें गाव घेण्याचा त्यांचा हेतु असा आहे कीं आपले पाठीमागें वडील पुत्र गादीवर बसेल तेव्हां धाकटे पुत्रास ही मिळकत स्वतंत्र राहावी.

मि० सूटर साहेब मुंबईचे पोलिस कमिशनर पुढील महिन्यांतल्या पहिल्या आगबोटींतून रजेवरून परत येतील.

पालिठाण्याचे अधिकाऱ्यास ५०० रुपये दंड झाला होता पण तो त्यांच्या तक्रारीवरून पुढें माफ झाला.

सिंकोना नावाची वनस्पति जीपासून ज्वरहारक काइनेन नावाची औषधी तयार होते तिची हिंदुस्थानांत पुष्कळ लागवड करण्याविषयीं सरकारचे प्रयत्न चालू आहेत. त्यांत सिकीम प्रांतांत तर याची लागवड पुष्कळ होत आहे. गुदस्त सालीं सिकीममध्यें ४ लक्ष झाडांची नवी लागवड झाली व एकंदर हल्लीं ३७ लक्ष झाडें त्या प्रांतांत आहेत.

मुंबईस प्रिन्स आफ वेल्स येणार त्याकरितां राजे वगैरे लोकही त्यांच्या भेटीस बहुत येतील सबब भाड्यानें बंगले घेण्याची तेथें गर्दी झाली आहे. गायकवाडाकरितां परळावर एदलजी नसरवानजी पारशी यांचा बंगला ४००० रुपये भाड्यानें ठराविला आहे.

रा. बा. सखाराम खंडेराव मुंबई र पत्र ख्यांतील रिविन्यु कमिशनरचे नेटिव असें स्टंट यांनीं ४० वर्षे सरकारची इतबारें नोकरी केली व पेनशन घेत. सरकारानें त्यांच्या उत्तम गुणाकरितां ५०० रुपये किमतीचा एक गोफ प्रसिद्ध दरबार भरवून त्यांस बक्षिस दिला. त्या प्रसंगीं कित्येक साहेब लोकही हजर होते.

आनरबल जस्टिस नानाभाई हरीदास मुंबई हायकोर्टांतील जडज यांची प्रकृति नादुरुस्त आहे. एक दिवस कचेरींतून मुकदम्याचें काम चालत असतां ते आजारी होऊन घरीं गेले. ईश्वर त्यांस आरोग्य करो.

प्रिन्स आफ वेल्सच्या आगमनसमारंभाकरितां मुंबईस वर्गणी जमा होत आहे तिची रकम २४००० रुपये झाली आहे. व यादी पुढें फिरत आहे.

श्री० मल्हारराव गायकवाड यांणीं मद्रासेहून बडोद्यांतल्या आपल्या नजरबागेंत लावण्याकरितां उत्तम प्रकारचीं ४ फुल झाडें पाठविलीं आहेत. त्यावरून त्यांस आपण बडोद्याचे पुन्हा राजे होऊं असें वाटत असेल.

सुरतेस तापी नदीच्या पुलाकरितां साडेतीन लक्ष रुपये सरकारानें लोकलफंड खात्यास कर्ज दिलें त्याप्रमाणें आणखी दुसरे किरकोळ पुलाकरितां ६०००० रुपये द्यावे ह्मणून लोकलफंड कमिटीनें अर्ज केला आहे.

मुंबई इलाख्यांत जिल्ह्या जिल्ह्याला क्लार्क आफ धि कोर्ट नेमिले त्यांनीं अमुक अमुक कामें करावीं अशाबद्दल हाय कोर्टानें एक तेरा कलमांची यादी मुंबईसरकारचे ग्याझेटांत प्रसिद्ध केली

रा. सा. रावजी जिवाजी दिगवळेकर पोलिस इन्स्पेक्टर यांस नगर जिल्ह्यांत नेमिलें.

## नेटिव लोकांस सनदीनोकऱ्या देण्याबद्दल नवे नियम.

इतके दिवस आमच्या लोकांस सनदी नोकरी मिळवावयाची ह्मणजे परीक्षा देण्यास विलायतेस जावें लागत होतें. नवीन झालेल्या नियमाप्रमाणें विलायतेस परीक्षा देण्यास जाण्याचें आतां कारण राहिलें नाहीं. ह्या नोकऱ्या नेटिवांस इकडच्या इकडेच द्याव्या असें ठरलें असून त्याबद्दल कांहीं नियम झाले आहेत त्यांतील सारांश पुढें दिला आहे:— ज्या नेटिवाच्या हुशारी व लायकीबद्दल खातरी झाली असेल त्यास हिंदुस्थान सरकारानें अथवा त्या सरकारच्या हाताखालच्या सरकारानें सनदी नोकरी द्यावी. ताब्यांतील सरकारास एखाद्या नेटिवास सनदी नोकरी देणें झाल्यास त्या सरकारानें हिंदुस्थान सरकारची मंजुरी पहिल्यानें घेतली पाहिजे. हिंदुस्थासरकारानें अथवा ताब्यांतील सरकारानें नेटिवांस सनदी नोकरी दिल्यास त्याबद्दल स्टेट सेक्रेटरी यांस रिपोर्ट करावा. नेटिवांस सनदी नोकरी दिल्यापासून बारामहिन्याचे आंत स्टेट सेक्रेटरी हे इकडील सरकारानें केलेली नेमणूक मंजूर अथवा रद्द करतील. नेटिवांस सनदी नोकरी आरंभीं तूर्त ह्मणून दिली जाईल. ज्या खात्यांत नेटिवांस सनदी नोकरी मिळाली असेल त्या खात्यासंबंधीं परीक्षा त्या मनुष्यास नेमणूक झाल्यापासून दोन वर्षांचे आंत द्यावी लागेल. परंतु सदरील परिक्षेची माफी करण्याचा अधिकार गव्हरनर जनरल यांजकडेस ठेविला आहे. सदरी सांगितलेली दोन वर्षांची मुदत झाल्यावर हिंदुस्थान सरकार ताब्यांतील सरकारच्या रिपोर्टांवरून अथवा स्वतंत्र चौकशी करून नेमलेल्या मनुष्यास कायम करील अथवा काढून टाकील. ज्या नेटिवास सनदी नोकरी तूर्त दिली आहे त्याजकडून आपल्या अधिकाराचें काम चांगलें होत नाहीं अथवा त्याजकडेस कांहीं गुन्हा लागू झाला होता असें हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आल्यास त्या मनुष्यास दोन वर्षे भरण्यापूर्वींच काढून टाकण्याचा अधिकार सदरील सरकारानें आपल्याकडेस नोंविला आहे. नेटिव सनदी नोकरांस रजा अथवा पेनशन देण्याविषयीं नियम वेळोंवेळीं हिंदुस्थान सरकार सेक्रेटरी आफ. स्टेट यांच्या संमतीनें करतील.

सदरील नियम वांचले ह्मणजे एक दोन गोष्टी मनांत सहज येतात त्या अशा:— सनदी नोकऱ्या नेटिवांस दिल्यानंतर त्यांची व्यवस्था कशी करावी याबद्दल मात्र हे नियम आहेत. दरसाल अथवा कांहीं अंतरानें या जागा नेटिव लोकांस किती द्यावयाच्या याबद्दल कांहींच सांगितलें नाहीं. प्रत्येक वर्षीं सनदी नोकऱ्याकरितां पंचवीस पासून चाळीस पावेतों युरोपियन लोक निवडले जातात. तशी नेटिवांची दरसाल निवड करण्याविषयीं सदरील नियमांत उल्लेख नाहीं. अस्तु. सरकारापासून आमच्या लोकांस जें प्राप्त होईल तें मोठेंच मानलें पाहिजे. सनदी नोकऱ्या नेटिवांस देण्याविषयीं कायदा होऊन आज सुमारें पांच वर्षे झालीं, व या कायद्याप्रमाणें सदरहू स्फुट नियम हिंदुस्थान सरकार करीत आहे ह्मणून आज कित्येक वर्षे घाटत होतें. नेटिवांस सनदी नोकरी देण्याबद्दल नियम करणें तें राज्य संबंधानें पाहिलें असतां बरेच कठीण जावेत असें आह्मास वाटत होतें व या कारणाकरितां या संबंधानें फारसे कोणी उतावेळ झाले नाहींत. परंतु पांच वर्षे वाटाघाट व विचार होऊन हिंदुस्थान सरकारानें नियम केले ते नोकरी दिल्यानंतरच्या व्यवस्थेविषयीं मात्र केले, नोकरी देण्याचे व्यवस्थेविषयीं कांहीं नाहीं. असे नियम करणें होतें तर ते करण्यास पांच वर्षे काय ह्मणून लागलीं? व सदरहू प्रकारेच नियम करण्यांत सरकारास अडचण ती कोणची पडली होती. सदरहू नियम पाहून आह्मास ज्याप्रमाणें सखेदाश्चर्य झालें त्याचप्रमाणें सर्वांस झाल्याखेरीज रहाणार नाहीं. जें काम एका घटकेंत करतां येण्यासारखें त्यास पांच वर्षे लागलीं तेव्हा आतां नेटिवांस प्रत्यक्ष सनदी नोकरी देण्यास किती वर्षे लागतील तें पाहिलें पाहिजे.

ने. ओ.

## सन १८७५ चा जकातीचा कायदा.

हिंदुस्थानांतून परदेशीं जाणाऱ्या मालावर व परदेशांतून हिंदुस्थानांत येणाऱ्या मालावरील जकातीच्या स्केलांत फेरफार करण्याचा विचार करण्याकरितां हिंदुस्थान सरकारानें कलकत्त्यास एक कमेटी नेमली होती. कमिटीचा रिपोर्ट बाहेर पडण्याचे अगोदरच तिच्या शिफारसीवरून हिंदुस्थान सरकारानें जकातीबद्दल नवा कायदा पास केल्याची तार आली आहे. या कायद्याचे संबंधानें सर्व हकीकत कळविण्याची या खेपेस आह्मांस सवड नाहीं. परंतु नव्या कायद्यांत एक दोन फेरफार इतक्या महत्त्वाचे केले आहेत कीं ते याच खेपेस कळविल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. पहिला फेरफार असा कीं हिंदुस्थानांतून परदेशीं जाणाऱ्या पदार्थांपैकीं नीळ, साळ, व तांदूळ हे पदार्थ खेरीजकरून बाकी सर्वांवरील जकात बंद केली त्यामुळें हिंदुस्थानांतून परदेशीं जाणाऱ्या कापड सुतावर जी जकात होती तीही बंद झाली यामुळें या देशांतील गिरण्यांतलें कापड, व सूत परदेशीं जास्त जाऊं लागेल इतकेंच नाहीं परंतु इतर पदार्थ जास्त जाऊं लागतील व त्यामुळें व्यापार वाढेल. सरकारानें सदरहुप्रमाणें जकात बंद केली याकरितां त्यांचे आभार मानले पाहिजेत. परंतु दुसरी जी आपल्पोटेपणाची एक गोष्ट केली आहे ती पाहून आह्मांस फार दुःख वाटतें व त्याप्रमाणें सर्वांसही होईल. हिंदुस्थानच्या कापसापासून यंत्राच्या योगानें थोड्या किमतींत बारीक सूत व कापड काढतां येत नाहीं. परंतु कदाचित् परदेशांतील कापूस आणून या देशांत बारीक सूत व कापड काढण्याचे कारखाने सुरू होतील व त्यापासून विलायतच्या व्यापारास धक्का बसेल याकरितां सरकारानें परदेशाहून येणाऱ्या कापसावर शेंकडा पांच रुपये जकात बसविली आहे. मांचेस्टर एथील लोकांचें कापडावरील जकात कमी करण्याविषयीं मात्र मागणें होतें, परंतु त्यांच्या मागण्यापेक्षांही सरकारानें त्यांस मोठी देणगी दिली आहे. आतां बारीक सूत व कापडाचे कारखाने या देशांत निघण्याविषयीं आशा मुळींच बाळगावयास नको. विलायतचा व्यापार आतां निर्धास्त चालेल. याप्रमाणें आमचें सरकार विलायतच्या व्यापारास जपत असतां हिंदुस्थानच्या कल्याणाकरितां आह्मीं राज्य करीत आहों अशी जी आह्मीं बडबड ऐकतों त्यांत किती अर्थ आहे हें आह्मांस सांगणें नको.

ने. ओ.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

REGISTERED NO. 5, 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० २२ माहे आगष्ट सन १८७[illegible] इ० अंक ३४

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

गणित विषयांचें नवीन पुस्तक.

अंकगणित पुरवणी भाग १ला.

अंकगणित पुरवणी पहिला भाग या नावांचे नवीन पुस्तक तयार केलें आहे. त्यांत चालू अंकगणितांतील विमा, कमिशन, ठेव, क्षेत्रफळ घनफळ आणि प्रश्न समुदाय यांतील प्रश्नांचें पृथःकरण करून नवीन विषय, गणिताच्या उपयोगी सर्व व्याख्या, प्रसिद्ध शद्बांच्या भूमितीच्या व्याख्या, गणितश्रेढी आणि भूमितीश्रेढी यांचीं सर्व कृत्यें, क्षेत्रफळ घनफळ यांचीं आणखी विशेष कृत्यें, दोन संख्या शोधण्याचीं कृत्यें अंकगणितांतील टिपणें (विशेष सूचना,) अंकगणित आणि भूमिति यांच्या सहायानें होणारीं चमत्कारिक उदाहरणें, आणि शेवटीं निवडक १०० प्रश्न असें पुस्तक तयार झालें आहे. याचीं पृष्ठें सुमारें १२५ होतील. आगाऊ किंमत देणारांस आठ आणे आणि मागाहून देणारांस दहा आणे पडतील. शिवाय टपालखर्च पडेल. किंमत तारीख ३० माहे सप्तंबर सन १८७५ इसवीचे आंत पाठविल्यास आगाऊ समजली जाईल. हें पुस्तक आक्टोबर सन १८७५ इसवी पर्यंत तयार होऊन वर्गणीदारांस मिळेल. प्रति किती काढाव्या, याचा विचार, वर्गणीदारांकडून जसा आश्रय मिळेल, त्या बेतानें होईल, याकरितां आश्रयदात्यांनीं होईल तितक्या त्वरेनें कळविण्याची कृपा तारीख ३१ माहे आगष्टच्या आंत करावी. पत्र नाटपेड पाठवूं नये, पैसा पाठविणें तो पुढील पत्त्यावर पाठवावा.

नारो रघुनाथ मोहोळकर

हेडमास्तर ट्रेनिंग कालेज मराठी भाग

अकोला, वऱ्हाड.

क्रम

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. गेल्या महिन्यांत आमचे देऊळगावीं पटकीनें पीडित १५० मनुष्यांपैकीं सुमार ५० मनुष्यें मरण पावलीं. आसपासचे खेडेगांवांतून सुमार ३०० आजारी होऊन त्यापैकीं सुमार ८० मनुष्यें यमसदनास गेलीं. या गावीं रोगग्रस्त लोकांस डाक्टर, पोलिस आणि त्यांत विशेषेंकरून डिपुटी पोस्ट मास्तर यांचे औषधीपासून बहुत फायदा झाला. असें ऐकतों कीं ९ माणसास या मास्तराचे औषध मिळालें पैकीं एक मात्र जाया झाला. आणखीही बहुतांचा फायदा झाला असता परंतु आह्मा देऊळ गावकरांचें नशीबच खोटें. देव देतो परंतु कपाळ नेतें त्यास काय उपाय!

आपण आह्मालोकांची दाद सरकारांत सांगून हल्लीचे नेटिव डाक्टराचे गांजणुकींतून रयतेनें सुटावें ह्मणून एका फिरस्त्याचें पत्र मागील येका अंकीं प्रसिद्ध केलें होतें त्याची आठवण आहे काय? प्रसिध्ध झालेला मजकूर पाहून आमचे प्रसिद्ध अय्या डाक्टर अगदीं गरम झाले आहेत. आपणास, यानें पत्र लिहिलें असेल, त्यानें लिहिलें असेल, असें मानुन ज्याचे त्याचेवर पिसाळल्याप्रमाणें तोंड टाकित असतात, घटकेंत वर्तमानपत्रकर्त्यावर फिर्याद करावी असें मनांत येतें तोंच त्यांत लिहिलें प्रमाणें पुरावा झाल्यास व्यर्थ पैशाची नुकसानी होऊन उलटी फजिती जास्त होणार असें वाटूं लागतें. सारांश असें आहे तरी आमचे वैद्यराज अगदी कावरे बावरे झाले आहेत. केव्हां काय करतील याचा नेम नाहीं सबब कंबर बांधून तयार असा. प्रतिवादीचें काम बजावण्याची पाळी येऊ शकेल.

या अशा भयंकर दिवसांत आपणास कांहीं होऊं लागेल ह्मणून आमचे वैद्यराज रोग्याचे घरीं ढुंकून सुद्धां पहात नसत परंतु सिविल सर्जन साहेबांकडून चाबूक आल्यावरून अलीकडे रोग्याकडे एकवार जाऊं लागले आहेत. गावांतील कितीएक संभावित लोकांनीं मुंबई इलाख्यांत नवीन निघालेल्या गोळ्या व कालरा, पिल्स नावाच्या गोळ्या वगैरेचा संग्रह करून ठेविला आहे. ही औषधी रोगी आजारी होतांच जर सुरूं केली तर बहुधा रोगी मृत्यूच्या जाभाडांत सांपडत नाहीं असें येथें अनुभवास आलें आहे. आमचे येथिल डिपुटी पोस्ट मास्तरचे औषधीपासून पांच च्यार जणांस गुण येतांच गावांत पुकार झाली कीं त्यांचें औषध चांगलें आहे. मग कोणीही उठला कीं चालला त्यांचे औषधाकारिता. असें होतांच अहंपणोंन परिपूर्ण अशा डाक्टर मूर्तींनीं श्रीमंत [illegible]ांची स्पर्धा उत्पन्न होऊन सूड उगविण्याची संधी पाहूं लागले. एवढेंच नव्हे तर प्रयत्न ही केला. व तो सफल झाला असें त्यांस वाटूं लागलें आहे.

पोस्ट मास्तरानीं औषध दिल्यापैकीं एक रोगी मरतांच डाक्टरनीं बांधली कंबर, गेले पोलिस स्टेशनांत, केला रिपोर्ट 'हमकू शुभा है' ह्मणून, घेतले पोलिसचे लोक बरोबर, व केली पंचाइतनाम्यास सुरुवात, पण मयताचे घरच्यानीं कळविलें कीं क्लोरोडाइन व कालरापिल्स हीं औषधें दवाखान्यांतून आणण्यास मास्तरानीं आह्मास सांगितलें त्याप्रमाणें आम्ही परस्पर डाक्टरापासून आणून मयतास दिलीं. अशी जबानी होतांच उतरलें डाक्टर साहेबाचे तोंडावरचें पाणी!! विषप्रयोग केल्याचा च्यार्ज ठेवण्यास सापडेना; मग असें सर्टिफिकिट दिलें कीं, औषध देणाराचे अडाणीपणामुळें हा मृत्यु झाला! वा: कायहो शहाणपणाचा तारा तुटला हा! मास्तराची शिफारस सरकारांत लिहावयाची ती तर एकीकडेच राहिली पण त्याचा जीव घेण्यास पाहूं लागले. शाबास हो डाक्टर अय्या, धन्य तुमची! बरें पुढें जिल्ह्याचे अधिकारी यांणीं विशेष चवकशी न करितां या भागांचे पोस्टाचे अधिकारी यांजकडे शिफारस केली कीं डाक्टरचे कामांत पोस्टमास्तर अन्यायानें हात घालतो यास चाकरींतून कमी करावें. त्यावरून हल्लीं पोस्ट मास्तर संस्पिड झाले आहेत, आतां पहावें पुढें काय होतें! चोर सोडून धरलेल्या सन्याशास सुळी देतात कीं काय? निकालाअंतीं सेवेस दोन ओळी हजर करीन कळावें तारीख १० माहे आगष्ट सन १८७४. इसवी. मुक्काम देऊळगाव राजा.

दुसऱ्याचे दुःखानें कळवळणारा

क्ष.

### स्टेशनावरील पोस्टाची पेटी

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० ठिकठिकाणीं रेलवे स्टेशनावर पोस्टाचीं पत्रें टाकण्याच्या पेट्या असत तेणेंकरून लोकांस जलदीचीं पत्रें टाकण्यास मोठी उत्तम सोय होती. परंतु अलीकडे थोडे दिवस झाले अकोल्याच्या रेलवे स्टेशनावरील पोस्टाची पेटी त्या खात्याचे अधिकाऱ्यानीं काढून नेली याप्रमाणें दुसऱ्या सर्व स्टेशनावरून झालें आहे कीं काय ठाऊक नाहीं व याचें कारण काय तेंही समजलें नाहीं.

टपालखातें सर्व लोकांच्या सोयीकरितां आहे. पोस्ट आफिस गावापासून लांब आहे व लोकांस तितके लांब जाण्यास अडचण पडते ह्मणून गावांतून पोस्टाचे खाब व पेट्या ठेविल्या आहेत. अकोल्यास गावांत एक खांब आहे. व ताजना पेठेच्या चौकांत एक पेटी आहे आणि रेलवे स्टेशनावर एक पेटी असे तेणेंकरून त्या त्या भागाच्या लगत्याचे लोकांस टपालांत पत्रें घालण्याकरितां लांब हेलपाटे घ्यावयास नकोत हा त्यांत हेतु असावा असें मला वाटतें. मुंबईस अशीं स्थानें तर डझनच्या डझन आहेत व रेलवे स्टेशनावर प्रत्येकी पहाण्यांत येतात असें असतां, आणि अकोला गाव मोठा असतां, एथील रेलवे स्टेशनावरील पोस्टाची पेटी काढून नेणें त्या खात्याचे वरिष्ठांस मोठें टपक्याचें आहे असें मला वाटतें.

गोर गरिबास रेलवे ट्रेन येण्याचे वेळीं प्लयाटफार्मवर येऊ देत नाहींत तशांस पेटींत पत्र घालणें फार सोयीचें असे. व कोणी आपला गडी, मनुष्य आयते वेळीं पत्र देऊन स्टेशनावर पाठविला तर त्यास गाडीचे वेळीं टिकिटाशिवाय प्लयाटफार्मवर येऊ देत नाहींत ह्मणून ते पेटींत पत्रें टाकून चालते होत असत तीं सर्व सोय पेटी तेथून काढल्यानें आतां बंद झाली आहे.

पोस्टाचीं पाकिटें बंद करण्याची नियमित वेळ आहे तिच्या पूर्वींच पुष्कळ आधीं पाकिटें बंद करितात व त्यामुळें पाठविणाराचे संकेताप्रमाणें वक्तशीर पत्रें जात नाहींत असें बहुत प्रसंगीं आढळलें आहे. नुकतेंच गेले आठवड्याचे पत्रांत तुमचे उमरावतीकर मित्रानें लिहिलें आहे कीं शुक्रवारीं सकाळीं पोस्टांत पत्र टाकलेलें तेथून दीड वाजतां निघणाऱ्या आगगाडींत पडलें नाहीं व शनिवारीं तुह्मास पोंचलें नाहीं त्यामुळें आठ दिवस तें रखडत पडून दुसऱ्या आठवड्याच्या तुमच्या पत्रांत ह्मणजे नऊ दिवसांनीं प्रसिद्ध झालें अशी तर पोस्टाची व्यवस्था आहे ह्मणून लोक रेलवे स्टेशनावर आयते वेळीं पत्र घेऊन जात आणि ही पेटी काढून नेल्यानें त्याचीही त्या खात्यानें बंदी केली तेव्हां त्यास काय ह्मणावें?

मुंबईहून विलायतेची आगबोट जाते तेव्हां पोस्टाच्या वेळेविषयीं तिचे कसे तऱ्हेतऱ्हेचे प्रकार असतात हें तुमच्या वाचकास ठाऊक असेलच. ह्मणजे त्यांची जाहिरात असते कीं अमुक एक दोन वाजतां साधारण टप्पा बंद व्हावयाचा तर रजिस्टर पत्रें ४ वाजतां बंद व्हावयाचीं, व ५ वाजतां अमुक प्रकारचीं पाकिटें एकस्ट्रा फी दिली असतां घ्यावयाची तशींच आगबोटीवरही पत्रें दिलीं तर अमुक अधिक फी घ्यावयाची असे नियम असतात व लोक तसे प्रकारची फी भरूनही शेकडो पत्रें आयते वेळीं नेऊन टाकितात सारांश वेळेचें मोल पुष्कळ आहे आणि टपालवाले टप्पा लवकर बंद करितात यामुळें लोकांस रेलवेस्टेशनावर पत्रें घेऊन जाणें भाग पडतें व तें जाणें कांहीं गैरकायदा नसावें याजकरितां पोस्टानें तेथील पेटी मना करूं नये असें मला वाटतें-

स्टेशनावरील पेटी पोस्टानें बंद केली तर आगगाडीला जी पोस्टाची पेटी असते ती बंद व्हावी, तसें झाल्याचें कोठें आ

दळत नाहीं. व साहेब लोकांची वगैरे पुष्कळ पत्रें शिपाई लोक स्टेशनावर घेऊन येतात आणि आयते वेळीं गाडी आल्यावर फ्ल्याटफार्मवरून गाडीच्या पेटींत पत्रें टाकितात त्यांस मात्र मोकळीक आहे आणि गरीब लोकांस फ्ल्याटफार्मवर जाण्यास बंदी आहे व त्यांच्या सोयीकरितां पोस्टाची पेटी स्टेशनावर ठेविली होती ती काढून नेली आहे हा कसा काय प्रकार आहे तो पहावा व योग्य अधिकाऱ्यास सूचना करून लोकांची गैरसोय दूर करावी अशी तुह्मास विनंती आहे. कळावें तारिख १८ आगष्ट सन १८७५ इसवी.

एक
गरीब ग्रामस्थ

---

NOTICE.

The efect of the late Doctor Sinclair consisting of household furniture and a few useful books will be sold by publik auction at the barracks at 7 A. M. on the 28 th. Instaut [Saterday].

Akola
20th August
1875

R. Bullock.
Offig. Deputy
Commissionor
Akola.

---

## जाहिरखबर

सर्व लोकांस कळावें कीं डाक्टर सिंक्लेर साहिबाचें घरगुतीं सामान ( फर्निचर ) व थोडी उपयुक्त पुस्तकें येथें आहेत तीं ते राहात होते त्या बराकींत पुढील शनिवारीं ह्मणजे तारीख २८ माहे आगष्ट सन १८७५ इसवी रोजीं सकाळीं ७ वाजतां जाहिर लिलावानें विकलीं जातील

अकोला तारीख २०
माहे आगष्ट १८७५

आर बुलक
आफिशियेटिंग डिपुटी
कमिशनर अकोला.

---

## नोटिसा.

नोटिस—तुळशी मर्द राघो वल्लद भगाजी गावंडे रहाणार शिरसोली तालुके अकोट इला नोटिस देणार भगाजी वल्लद मानाजी गावंडे रहाणार मजकूर. नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझी सून असून माझा मयत लेक राघो याची तूं बायको आहेस सबब तुला कळविण्यांत येतें कीं. माझा लेक मेल्यास सुमार दोन महिने झाले. त्या दिवसापासून माझा लेक नामे सिताराम याजबरोबर तूं तंटा करून जिनगीचा हिस्सा मागतेस; परंतु तुझे पोटीं संतती नाहीं. व जिनगीही माझ्या दोघा लेकांची नसून सर्व शेतें व जेवारीचीं पेवें वगैरे सर्व जिनगी माझी आहे. ह्मणजे मी संपादन केली आहे करितां माझ्या जिनगीवर माझ्या पोरांचा मी जिवंत आहे तोंवर एकाचाही हक्क चालत नाहीं. मी ज्या प्रमाणें आजपर्यंत आपल्या पोरांचें पालन केलें त्याप्रमाणें पुढेंही असलेल्या पोरांचें करणार. आहे. व त्यांस मी आपली जिनगी देणार. तुझा हक्क जिनगीवर बिलकूल नाहीं. तूं मे० तहाशिलदार साहेब तालुके अकोट यांजकडे फिर्याद वगैरे केली होती त्यावरून तहाशिलदार साहेबांनीं तुला अन्नवस्त्र देण्याविषयीं मला सांगितलें. तूं माझी सून आहेस सबब तूं इमानें इतबारें व नीति धारण करून रहाशील तर तुला अन्नवस्त्र देण्याचें करीनें नाहीं तर तेंही तुला मिळणार नाहीं. शिवाय तूं दुसरा नवरा करून गेल्यासही, आमची हरकत नाहीं. तूं आमचे घरांतून शेतीसंबंधी चिजा व मनास वाटेल ती जिन्नस माझी ह्मणून तूं न विच्यारतां दुसऱ्यास देतेस व आमच्या पश्चात् विकतेस; परंतु हें करण्यास तुला योग्य नाहीं. तुझा स्थावरजंगम जिनगीवर बिलकूल हक्क नाहीं. सर्व जिनगी माझी आहे. माझा पुत्र राघो याला जें देणें घेणें होतें तें मी देणार व घेणार आहे. कारण तो मजजवळून वेगळा नसून तूं घरांत नित्य भांडण करून तंटा करीस सबब मी दोघांस दोहों जागीं ठेवून त्यांजकडून शेतीचें काम करून घेई व त्यांस खाण्यास पुरवित असे. माझ्यानें शेतीची व्यवस्था होत नाहीं हें तुला ठाऊकच आहे. मी आज तीन वर्षें दुखणाईत घरीं पडून असतों. सबब हलीं या सर्व जिनगीचा वहिवाटदार व वारिसदार माझा धाकटा लेक नामे शिवराम हा केला आहे व तूर्त सर्व जिनगी त्याच्या ताब्यांत दिली आहे. तूं विनाकारण तंटा करून सरकारांत अर्ज करीत फिरण्यांत अर्थ नाहीं. तुला आमच्यांत रहाणें असेल तर अन्नवस्त्र घेऊन रहावें, नाहीं तर नवरा करून जावें. तुला जिनगी बिलकूल मिळणार नाहीं व तुझा जिनगीवर हक्कही नाहीं. कळावें. तारिख २० माहे आगस्ट १८७५ इ.

(सही) भगाजी वल्लद मानाजी गावंडे
रहाणार शिरसोली निशाणी
खुरपें खुद्द हातचें

---

नोटिस—खंडप्पा वलद कृष्णप्पा मुलंगे वाणी राहणार शेलगाव तालुके मेहेकर जिल्हा बुलढाणें यांस नोटिस देणार गुजी कोम खंडाप्पा मुलंगे वाणी हल्ली वस्ती मोप तालुके व जिल्हा वाशिम इजकडून देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून लग्न झाल्यावर सुमार सहा सात वर्षें मजला तुह्मी वागविलें पुढें उनाच्या सालीं फार माहागाई झाल्यानें तुमच्या घरीं अन्न वस्त्राची फारच कमताई झाली कारणानें मजवर खोटा परजातीचे हातची भाकर खाल्ली असा दोष आणून तो खरा करून न दाखवितां मजला माझे भावाचे येथें आणून पोचविलें परंतु माझे भावानें आपले येथें न ठेवितां पुन्हा तसेच परत तुमचे घरीं पाठविलें असें दोन वेळा झालें नंतर तुह्मी पांच च्यार दिवस मजला घरीं ठेऊन मग रिसोडास आज्याचे घरीं पोचाविलें ही वातमी माझ्या भावास लागली तेव्हां मग त्यानीं मला नाइलाजानें आपले घरीं नेलें त्यास चार वर्षें झालीं. मध्यंतरीं माझा भाऊ तुमचे येथें येऊन तुह्मास घेऊन जाण्याविषयीं सांगितलें त्यास उत्तर दिलें कीं, ती आह्मास नको. तरी मी आज चार वर्षें तुह्मी मला नांदविण्यास न्याल ह्मणून वाट पाहिली, पण आजपर्यंत नेलें नाहीं. ह्मणून आतां या नोटिशीनें कळविते कीं, मी आपले भावाचे घरीं आज चार वर्षें आहे तर त्याचे दर महा ५ रुपये प्रमाणें आकार २४० रुपये खर्चाबद्दल देऊन मला घेऊन जावें मी येण्यास कबूल आहे. तुह्मी जी मजवर खोटी परजातीचे येथें भाकर खाल्याची आळ घातली ती तर खोटीच आहे पण जातीचे आग्रहास्तव खेर्डे मुकामीं आपले जाती धर्मीप्रमाणें शुध्धही झाले आहे त्याबद्दल पंचवीस रुपये खर्च झाला आहे तर ते पंचवीस रुपये व अन्नवस्त्राचे रुपये २४० येकूण रुपये ही नोटिस पोहोंचल्यापासून आठ दिवसांचे आंत माझे भावास देऊन मजला घेऊन जावें असें न कराल तर मजवर तुमचा बिलकुल हक्क रहाणार नाहीं व मी दुसरा नवरा करीन हें खूप समजावें. शिवाय अन्न वस्त्राबद्दल व शुद्धीचे रुपयाबद्दल खर्च घेण्याची कायद्याप्रमाणें तजवीज करीन कळावें तारीख ८ आगष्ट सन १८७५ इसवी.

(सही) गुणी मर्द खंडाप्पा मुलंगे वाणी
इचे हातची बांगडी

---

## वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ६ शके १७९७

## मास्तर लोकांची वर्गावर्गी व मि० इलियट साहेब यांची योग्य निवड.

मनुष्यास प्रसंग आल्याशिवाय योग्यता दाखवितां येत नाहीं ह्मणून कोणाचे झाकलेले गुण तावत्कालपर्यंत लोक दृष्टीपुढें येत नाहींत. आमचे विद्याखात्याचे आफिसियेटिंग डायरेक्टर मि. इलियट साहेब मुंबई इलाख्यांतील सिविलियन आहेत, हुशार आहेत, व चुरचुरीत आहेत पण त्याचप्रमाणें मास्तर लोकांचे गुण व श्रम जाणून ते त्यांची बूज करितात किंवा नाहीं हें पहाण्याचा योग्य प्रसंग अजून आला नव्हता तो याच आठवड्यांत आला वतो त्यांनीं उत्तम रीतीनें साधला हें पाहून आह्मांस संतोष होतो.

उमरावतीच्या हायस्कुलांतील सेकंड असिस्टंट मास्तर रा. रा. बळवंत रामकृष्ण पाटील मरण पावले त्यांची जागा कोणास मिळेल याविषयीं लोक नानाप्रकारच्या कल्पना करीत होते. व कालपर्यंत आह्मांस त्याविषयीं कांहीं समजलें नव्हतें पण खालीं लिहिलेल्या नेमणुका मि. इलियट साहेबांनीं केल्या असें आज पहाटे समजलें सबब त्या आजच्याआज आह्मी छापून प्रसिद्ध करितों.

बळवंतराव पाटलाचे १५० रुपयांचे जागेवर इलिचपुरचे हेड मास्तर रा. रा. विसाजी रघुनाथ जोशी यांस नेमिलें. त्यांचे १२५ रुपयांचे जागेवर अकोटचे हेड मास्तर रा. रा. केशव ब्रह्मगिरी यांस नेमिलें. त्यांचे १०० रुपयांचे जागेवर उमरावती मिडलक्लास स्कुलचे हेड मास्तर रा. सदाशिव गोविंद दामले यांस नेमिलें. त्यांचे ७५ रुपायांचे जागेवर तितक्याच पगाराचे मेहेकरचे हेड मास्तर रा. रा. गोविंद विश्वनाथ यांस नेमिलें. व त्यांच्या जागेवर त्याच पगाराचे देऊळगावचे हेड मास्तर रा. गंगाधर रामचंद्र जोशी यांस नेमिलें. त्यांचे ७५ रुपयांचे जागेवर मूर्तिजापुरचे ६० रु. चे हेड मास्तर रा. रा. नारायण प्रभाकर परांजपे यांस नेमिलें. त्यांचे जागेवर अकोला हायस्कुलांतील ५० रु० चे असिस्टंट मास्तर रा. रा. अंताजी नारायण यांस नेमिलें. व त्यांची ५० रु० ची जागा वऱ्हाडांतून लिटलगो पास झालेले गृहस्थ रा. रा. कृष्णाजी मल्हार यांस दिली.

या नेमणुका इलियट साहेबांनीं फार विच्यारपूर्वक केल्या व ज्यांस बढती देणें प्रस्तुत अवश्य होतें त्यांस त्यांनीं बढती दिली. जे स्थलांतर मागत होते व ज्यांचे स्थलांतर करणें अवश्य होतें त्यांच्या पगाराचें नुकसान न करितां त्यांचीं स्थलें बदललीं. व बंधु मरण पावल्याच्या दुःख, कारक अडचणीनें गांजल्यामुळें व प्रपंच्याचा भार शिरावर पडल्यामुळें बी. ए.ची तयारी चाललेली सोडून देऊन कृष्णाजी मल्हार नोकरीच्या खटपटीस लागून त्रस्त झाले होते त्यांस त्यांनीं हायस्कुलांत नोकरी दिली हें फार चांगलें केलें व या एकंदर योजिनेबद्दल आह्मी डायरेक्टर साहेबांची तारीफ करितों.

अकोल्याच्या हायस्कुलांत आतां ३ असिस्टंट मास्तर लिटिलगोचे झाले- एक म्याट्रिक्युलेटेड व फर्स्ट असिस्टंट मास्तर एम ए आहेत पण हेड मास्तरास कांहीं डिग्री आहे काय?

---

## श्री. मल्हारराव गायकवाड.

श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांस पदच्युत करून मद्रासेस रवाना केल्यापासून त्यांचे वकिलाशीही त्यांस बोलू देत नव्हते ती परमाणगी विलायत सरकारापर्यंत भांडून तुकतीच त्यांनीं मिळविली, आतां त्या परवानगींतही अशी हरकत घातली आहे कीं त्यांच्यावर देखरेख ठेवणारे जेलर किंवा डा० सिवार्ड हे समक्ष असल्याशिवाय त्यांची व वकिलांची भेट होऊं द्यावयाची नाहीं. त्याबद्दलही मल्हाररावानीं अर्ज केला आहे कीं वकिलाशी सला मसलत करण्याचे प्रसंगीं इंग्रज सरकारचे पहारेकरी नजिक नसावेत. खरेंच. इंग्रज सरकारावर त्यांनां अपील करावयाचें असलें तर तें करण्यापूर्वींच सिवार्ड साहेबांस कळावें यांत अर्थ काय? व असें बंदोबस्तीनें वकिलाशी भेटणें ह्मणजे मग त्यांत खलबत तें काय? आह्मांस ठाऊक आहे कीं मल्हाररावाविषयीं शेवटचा जो जाहिरनामा लाविला त्यांत त्याला कैदी केलें असें कोठें लिहिलेलें नाहीं. व मोठे जबरदस्त गुन्ह्याचे कैदी लोकांसही आपले वकिलाशी एकांतीं भेटण्यास सरकार परमाणगी देते तर या मल्हाररावाच्याच मुकदम्यांत हिंदुस्थान सरकारानें अशी अढी धरणें हें मोठें विलक्षण दिसतें. पण बडोद्याच्या प्रकरणांत आजपर्यंत सुलक्षण अशा थोड्याच गोष्टी आल्या आहेत ह्मणून या एका विलक्षण प्रकाराची फारशी मातबरी लोक समजणार नाहींत अस्तु. हिंदुस्थान सरकारानें अजून तरी चांगला विच्यार करून मल्हाररावास त्यांच्या मागण्याच्या गोष्टींत इनसाफ देण्याविष[illegible] मेहेरबानीची नजर ठेवावी अशी आग[illegible]च्छा आहे.

## वऱ्हाड

रा. रा. परशराम सखाराम गुप्ते उमरावती डिपुटी कमिशनरचे माजी हेड क्लार्क हे सोमवारीं येथें आले आहेत. डायरेक्टर साहेबांचे भेटीसही ते गेले होते. विद्याखात्यांत उमरावतीची १९० रुपये पगाराची जागा खाली झाली आहे तिच्या वर्गावर्गीत एकादी शे सवाशाची जागा आपणास मिळावी असा त्यांचा मानस होता. आमचे वाचकांस ठाऊक असेल कीं रेसिडेंट साहेबांनीं परशरामराव यांविषयीं नुकताच ठराव केला आहे कीं विद्याखातें, स्यानिटरीखातें, पोलिसखातें, वगैरे जुडिशियल खात्याशिवाय जीं खातीं आहेत त्यांतून एकादांत त्यांस जागा मिळण्यास हरकत नाहीं. व हा ठराव झाल्यावर डायरेक्टर साहेबांकडे रेसिडेंट साहेबांचें सर्क्युलरही आलें होतें कीं आपले खात्यांत एकादि जागा झाल्यास त्यांस द्यावी. त्यावरून संधी पाहून ते डायरेक्टर साहेबाकडे आले. मि० इलियट साहेब त्यांवर कृपेची नजर पुरऊन त्यांस एकादि जागा देते तर बरें होतें. या गृहस्थास रिकामे होऊन तीन वर्षे झालीं. व विनाकारण दुर्जनानीं आणिलेल्या आरोपाचे निवृत्यर्थ त्यांस कलकत्त्यास व हैदराबादेस जाऊन महिनेच्या महिने अर्ज करीत रखडत बसावें लागलें व शेंकडों रुपये त्या निमित्त खर्च करावा लागला ह्मणून प्रस्तुत त्यांची स्थिति मोठी दीनवाणी झाली आहे याजकरितां जे त्यांजवर आतां कृपा करितील ते परमेश्वराचे उत्धारक हस्त समजावयाचे. परशरामराव यांस शाळाखात्यांत नोकरी करावयाची इच्छा आहे तरी ते मास्तर होऊं इच्छित नाहींत दुसऱ्या प्रकारच्या ज्या जागा आहेत त्यांतील एकादीविषयीं त्यांचें मागणें आहे व तें अयुक्तिक नाहीं असें आमचें मत आहे. यास्तव पुढें मागें प्रसंग आल्यास आमचे डायरेक्टर साहेब त्यांस विसरणार नाहींत.

**कोर्ट फीचे स्टांप**– हैदराबादचे रेसिडेंट साहेबांनीं नंबर ६९ तारीख ४ आगष्ट सन १८७९ ची जाहिरात पांचवे तारखेच्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध केली आहे तिचें तात्पर्य:—

सन १८७० चा कोर्ट फीचा आक्ट याचें कलम २७ ब यांत लोकल गव्हर्मेंट (इलाख्याचें सरकार) यांस जे स्टांप कायद्याप्रमाणें डकविणें अवश्य आहे त्यांची संख्या ठरविण्याचे कामीं नियम करण्यास अधिकार दिला आहे त्या अन्वयें व हिंदुस्थान सरकारचा जाहिरनामा नंबर १९२० तारीख ९ मार्च सन १८७९ इसवीचा, तशा प्रकारचे नियम करून ते एप्रिलच्या पहिले तारखेपासून अमलांत आणण्याविषयीं झाला आहे त्या अन्वयें रेसिडेंट साहेब ठराव करितात कीं अमुक दस्तैवजास कायद्यांत अमुक किमतीचा स्टांप असावा असा नियम आहे त्याप्रमाणें त्या किमतीचा एकच स्टांप घेऊन तो दस्तैवजास लावित जावा. त्या किंमतीचा स्टांप सरकारानें केलेलाच नसेल तर त्या खालच्या किमतीचा एक व भरतीचा दुसरा एक असे लावित जावे ह्मणजे स्टांपाची संख्या कागदावर जितकी कमी होऊं शकेल तितकी केली पाहिजे.

ले० एच सी. फाक्स. आर. ई. पूर्व वऱ्हाडचे टेंपररी एक्झिक्युटिव इंजिनियर तीन महिन्यांचे रजेवर गेले होते ते परत आले.

मि० डब्ल्यु. पी गाडफ्री पूर्व वऱ्हाडचे पब्लिकवर्क्स खात्याचे अकौंटंट यांस २९ दिवसांची रजा दिली होती तीप्रमाणें ते रजेवर जाऊन आपले कामावर परत आले.

वाशिम जिल्ह्यांत मंगरूळ पीर येथें नवीन तालुका करण्याचा ठराव झाला व त्याजवर मि० शाबासखान तहशिलदार नेमिलेले दोन महिने येथेंच आहेत ते आज रोजीं आपले कामावर रुजू होण्याकरितां प्रथम वाशिमास जाणार. तसेंच यवतमाळ जिल्ह्यांत पांढरकवडा येथें तहशिली झाली तिजवर ज्यांस नेमिलें आहे त्यांचें नाव मि० शेषाचलं मुदलियार असें आहे. हे हैदराबादेस रेसिडेंट साहेबांचे आफिसांत क्लार्क होते तेही आतां लवकरच येऊन आपले कामावर रुजू होतील.

मलकापुरचे आनररी माजिस्त्रेट मि० काजी बद्रोदीन कांहीं कामा निमित्त येथें आले आहेत.

वाशिम जिल्हा जरी आज बहुत दिवस वेगळा झालेला आहे तरी तेथील अधिकाऱ्यास सरकारी कागदपत्रीं डिपुटी कमिशनर न ह्मणतां असिस्टंट कमिशनर इनच्यार्ज वाशिम जिल्हा असें ह्मणत असतात. परंतु आतां तो जिल्हा इतर जिल्ह्याप्रमाणें स्वतंत्र करून तेथील मुख्याधिकाऱ्यास डिपुटी कमिशनरचा हुद्दा द्यावा अशी तजवीज होत आहे असें ऐकतों.

अकोल्याचे तहशिलदार रा. रा. गोविंदराज अय्या मंगळवारीं मोरशीकडे आपले नवे जागेवर जाणार.

उमरावती जिल्ह्यांतील चांदुरचे नायब तहशिलदार मि० सिताराम माणकेश्वर यांस थर्ड क्लास माजिस्त्रेटचे अधिकार मिळाले.

अकोला पोलिसचे कोर्ट इन्स्पेक्टर मि० शेखहैदर यांनीं नायब तहशिलदारीची जागा मिळण्याविषयीं अर्ज केला आहे असें ऐकतो यांची लोअर स्टयांडर्डची परीक्षा पास झालेली आहे. व यांस हल्लींचे जागेवर ६० रुपये पगार आहे व हे हुशार आहेत तेव्हां यांनां तशी येकादी जागा मिळेल असें वाटतें.

नवीन जे दोन तालुके होत आहेत त्यांतील नायब तहशिलदाराचे पगार ३९ रुपयांहून अधिक होणार नाहींत असें समजतें.

डा० सिंक्लेर साहेब माजी डायरेक्टर यांचें खासगी सामान व पुस्तकें यांचा येत्या शनिवारीं सकाळीं लिलाव होणार आहे.

शाळांतून मोडी वाचन चांगलें व्हावें याकरितां हस्त लिखित कागद सोपे अवघड असे मिळवून त्यांची पुस्तकें बांधावीं व शाळेंत ठेवावीं. तीं पुस्तकें ज्यांची उत्तम ठरतील त्यांस २० रुपयांचें बक्षिस दिलें जाईल व हें बक्षिस दर जिल्ह्यांत एक मिळेल असा डायरेक्टर साहेबानीं रेसिडेंट साहेबांचे इच्छेवरून ठराव केल्याचे समजतें.

वणीहून गेल्या सोमवारीं आह्मास एक पत्र आलें त्यावरून समजतें कीं दोन तीन दिवसांपासून तिकडे हवेचा उपद्रव सुरू झाला आहे. १२ वे तारखेस १ मनुष्य मरण पावला व १३ वीस तीन मरण पावले. अमांश व हगवण पुष्कळांस झाली आहे. व परजन्य पुष्कळ पडत आहे.

मि० एन चिन्नास्वामी पिले पश्चिम वऱ्हाडांतील ओव्हरसियर रजेवरून परत आले.

गेल्या महिन्यांत रजिस्टर खात्याकडील फीचे दराचे नवीन नियम झालेले रेसिडेन्सी आर्डरमध्यें छापून प्रासिध्द झाले आहेत ते पुढील अंकांत आह्मी आपले वाचकांकरिता घेऊ.

अकोल्यास गेले सोमवारीं श्रावणी पौर्णिमेचे दिवशीं ब्राह्मण जातींतील यजुर्वेदी एक गरीब मनुष्य स्नानास गेलेला न दोमथल्या एका विहिरींत गाळांत फसून मरण पावला. त्याचा बाप व चुलता फार वृध्द व निराश्रित आहेत. बंधु नाहीं व बायको गरोदर आहे. तिचे पुर्व दिवशींच डोहळजेवणाचे पायघड्यांचे सोहळे झाले होते.

**उमरावती**—(मित्राकडून) तारिख १९ आगष्ट—अलीकडे दोन तीन दिवसांत पाऊस अगदी नाहीं. हवेंत गर्मी चांगली वाटूं लागली आहे. गेल्या रविवारीं चांगला पाऊस पडला. पावसाकडे लोकांचे चातक पक्षाप्रमाणें डोळे लागून राहिले आहेत. श्रावण महिना ह्मणजे पावसाचें माहेरघर असें असून पावसाविषयीं लोकांची हाकाहाक असावी हें आश्चर्य आहे. पिकें ह्मणण्याजोगीं वाईट नाहींत परंतु हवेंतील गर्मी जशी व्हावी तशी कमी झाली नाहीं.

मे. रे. कमिशनर साहेबांची स्वारी मंगळवारीं नागपुराकडेस गेल्याचे समजतें.

गेल्या मंगळवारीं नागपुरचे गाडीस चांदूर आणि बडनेर या स्टेशनांमध्यें अंजनगाव बारी या गावाजवळ अपघात झाला. गाडी रुळाचे बाहेर गेली सबब बऱ्याच गाड्याचा चुरा होऊन दोन मनुष्यांस चांगली दुखापत झाली व बरेच लोक जायां झाले. गाडीस आपघात होण्याचे कारण समजलें नाहीं. येथें गाडी चार वाजतां यावयाची ती सहावाजल्यावर आली. प्राणहानी झाली नाहीं पाहून बरें वाटतें.

आह्मास लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं. तारीख १९ मिनहू रोजीं रात्री सुमार ११ वाजतां येथील हायस्कुलांतील सेकंड असिस्टंट मास्तर रा. रा. बळवंतराव पाटील यांस देवाज्ञा झाली. अकालीं देवाज्ञा होण्याचें कारण अकावाईनें यांस गाठिलें. गुरुवार तारीख ८ रोजीं त्यांस वयानें पकडलें. दुसरे दिवशीं त्यांची प्रकृति चांगली दुरुस्त झाली व पुढें असा भयंकर परिणाम होईल असें बिलकूल वाटलें नाहीं. शनिवारीं पुन्हा वायु होऊन प्रकृति बिघडून रविवारी वर लिहिल्यांप्रमाणें भयंकर प्रसंग घडून आला यांचे मागें त्यांची नुतन विवाहित १३।१४ वर्षांची पत्नी व ११।१२ वर्षांचा मुलगा असे आहेत. बळवंतराव हे शाळाखात्यांत होते सबब निदान आपल्या खात्यांतील असें समजून तरी येथील सर्व शाळाखात्यातील लोकांनीं त्यांची सर्व प्रकारें व्यवस्था ठेवावयाची होती पण तसें झालें नाहीं असें ऐकिवांत आहे आणि हें खचीत असेल तर मोठीच आश्चर्याची गोष्ट समजली पाहिजे. फक्त रा. रा. रघुनाथराव बी ए मात्र यांचे खटपटींत होते अस्तु त्यांचा मुलगा व बायको हे दोघेही लहान असल्याकारणानें त्यांचे मिलकतीची काय व्यवस्था झाली हें बरोबर समजलें नाहीं.

दुसरी एक गोष्ट लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं येथील मोफ्युसिल कंपनींतील एजंट मे० दुगल साहेब यांस काल रोजीं १२ वाजतां हवेचा उपद्रव होऊन आज सकाळीं ८ वाजतां देवाज्ञा झाली. आमचे असें ऐकण्यांत आहे कीं हे गृहस्थ व्यापारी असून फार लोकप्रिय होते व हाताखालच्या कामगारांना फार चांगले रीतीनें वागवित असत. यांचे मागें येणाऱ्या गृहस्थानीं याचप्रमाणें वर्तणूक केल्यास फार चांगलें आहे व ते असें करतील अशी आह्मी अशा करितों.

वरील दोन दुःखदायक गोष्टींवरून अद्याप आकावाईचा फेरा येथें आहेच असें ह्मणण्यास हरकत नाहीं आतां तरी वाईची शांतता होवो ह्मणजे बरें. जातां जातां दोन चांगल्या मनुष्याचे वाईनें नळी घेतले. या आठवड्यांत ४ मनुष्यें आजारी झालीं व चारच मेलीं.

**उमरावती**– येथील पोस्ट हपिसांतील हेडक्लार्क मि० कृष्णास्वामी ह्यांची अकोल्यास बदली झाली. व ह्या जागेवर वर्धेहून कोणी येणार आहे.

रा. रा. नारायण बाबाजी जोशी एल. सी. ई. पब्लिकवर्क्स खात्यांतील सबइंजिनियर ह्यांची बदली पुन्हा लोकलफंड इंजिनियरचे जागेवर करून त्यांस बुलढाणा येथें नेमिल्याचें समजतें. नारायणराव यांस प. व. खात्यांत येऊन सुमार एक वर्ष झालें. व त्यांस पगारही तीन शें रुपये दरमहा मिळत होता. आता शंभर रुपये कमी करून पुन्हा लोकलफंडकडे सरकारानें त्यांस बदललें हें ऐकून वाईट वाटतें. असें करण्याचा सरकारचा हेतु काय हें आज समजलें नाहीं तथापि नारायणरावांचें नुकसान फार झालें. व याबद्दल दुसरे वेळीं आह्मास जें लिहिणें तें लिहूं.

एलिचपूर येथील डे. पोस्टमास्तरची जागा ७० पासून ९९ रुपये पर्यंत होती ती आतां ९० पासून ७० रुपये पर्यंत होणार. नेटिव कोणत्याही जागेवर असला ह्मणजे पगाराचें स्केल कमती व्हावयाचेंच!

प्र. सिं.

## वर्तमानसार

सिंदे होळकर व गायकवाड तिघेही हिंदुस्थानांतील मुख्य मुंबईस युवराजाच्या आदर सत्कारार्थ अक्टोबर अखेरीस जाणार आहेत.

तारीख १४ रोजीं ईस्ट इंडिया रेलवेवर प्यासेंजर गाडीला एक मोठा अपघात झाला. त्यांत २ युरोपियन व ८ नेटिवप्यासेंजर मरण पावले व ३० जखमी झाले असें समजतें. सगळी ट्रेन रेलाबाहेर गेली होती. अपघाताचें कारण अजून समजलें नाहीं.

नामदार गवरनर जनरल नोवेंबरचे ४थे तारखेस मुंबईस येतील. व युवराज प्रिन्स आफ वेल्स येण्याचे पूर्वी बहुतकरून ते दरबार करतील. प्रिन्स आफ वेल्स ८वे तारखेस मुंबईस येतील. ९वे तारखेला मोठी रोशनाई ह्मणजे दीपोत्साह व दारूकाम होईल आणि १० वीस लार्ड नार्थब्रूक गवरनर जनरल परत जातील, प्रिन्स आफ वेल्स १९वे तारखेपर्यंत मुंबईस रहातील. कदाचित एक दोन दिवस अमदाबादेस व एक दोन दिवस पुण्यास जाऊन येतील. नंतर सिव्हलद्वीपाकडे व तिकडून कलकत्याकडे जातील. वाटेंत मद्रासेसही मुक्काम करितील व २३ वे डिसेंबर रोजीं कलकत्यास पोंचतील. तेथें लार्ड नार्थब्रूक साहेबाची व त्यांची आणखी भेट होईल. नंतर दिल्लीस बडा दरबार होईल असें समजतें.

महू आणि उज्जनी यांमधील स्टेट रेल्वे पुढील महिन्याच्या अखेरीस पुरी होईल.

या वर्षाच्या मुंबईच्या म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेंत राजकुमार कालेजांतील ९ राजपुत्र येणार आहेत असें समजतें.

पुढील महिन्याच्या १७वे तारखेस पुण्यास सोजिर लोकांच्या उद्योगाचें प्रदर्शन होणार आहे.

बडोद्याच्या चीफ जस्टिसची जागा खान साहेब करशेटजी रुस्तुमजी सुरतेचे सबार्डिनेट जडज यांनीं कबूल केली- असें समजतें.

इंदुरास होळकर सरकार प्रिन्स आफ वेल्सच्या आदरार्थ दरबार करणार आहेत व बुंदेलखंडचे राजे बोलावणार आहेत असें कळतें.

डा० अनंता चंद्रोबा मुंबईचे देवीखात्याचे लोकल सुपरइंटेंडेंट यांस बडोद्यास दरमहा १००० रुपये पगारावर सर्जन नेमणार असें समजतें-

रा. बा. कृष्णाजी लक्ष्मण कच्छचे दिवाण राजीनामा देणार असें समजतें.

आनरबल जस्टिस वेस्ट साहेब मुंबईच्या हाय कोर्टांतील जडज विलायतेहून इकडे यावयास निघाले.

बडोद्यास वहिवाटदाराच्या व मुनसिफांच्या जागा तिकडील प्रांतांतील चांगल्या वकील लोकांस देणार असें समजतें.

मिस मेरी कार्पेंटर ही परोपकारी बाई आक्टोबर महिन्यांत पुन्हा हिंदुस्थानांत येणार आहे.

बडोद्याची राज्यव्यवस्था म्हैसुरच्या तोडीवर चालू करावी असा सर टी माधवराव यांचा बेत आहे.

बडोद्याहून ३० कोसांवर नर्मदा नदी आहे तेथून नळाचें पाणी बडोद्यास आणण्याचा विच्यार आहे.

बडोद्याच्या राजकीय प्रकरणाचे संबंधानें कर्नेल फेर व मुंबई आणि हिंदुस्थान सरकार यांचे जे लेख प्रसिध्द झाले आहेत त्यांच्या संबंधानें मि० दादाभाई नवरोजी आपला जबाब तयार करीत आहेत.

## जकातीबद्दल नवा कायदा.

जकातीबद्दल नवा कायदा पास झाल्याविषयीं व कापसावर शेंकडा पांच रुपये जकात बसविल्याविषयींची खबर आह्मीं मागच्या अंकीं लिहिली आहे. हा कायदा पास झाल्यापासून हिंदुस्थानच्या व्यापाराविषयीं सरकारचें खरें मनोगत काय आहे तें दिसून येतें. हिंदुस्थानचा व्यापार वाढावा व देश द्रव्यसंपन्न व्हावा अशी सरकारची इच्छा खरोखर आहे. परंतु या इच्छेमुळें विलायतचें नुकसान होण्याचा प्रसंग आला ह्मणजे ती नाहींशी होऊन स्वतः तुंबडी भरण्याची इच्छा बलवत्तर होते. आह्मीं ह्मणतों ही गोष्ट खरी किंवा खोटी हें सदरील आक्टाच्या पुढील हकीकतीवरून लक्षांत येईल.

धान्य वगैरे हिंदुस्थानांतून जे पदार्थ परदेशीं जातात त्यांतून कित्येकांवर आजपर्यंत जकात होती, ती, नीळ, तांदूळ, व लाख हे तीन पदार्थ खेरीज करून बाकी सर्व पदार्थां वरील जकात कमी केली. याचा परिणाम असा होईल कीं, जकात कमी झाल्यामुळें या देशांतील पदार्थ परदेशीं जास्त जाऊं लागतील व त्यामुळें पदार्थांस तेजी आल्यानें ते जास्त उत्पन्न करण्यास उत्तेजन येईल. परदेशीं जाणाऱ्या पदर्थांवरील जकात कमी केल्यामुळें सरकारचे थोडें उत्पन्न कमी झालें तथापि या गोष्टीकडे सरकारानें लक्ष न देतां व्यापार वाढावा या हेतूनें जकात कमी केली हें फार चांगलें केलें.

स्वतःचें नुकसान होऊं लागलें ह्मणजे या देशाचा व्यापार वाढविण्याची इच्छा नष्ट होते असें जें आह्मीं वर लिहिलें आहे तो प्रकार असा. विलायतेहून हिंदुस्थानांत येणाऱ्या कापड सुतावरील जकात कमी करण्याबद्दल विलायतच्या व्यापाऱ्यांनी खटपट चालविल्याचें वाचकांस माहित आहे. ही त्यांची खटपट सिद्धीस गेली इतकेंच नाहीं परंतु त्यांनीं मागितल्यावांचून हिंदुस्थान सरकारानें त्यांस बारीक सूत व कापड तयार करण्याची सनद दिली आहे, असें ह्मटलें तरी चालेल. कारण परदेशाहून हिंदुस्थानांत येणाऱ्या कापसावर शेंकडा पांच रुपये जी जकात बसविली आहे तिचा परिणाम असा होणार आहे कीं, आतां हिंदुस्थानांतील गिरण्यास बारीक सूत व कापड तयार करण्यांत जकातीमुळें फायदा व्हावयाचा नाहीं. हिंदुस्थानांत जो कापूस उत्पन्न होतो त्याचे तंतु अखूड असतात त्यामुळें यंत्राच्या सहाय्यानें त्यापासून बारीक सूत फायदेशीर काढतां येत नाहीं. ह्मणून येथील कांहीं व्यापाऱ्यांनीं अमेरिकेंतील व मिसर देशांतील कापूस आणून त्याचें बारीक सूत व कापड काढण्याची तजवीज चालविली होती. परंतु त्यांच्या या स्तुत्य उद्योगावर कापसावरील जकातीमुळें आतां पाणी पडल्यासारखें झालें आहे. व यापुढें आतां या देशांत बारीक सूत व कापडाचे कारखाने बहुधा व्हावयाचे नाहींत.

परदेशांतून येणाऱ्या कापसावर जकात बसविण्याचें कारण असें कीं, या देशांत गिरण्यांचा व्यापार वाढूं नये. कारण वाढला असतां विलायतची पोळी हिंदुस्थानच्या लोकांच्या हातीं जाईल. हा कायदा पास करतेवेळीं आनरबल मि० टी. सी. होप. सुरतेचे माजी कलेक्टर यांणीं भाषण केलें त्यांतील सारांश असा कीं, "विलायतेहून जो एकंदर माल हिंदुस्थानांत येतो त्यांतील सुमारें पांच हिस्से अथवा एक विसांश ( जाडें सूत व कापड ) हिंदुस्थानांत व मुख्यत्वेंकरून मुंबईंत उत्पन्न होऊं लागलें आहे. मुंबईंत होणाऱ्या कापड व सुतामुळें दोन लक्ष रुपयांच्या जकातीचे नुकसान होत आहे. याकारितां सूत व कापडावरील जकातीपासून विलायतेंतील व्यापाराचें नुकसान होतें असें जें म्यांचेस्टरचेंबर आफ कामर्स या सभेकडून लिहून आलें आहे त्यांत अर्थ नाहीं. कारण हिंदुस्थानांत येणाऱ्या कापड सुतावरील जकातीचें उत्पन्न सुमारें ऐशीं लक्ष आहे. व मुंबईंतील गिरण्यांमुळें सुमारें दोन लक्षांचें नुकसान होत आहे ह्मणून जकात कमी करण्याविषयीं विलायतच्या व्यापाऱ्यांचें जे बोलणें होतें, तें, या गोष्टीबद्दल विचार करण्याकारितां हिंदुस्थान सरकारानें जी कमेटी नेमली होती ती कबूल कारेत नाहीं. " असें बोलणें झाल्यानंतर परदेशाहून येणाऱ्याकापसावर जकात बसविण्याविषयीं होपसाहेबांनीं कारण सांगितलें. ते असें ह्मणाले कीं, "विलायतेहून हिंदुस्थानांत कापड सूत येतें ह्मणून हिंदुस्थान सरकारास ऐशीं लक्षांचें उत्पन्न आहे. कापड सूत येणें बंद झालें तर हें उत्पन्न नाहींसें होईल. हिंदुस्थानांत बारीक सूत व कापड काढण्याची सुरुवात होण्याचा संभव असल्याविषयीं विलायतच्या व्यापाऱ्याकडून लिहून आलें आहे. तेव्हां या देशांतील गिरण्याचा धंदा न वाढावा अशी कांहीं तजवीज न केली तर सदरहू उत्पन्न नाहींसें होईल. याकारितां एशिआखंडांत उत्पन्न होणाऱ्या कापसावर शेंकडा पांच रुपये जकात बसविणें रास्त आहे. विलायतेहून जें बारीक सूत येतें त्यावर शेंकडा साडेतीन रुपये जकात असल्यामुळें या सुतापासून हिंदुस्थानांतील गिरण्यांत बारीक सूत निघण्याचा संभव आहे. परंतु असें होऊं लागल्यास एथील गिरण्यांवर लायसेन्स ट्याक्स बसविण्यांत येईल. याकरितां गिरण्यांचा धंदा करणाऱ्या लोकांनीं या गोष्टीकडेस लक्ष द्यावें. "

होप साहेबांच्या बोलण्याचें तात्पर्य सदर्हू प्रकारचें आहे. अशा प्रकारच्या निलाजरेपणाचें भाषण आम्ही आजपर्यंत ऐकिलें नव्हतें. यावरून एथील गिरण्यांचा उत्कर्ष होऊं नये असा सरकारचा पूर्ण हेतु असल्याविषयीं स्पष्ट दिसून येतें. आमची समजूत आजपर्यंत अशी होती कीं, या देशाचा कारभार वाढून संपत्तीची वृद्धि व्हावी असा सरकारचा हेतु आहे. परंतु ही भूल आतां नाहींशी झाली असें ह्मणणें भाग येतें. विलायतेहून येणाऱ्या कापडसुतावर जकात असल्यामुळें एथील व्यापाऱ्यांस आपलें कापड सूत स्वस्त दरानें विकावयास सांपडतें व त्यामुळें आमचें नुकसान होतें इतकेंच काय तें विलायतच्या व्यापाऱ्यांचें ह्मणणें होतें. व याकरितां जकात बंद करावी ह्मणून सेक्रेटरी आफ स्टेट यांस त्यांनीं विनंती केली होती. परदेशीय कापसावर जकात बसवून एथील गिरण्यांच्या धंद्यांचा समूळ नाश करावा असें विलायती व्यापाऱ्यांचें मागणें नव्हतें परंतु आमच्या एथील राज्यकर्त्यांनीं केवळ आपल्या देशबांधवांच्या फायद्याकडे लक्ष्य देऊन जगाची अथवा मनाची लाज न धरतां अथवा विलायतच्या व्यापारामुळें हिंदुस्थानचें आजपर्यंत किती नुकसान झालें आहे हें लक्षांत न आणतां सहस्त्रावधी लोकांच्या उदरनिर्वाहाच्या मार्गावर धोंडा मारला आहे. ईस्टइंडिया कंपनीचा पाय हिंदुस्थानांत शिरण्यापूर्वी हिंदुस्थानचें कापड युरोपखंडांत जात असे. या देशांतील कापडें विलायतेस जाऊं लागल्यामुळें विलायतचा व्यापार बसूं लागला ह्मणून त्या देशच्या सरकारानें या देशच्या कापडावर जबर जकात बसविली. कंपनी सरकारास या देशांत राज्य मिळाल्यापासून जेणेंकरून विलायती व्यापाऱ्यांचा फायदा होईल असेच कंपनीनेंही कायदे केले. परिणाम असा झाला कीं, हिंदुस्थानचें कापड विलायतेस जाण्याचें बंद होऊन तिकडून उलटें या देशीं कोट्यावधि रुपयांचें कापड येऊं लागलें आहे. सुदैवानें या देशांत यंत्राच्या साह्यानें कापड उत्पन्न होण्याची सुरुवात झाली होती तों इतक्यांतच सरकार असें ह्मणतें कीं, तुह्मी बारीक कापड उत्पन्न करूं लागलां तर तुमच्यावर आम्ही कर बसवूं व अमेरिकेंतील कापूस आणला तर त्यावरही कर घेऊं.

येणेंप्रमाणें झालेल्या प्रकारास उपाय काय करावा हें आह्मांस तूर्त सुचत नाहीं. व्यापारास कोणच्याही प्रकारची बंदी असणें रास्त नाहीं अशी जी आजपर्यंत गोऱ्या लोकांची बडबड ऐकत होतों ती कोठें गेली हें आह्मांस समजत नाहीं. खुद्द गवर्नर जनरल साहेबांनीं आक्ट पास करतेवेळीं बरेंच लांब भाषण केलें, व व्यापारास बंदी असणें रास्त नाहीं असेंही बोलून दाखविलें परंतु ते कापसावर जकात बसविल्याबद्दल एक शद्बही बोलले नाहींत! या कायद्याचें बिल कौन्सिलांत आणल्याबरोबर पास झालें व तोंपर्यंत जकातांत कोण कोणच्या प्रकारचे फेरफार केले आहेत हें कोणासही माहित नाहीं. या कायद्याची इतकी चोरी काय ह्मणून? हिंदुपेट्रिअट पत्रांत असें लिहिलें आहे कीं कायदा पास करतेवेळीं नेटिव सभासदांस मुळींच येऊं दिलें नाहीं. असें आहे तर कौन्सिलांत नेटिवांस काय ह्मणून नेमलें? असो. या कायद्याच्या संबंधानें सर्व गोष्टी चमत्कारिक प्रकारच्या झाल्या आहेत. व त्यांपासून सरकारची नजर मदांध झाल्यासारखी दिसत आहे. ने. ओ.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.